

आदिकवी

श्री वाल्मिकी

विरचित

मूळ संस्कृत


# रामायण

५

मराठी श्लोक

श्री. श्याम

कुलकर्णी



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# -श्रीवाल्मिकी रामायण-

## खंड ५- अयोध्याकांड

**मूळ संस्कृत व मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी**

# -श्रीवाल्मिकी रामायण – खंड ५

## मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वाराश्री. जयवंत कुलकर्णी, ''गन्धार'' फ़्लॅटक्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे४११०२९
संपर्क – व्हॉट्सऍपक्र. ९७६५४५६५८१
Email : sgk६६४२@gmail. com

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ३० मार्च २०२३ (रामनवमी शके १९४५)

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री श्याम कुलकर्णी (काव्यानुवादक)



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. १९७५ अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित

# प्रास्ताविक

ग्रन्थ पूर्ण होण्यापूर्वीच प्रस्तावना लिहिणे हा मर्यादातिभङ्ग आहे आणि 24,000 श्लोकांच्या "वाल्मीकीय रामायण" या ग्रन्थातील 350-400 श्लोकांचे रूपान्तरण हे तर मूळ ग्रन्थाचा साठावा भाग पूर्ण करण्यासारखे आहे. त्यामुळे हे दोन शब्द केवळ ईसाहित्य चे श्री. सुनिळ सामन्त यांचे ऋण मान्य करण्यासाठी लिहीत आहे. केवळ त्यांच्या आग्रहामुळेच मी हे मोठे काम अंगावर घेतले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या ग्रन्थास डॉ. रविन थत्ते यांच्यासारख्या महान व्यक्तीचा आशीर्वाद लाभणे हे माझे महद्भाग्य!

हे काम माझ्या हातून पूर्ण होण्याचे भाग्य मला लाभो येवढीच ईश्वरचरणी प्रार्थना !

श्याम कुलकर्णी



## Dr. Ravin Thatte


श्याम कुलकर्णी ह्यांची आणि माझी ओळख खरे तर माझ्या व्यवसायामुळे (प्लास्टिक सर्जन \ सुघटन शल्य) झाली होती ह्याची त्यांनी मला हल्लीच ह्या त्यांच्या प्रकल्पाबद्दल चर्चा करतांना करून दिली . पुढे मी ज्ञानेश्वरीवर लिहिण्यास सुरुवात केल्या नंतर देखील आमची भेट झाली होती हे मात्र आठवते. हा रामायणावरचा त्यांचा प्रयत्न \प्रकल्प बघून आणि वाचून मी थक्क झालो आहे . केवढे प्रचंड काम आहे हे! ह्या पूर्वी त्यांनी भगवत गीतेवर, रामरक्षेवर आणि मेघदूतावर अशीच समश्लोकी लिहिण्याची कामगिरी केली आहे हे कळल्यावर तर मी अवाक झालो . असला माणूस माझ्या परिचयाचा


आहे हे कळून धन्य वाटले. त्यांनी हे सगळे काम "मी स्वानंदासाठी करत आहे" असे लिहिले आहे . सगळ्या मोठ्या कृती ह्या स्वानंदातूनच निर्माण होतात हे फार जुने सत्य इथे परत उजळले आहे. ही हल्लीची समश्लोकी , रामायणाची, आताच वाचली. ती फार छान उतरली आहे आणि वाचतांना खिळवून ठेवते. प्रकल्प अजून पूर्ण व्हायचा आहे तो नक्कीच पूर्ण होईल अशी खात्री आहे आणि त्यासाठी माझ्या सारख्या अनेकांच्या शुभेच्छा पोहोचवण्याचे काम मी आनंदाने करतो आहे.

Dr. रविन थत्ते

**(प्लॅस्टिक सर्जन व संस्कृत पंडित. अध्यात्मावर ११ पुस्तके प्रकाशित)**

# श्रीवाल्मिकी रामायण- १ ते ४ (बालकांड) वाचण्यासाठी खालील मुखपृष्ठांवर क्लिक करावे









# - अथ श्रीवाल्मिकी रामायण- ५

# अयोध्याकाण्ड सर्ग 1

गच्छतां मातुलकुलं भारतेन तदा अनघः ।
शत्रुघ्नो नित्यशत्रुघ्नो नीतः प्रीतिपुरस्कृतः॥1॥

मातुलगृही जाताना शत्रुघ्ना प्रीतिपूर्वक ।
निष्पाप नित्यशत्रुघ्ना जाई भरत घेउनी ॥1॥

स तत्र न्यावसद्भ्राता सह सत्कारसकृतः।
मातुलेनाश्वपतिनां पुत्रस्नेहन ललितः॥2॥

आतिथ्य उभयां लाभे युधाजित मातुलाकडे।
पितृप्रेमे स्वागत होई स्वीकारत ते राहती ॥2॥

तत्रापि निवासंतौ तौ तर्प्यमाणौ च कामत:।
भ्रातरौ स्मरतां वीरौ वृद्ध दशरथं नृपं॥3॥

जरि सर्व इच्छापूर्ती राहता तेथ होतसे ।
बंधुद्वय स्मरती नित्य पित्या वृद्ध दशरथा ॥3॥

राजापि तौ महातेजा: सस्मार प्रोषितौ सुतौ।
उभौ भरतशत्रुघ्नौ महेन्द्रवरुणौपम ॥4॥

महेन्द्रवरुणासम त्यां दोघांस पराक्रमी ।
मातुलगृहि गेलेल्या राजा दशरथही स्मरे ॥4॥

सर्व एव तु तस्येष्टाश्चत्वार: पुरुषर्षभा:।
स्वशरीराद् विनिर्वृताश्चत्वार: इव बाहव: ॥5॥

प्रकटती बाहू चार जणु देहातुनि आपल्या ।
पुरुषोत्तम ते सर्व दशरथा बहुत प्रिय ॥5॥

तेषामपि महातेजा रामो रतिकर: पितु:।
स्वयंभूरिव भूतानां बभूव गुणवत्तर:॥6॥

तरी सर्वात श्रीराम गुणवान असल्यामुळे।
असे ब्रह्मा जसा भूतां तसा दशरथा प्रिय ॥6॥

स हि देवैरुदीर्णस्य रावणस्य वधार्थिभिः।
अर्थितो मानुषे लोके जज्ञे विष्णुः सनातनः॥7॥

आणि सनातन विष्णु वधण्या रावणा स्वता ।
अवतीर्ण मनुज लोकी देवांनी प्रार्थिल्यामुळे ॥7॥

कौसल्या शुशुभे तेन पुत्रेणामिततेजसा।
यथा वरेण देवानामदितिर्वज्रपाणिना ॥8॥

कौसल्या अतितेजस्वी पुत्रामुळे शोभत तशी ।
जशी अदिती माता वज्रधारि इंद्रामुळे ॥8॥

स हि रूपोपपन्नश्च वीर्यवाननसूचकः।
भूमावनुपमः सूनुर्गुणैर्दशरथोपमः ॥9॥

दशरथा योग्य तो पुत्र रूपवान पराक्रमी ।
पाही दोष न कोणात भूमण्डली तो निरुपम ॥9॥

स च नित्यं प्रशान्तात्मा मृदुपूर्वं च भाषते ।
उच्चमानोऽपि परुषं नोत्तरं प्रतिपद्यते ॥10॥

राही शान्त सदा बोले मृदु भाषेत सर्वदा ।
कठोर बोलता कोणी नसे उत्तर देत त्या ॥10॥

कदाचिद्रुपकारेण कृतेनैकेन तुष्यति।
न स्मरत्यपकाराणां शतमप्यात्मवत्तया ॥11॥

कधि एकादा उपकार केल्या संतुष्ट त्यावरी ।
अपकार सहस्रांना स्मरणात न ठेवतो ॥11॥

शीलवृद्धैर्ज्ञानवृद्धैर्वयोवृद्धैश्च सज्जनैः।
कथयन्नास्त वै नित्यमस्त्रयोग्यान्तरेष्वपि॥12॥

अस्त्राभ्यासामध्ये वेळ काढुनि बोलती।
शीलवृद्ध,ज्ञानवृद्ध,वयोवृद्ध सत्पुरुषांसवे ॥12॥

बुद्धिमान्‍ मधुराभाषी पूर्वभाषी प्रियंवद:।
वीर्यवान्न च वीर्येण महता स्वेन विस्मित:॥13॥

बुद्धिमान मधुभाषी भेटता बोले स्वत: ।
बल पराक्रम संपन्न गर्व ना स्वपराक्रमी॥13॥

न चानृतकथो विद्वान वृद्धानां प्रतिपूजक:।
अनुरक्त: प्रजाभिश्च प्रजाश्चाप्यनुरज्यते॥14॥

असत्य कधि ना बोले विद्वान वृद्धां सन्मानी ।
करी प्रजेवर प्रेम तशी प्रजाही त्यावरी ॥14॥

सानुक्रोशो जितक्रोशो ब्राह्मणप्रतिपूजकः।
दीनानुकम्पी धर्मज्ञो नित्यं प्रग्रहवान शुचिः॥15॥

दयाळु जिंकी क्रोधास पूजितो ब्राह्मणा सदा।
दीनावरी करी प्रेम धर्मज्ञ पवित्र जितेंद्रिय ॥15॥

कुलोचित मतिः क्षात्रं स्वधर्मं बहु मन्यते ।
मन्यते परया प्रीत्या महत स्वर्गफलं ततः॥16॥

कुला उचित आचार क्षात्रधर्मास पाळतो ।
तयामुळे स्वर्गप्राप्ती धारणा त्याची असे ॥16॥

नाश्रेयसि रतो यश्च न विरुद्धकथारुचिः।
उत्तरोत्तरयुक्तीनां वक्ता वाचस्पतिर्यथा ॥17॥

अमंगल निषिद्ध कर्मी मुळि ना रुचि त्या असे।
बृहस्पतिपरी न्याय्य कृतिचे करी समर्थन ॥17॥

अरोगस्तरुणो वाग्मी वपुष्मान् देशकालवित ।
लोके पुरुषसारज्ञः साधुरेको विनिर्मितः॥18॥

निरोगी तरुण देहे ज्ञात देशकाल जया।
पुरुष सात्त्विक आदर्श निर्मिला जणु एक तो ॥18॥

स तु श्रेष्ठैर्गुणैर्युक्त: प्रजानां पार्थिवात्मज:।
बहिश्चर इव प्राणो बभूव गुणत: प्रिय:॥19॥

तो श्रेष्ठ गुणांनी युक्त गुणांमुळे त्या आपुल्या।
प्राणापरि बहिश्चर तो प्रजाजनांना प्रिय ॥19॥

सर्वविद्याव्रतस्नातो यथावत साङ्गवेदवित।
इष्वस्त्रे च पितु: श्रेष्ठो बभूव भरताग्रज ॥20॥

निपुण सर्व विद्यांत वेदज्ञ षडङ्गासह ।
धनुर्वेदी पित्याहून भरताग्रज श्रेष्ठ तो ॥20॥

कल्याणाभिजन: साधुरदीन: सत्यवागृजु:।
वृद्धैरभिविनीतश्च द्विजैर्धर्मार्थदर्शिभि:॥21॥

जणु कल्याण प्रत्यक्ष सत्यवादि ऋजु सज्जन ।
वृद्ध ब्राह्मणशिक्षित ज्ञाता धर्म अर्थासवे ॥21॥

धर्मकामार्थतत्त्वज्ञ: स्मृतिमान्‌ प्रतिभानवान्‌ ।
लौकिके समयाचारे कृतकल्पो विशारद: ॥22॥

धर्म,अर्थ,काम तज्ञ संपन्न प्रतिभा स्मृति ।
निपुण लोकव्यवहारी धर्माचरणी कुशल तो ॥22॥

निभृत: संवृताकारो गुप्तमन्त्र: सहायवान ।
अमोघक्रोधहर्षश्च त्यागसंयमकालवित ॥23॥

विनयी, मन्त्र अभिप्राय गुप्त ठेवी, सहाय्यक।
हर्ष क्रोध आटोक्यात त्यागसंपन्न संयमी ॥23॥

दृढभक्ति: स्थिरप्रज्ञो नासद्ग्राही न दुर्वचा:।
निस्तन्द्रिरप्रमत्तश्च स्वदोषपरदोषवित ॥24॥

दृढभक्ति स्थितप्रज्ञ दुर्वचनी न दुराग्रही ।
उद्योगी दक्ष सदा जाणे स्वदोष परदोषही॥24॥

शास्त्रज्ञश्च कृतज्ञश्च पुरुषान्तरकोविद:।
य: प्रग्रहानुग्रहयोर्यथान्यायं विचक्षण: ॥25॥

शास्त्र तत्व विधि जाणे पारखे योग्य माणसा ।
समजे कोणा रक्षावे शिक्षेला पात्र कोण हे ॥25॥

सत्संग्रहरक्षप्रग्रहणे स्थानविन्निग्रहस्य च ।
आयकर्मण्युपायज्ञ: संदृष्टव्ययकर्मवित ॥26॥

जाणे कोण क्षमापात्र रक्षी जाणुनि सज्जनां ।
अर्थशास्त्रनुसारे तो अर्थार्जन व्यय जाणतो ॥26॥

श्रेष्ठ्यं शास्त्रसमूहेषु प्राप्तो व्यामिश्रकेषु च ।
अर्थधर्मौ च संगृह्य सुखतन्त्रो न चालस:॥27॥

शास्त्र समुहात तज्ञ अर्थ,गुण संपादनी
आळसा न कधी स्थान रंजना शेवटी असे ॥27॥

वैहारिकाणां शिल्पानां विज्ञातार्थविभागवित ।
आरोहे विनये चैव युक्तो वारणवाजिनाम ॥28॥

आनंदार्थ कलाभोक्ता जाणता धनवितरणी ।
गज अश्व वश करणे आरोहण जाणे जसे ॥28॥

धनुर्वेदविदां श्रेष्ठो लोके अतिरथसमतत:।
अभियाता प्रहतां च सेनानयविशारद:॥29॥

सर्वश्रेष्ठ धनुर्धारी योद्ध्यांना सर्वसम्मत ।
कर्दनकाळ शत्रूंचा कुशल सेनाचालनी ॥29॥

अप्रधृष्यश्च संग्रामे क्रुद्धैरपि सुरासुरै:।
अनसूयो जितक्रोधी न दृष्टो न च मत्सरी ॥30॥

क्रुद्ध देव दैत्यसुद्धा हरवू न शकती तया ।
परि ईर्षा नसे त्याला असे क्रोधास जिंकले ॥30॥

न चावमंता भूतानां न च कालवशानुग:
एवं श्रेष्ठगुणैर्युक्त: प्रजानां पार्थिवात्मज:॥31॥

अवमानी न कोणास होई कालशरण ना
असा श्रेष्ठ गुणे युक्त राजपुत्र लोकां प्रिय॥॥31॥

संमतस्त्रिषु लोकेषु वसुधाया: क्षमागुणै:
बुधा बृहस्पतेस्तुलो वीर्येनापि शचीपते:॥32॥

सर्वमान्य तिन्ही लोकी क्षमाशील पृथ्वीसम ।
बुद्धिमान बृहस्पतितुल्य देवेंद्रापरि वीर तो ॥32॥

तथा सर्वप्रजाकान्ते प्रीतसंजनने पितु:।
गुणैरविरुरूचे रामो दीप्त: सूर्य इवांशुभि:॥33॥

लोक त्याच्या गुणे लुब्ध पित्यास सौख्याचा झरा
गुणांनी झळके जैसा सूर्य किरणे आपुल्या ॥33॥

तमेवंव्रतसंपन्नमप्रधृष्यपराक्रमम् ।
लोकपालोपमं नाथमकामयत मेदिनी ॥34॥

वीर्ये अपराजित त्या व्रतसंपन्न अश्या तया ।
पृथ्वीस वाटे ऐसा नाथ इन्द्रासम हवा ॥34॥

एतैस्तु बहुभिर्युक्तं गुणैरानुपमैः सुतम् ।
दृष्ट्वा दशरथो राजा चक्रे चिन्तां परंतपः॥35॥

अनुपमगुणे युक्त अश्या पुत्रास पाहुनी ।
करी मनात विचार परंतप दशरथ ॥35॥

अथ राज्ञो बभूवैवं वृद्धस्य चिरंजीविनः ।
प्रीतिरेषा कथं रामो राजा स्यान्मयि जीवति ॥36॥

वयोवृद्ध दीर्घायुष्यी विचार करि दशरथ
लाभेल का राजपद रामा असता मी जीवित ||36||

एषा ह्यस्य परा प्रीतिर्हृदिसंपरिवर्तते ।
कदा नाम सुतं दृक्ष्याम्यभिषिक्तमहं प्रियं ||37||

पुन:पुन्हा इच्छा होत त्यांच्या हृदयी उत्तम ।
केव्हां पाहीन रामाचा राज्याभिषेक होतसे ||37||

वृद्धिकामो हि लोकस्य सर्वभूतानुकम्पक ।
मत: प्रियतरो लोके पर्जन्य इव वृष्टिमान||38||

असे दया सर्वा भूती इच्छि लोकां अभ्युदय ।
मजहून प्रिय लोकी मेघासम बर्षतात जे ॥38॥

यमशक्रसमो वीर्ये बृहस्पतिसमो मतौ।
महीधरसमो धृत्वा मत्तश्च गुणवत्तर:॥39॥

यम इंद्रापरी शूर बृहस्पतिसम बुद्धिवान ।
धैर्ये पर्वतासमान श्रेष्ठ गुण माझ्याहुनी ॥39॥

महीमहमिमां कृत्स्नामधितिष्ठन्तमातजम ।
अनेन वयसा दृष्ट्वा यथा स्वर्गमवाप्नुयाम ॥40॥

करताना श्रीरामास पृथ्वीचे राज्य पाहुनी ।
सुखे करु स्वर्ग प्राप्त आशा हीच मनी वसे ॥40॥

इत्येवं विविधैस्तैस्तैरन्यपार्थिवदुर्लभैः।
शिरपरिमेयैश्च लोके लोकोत्तरैर्गुणैः ॥41॥
तं समीक्ष तदा राजा युक्तं समुदितैर्गुणैः ।
निश्चित्य सचिवैः सार्धं यौवराज्यममन्यत ॥42॥

आपला पुत्र श्रीराम नाना गुणांनी मंडित ।
दुर्लभ इतर नृपांत पाहुनीया दशरथ ॥41॥

मन्त्र्यांसवे करूनीया विचार विनिमय निश्चय ।
करी दशरथ त्याला युवराज करण्याचा ॥42॥

दिव्यन्तरिक्षे भुमौ च घोरमुत्पातजं भयम् ।
संचचक्षेऽथ मेधावी शरीरे चात्मनो जराम् ॥43॥

अन्तरिक्ष तशी भूमी वरिल उत्पात भय।
दर्शवी आणि वृधत्व आपले सूचित करी ॥43॥

पूर्णचन्द्राननस्याथ शोकापनुदमात्मनः।
लोके रामस्य बुबुधे सम्प्रियत्वं महात्मनः॥44॥

पूर्णचन्द्रासम मुख राम लोकांस अतिप्रिय।
त्यामुळे तो करी दूर दु:ख राजाचे झणी ॥44॥

आत्मनश्च प्रजानां च श्रेयसे च प्रियेण च।
प्राप्ते काले स धर्मात्मा भक्त्या त्वरितवान्नृप: ॥45॥

प्रजा आणि स्वकल्याणा साठी मन्त्रिगणां त्वरे ।
राज्याभिषेक श्रीरामा करण्याची आज्ञा करी ॥45॥

नाना नगरवास्तव्यान्पृथग्जानपदानपि ।
समानिनाय मेदिन्यां प्रधानान्पृथिवीपति:॥46॥

प्रमुख पुरुष सामन्त नगरा जनपदातिल ।
बोलावीत अयोध्येत मन्त्र्यांना सांगुनिया ॥46॥

तान् वेश्मनामाभरणैर्यथार्हैं प्रतिपूजितान् ।
ददर्शालंकृतो राजा प्रजापतिरिव प्रजा:॥47॥

रहाया योग्य स्थल देई सत्कारी आभूषणे तयां ।
आभूषित राजा भेटे प्रजेला ब्रह्मा जसा ॥47॥

न तु केकयराजानं जनकं वा नराधिप:।
त्वरया चानयामास पश्चातौ श्रोष्यत: प्रियम् ॥48॥

त्वरा इतुकी होई की जनकास मिथिलापती ।
तसे केकयराजास कळविले नाहि दशरथे ।
कळेल पुढे त्याना वार्ता ही प्रिय मागुती
ऐसे दशरथ समजे आश्चर्यकारक गोष्ट ही ॥४८॥ (हे वाक्य माझे}

अद्योपविष्टे नृपतौ तस्मिन् परपुरार्दने ।
ततः प्रविविशुः शेषाः राजानो लोकसम्मताः॥49॥

शत्रुनाशक नृपती जेव्हां प्रवेशति सभागृहे।
सर्व लोकप्रिय राजे प्रवेश करती तदा ॥49॥

अथ राजवितीर्णेषु विविधेष्वासनेषु च।
राजानामेवाभिमुखा निषेदुर्नियता नृपा:।।50।।

सिंहासनावरी विविध बैसोनी ते नराधिप ।
विनीत भावे ऐकाया बोल त्याचे उत्सुक ।।5०।।

स लब्धमानैर्विनयान्वितैर्नृपै: पुरालयैर्जानपदैश्च मानवै:।
उपोभविष्टैर्नृपतिर्वृतो बभौ सहस्रचक्षुर्भगवानिवामरै:।।51।।

नरेश सामन्त निवासि लोक सन्मानित राजाकडुनी सर्व ।
यामध्ये महाराज दशरथ शोभती जणु इण्द्र देवतांमधे ।।51।।

# इत्यर्थेश्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे प्रथमः सर्गः।

# अयोध्या काण्ड सर्ग 2

ततः परिषदंसर्वामामन्त्र्य वसुधाधिपः ।
हितमुद्धर्षणं चैवमुवाच प्रथितं वचः॥1॥
दुन्धुभिस्वरकल्पेन गम्भीरेणानुनादिना।
स्वरेण महता राजा जीमूत इव नादयन् ॥2॥

सम्बोधत लोकां सर्व होते राजसभेत जे।
मेघासम गम्भीर स्वरे दुन्दुभिसारख्या ॥1॥

दशरथ महानृप वार्ता जी हितकारक ।
सांगतसे त्या सर्वांना सर्वां आनंदकारक ॥2॥

राजलक्षणयुक्तेन कान्तेनानुपमेय च ।
उवाच रसयुक्तेन स्वरेण नृपतिर्नृपान् ॥3॥

राजलक्षण जो युक्त गम्भीर नि अनुपम ।
कमनीय स्वरे राजा संबोधे सर्वां नृपां ॥3॥

विदितं भवतामेतद् यथा मे राज्यमुत्तमम् ।
पूर्वकेर्मम राजेन्द्रैः सुतवत् परिपालितम् ॥4॥

ज्ञात हे आपणां सर्वां कशी राज्यातली प्रजा ।
मजपूर्वीच्या राजानी स्वपुत्रासम पाळिली ॥4॥

सोऽहमिक्ष्वाकुभि: सर्वैर्नरेन्द्रै: प्रतिपालितम् ।
श्रेयसा योक्तुमिच्छामि सुखार्हमखिलं जगत ॥5॥

नरेन्द्रानी इक्ष्वाकूंच्या पूर्वीच्या सुख जे दिले ।
भोगावे इच्छितो तैसे जगाने सर्व यापुढे ॥5॥

मयाप्याचरितं पूर्वै: पन्थानमनुगच्छता ।
प्रजा नित्यमनिद्रेण यथाशक्त्यभिरक्षिता:॥6॥

मीही अनुसरुनी त्यां सदा राहुन जागृत ।
प्रजेचे रक्षण केले यथाशक्ति समस्तही ॥6॥

इदं शरीरं कृत्स्नस्य लोकस्य चरता हितम् ।
पाण्डुरस्यातपत्रस्य च्छायायां जरितं मया ॥7॥

हित साधन करण्यात जगाचे थकविले मम ।
शरीरा राजछत्राच्या श्वेत छायेत राहुनी ॥7॥

प्राप्य वर्षसहस्राणि बहून्यायूंषि जीवत:।
जीर्णस्यास्य शरीरस्य विश्रान्तिमभिरोचये॥8॥

अनेक सहस्र वर्षे आयुष्य मिळता आता ।
जराजीर्ण शरीरास विश्राम देऊ इच्छितो ॥8॥

राजप्रभावजुष्टां च दुर्वहामजितेन्द्रियैः।
परिश्रान्तोऽस्मि लोकस्य गुर्वी धर्मधुरं वहन् ॥9॥

संरक्षण्या जगा सर्व अशक्य अजितेन्द्रिया ।
दीर्घकाल वाहुनिया भार आता श्रान्त मी बहू ॥9॥

सोऽहं विश्राममिच्छामि पुत्रं कृत्वा प्रजाहिते ।
संनिकृष्टानिमान् सर्वाननुमान्य द्विजर्षभान् ॥10॥

यास्तव नेमुनी पुत्रा प्रजाहितास्तव इच्छितो ।
द्विजश्रेष्ठ अनुमतीने घेण्यास विश्राम मी ॥10॥

अनुजातो हि मां सर्वैर्गुणैः श्रेष्ठो ममात्मजः ।
पुरन्दरसमो वीर्ये रामः परपुरंजयः ॥11॥

माझ्याहुनि माझा पुत्र श्रेष्ठ सर्व गुणांमधे ।
जिंकी शत्रुपुरे जो इन्द्रासम पराक्रमी ॥11॥

तं चन्द्रमिव पुष्येण युक्तं धर्मभृतां वरम् ।
यौवराज्ये नियोक्तास्मि प्रातः पुरुषपुङ्गवम् ॥12॥

चंद्रमा पुष्यनक्षत्री धर्मात्मा श्रेष्ठ राम त्या ।
करणार प्रात:काली नियुक्त युवराजपदी ॥12॥

अनुरूपो स वो नाथो लक्ष्मीवाँल्लक्ष्मणाग्रज:।
त्रैलोक्यमपि नाथेन येन स्यान्नाथवत्तरम् ॥13॥

लक्ष्मणाग्रज स्वामी तो सर्वांस्तव योग्य निश्चित ।
त्याच्यामुळे त्रैलोक्यहि सनाथ होइल निश्चित ॥13॥

अनेन श्रेयसा सद्य: संयोक्ष्येऽहमिमां महीम् ।
गतक्लेशो भविष्यामि सुते तस्मिन् निवेश्य वै ॥14॥

अभिषेके भूमीच्या या कल्याणप्रद करीन मी ।
निश्चिन्त मी होईन रामावर भार टाकुनी ॥14॥

यदिदं मेऽनुरूपार्थं मया साधु सुमन्त्रितम् ।
भवन्तो मेऽ नुमन्यन्तां कथं वा करवाण्यहम् ॥15॥

प्रस्ताव योग्य हा वाटे तर सम्मति देउनी ।
सांगावे आपण सर्व कार्यसिद्धी कशी करू ॥15॥

यद्यप्येषा मम प्रीतिर्हितमन्यद विचिन्त्यताम् ।
अन्या मध्यस्थचिन्ता तु विमर्दाभ्यधिलोदया ॥16॥

जरि योग्य मला वाटे तरी मध्यस्थां आपणा ।
याहून अधिक योग्य सुचणे शक्य असेलही ॥16॥

इति ब्रुवन्तं मुदिता: प्रत्यनन्दन् नृपा नृपम् ।
वृष्टिमन्तं महामेघं नर्दन्त इव बर्हिण: ॥17॥

ऐकुनी दशरथबोल राजे सर्व उपस्थित ।
हर्षध्वनि करती मेघा मोर पाहुनिया जसे ॥17॥

स्निग्धोऽनुनाद: संजज्ञे ततो हर्षसमीरित:।
जनौघोष्टसंनादो मेदिनी कम्पयन्निव ॥18॥

समस्त जनसमुदाय हर्षध्वनि करीतसे ।
हादरे त्यामुळे जैसी समस्त पृथ्वी कम्पित ॥18॥

तस्य धर्मार्थविदुषो भावमाज्ञाय सर्वशः।
ब्राह्मणा बलमुख्याश्च पौरजानपदैः सह ॥19॥
समेत्य ते मन्त्रयितुं समतागतबुद्धयः।
ऊचुश्च मनसा ज्ञात्वा वृद्धं दशरथं नृपम् ॥20॥

धर्म अर्थ ज्ञानी राजा बोले ते वच ऐकुनी ।
सेनापति ब्राह्मण सर्व तसे जनपद नायक ॥19॥

विचार त्यावर करती बसुनी घेति निर्णया ।
आणि दशरथा वृद्ध मनोगत सांगती असे ॥20॥

अनेकवर्षसाहस्रो वृद्धस्त्वमसि पार्थिव ।
स रामं युवराजानमभिषिञ्चस्व पार्थिवम् ॥21॥

अनेकसहस्र वर्षांनी येई वार्धक्य आपणा ।
रामा युवराज्याभिषेक योग्य पृथ्वी रक्षणा ॥21॥

इच्छामो हि महाबाहुं रघुवीरं महाबलम् ।
गजेन महता यान्तं रामं छत्रावृताननम् ॥22॥

रघुवीर गजारूढ श्वेत छत्र तयावरी ।
अश्या रूपात श्रीराम पहाण्या इच्छितो आम्ही ॥22॥

इति तद्वचनं श्रुत्वा राजा तेषां मन:प्रियम् ।
अजानन्निव जिज्ञासुरिदं वचनमब्रवीत ॥23॥

आनंदित करणारे ऐकुनी वाक्य दशरथ ।
अजाण बनुनी त्यांचे मनोगत जाणण्या वदे ॥23॥

श्रुत्वैतद्वचनं यन्मे राघवं पतिमिच्छत ।
राजान: संशयोऽयं मे तदिदं ब्रूत तत्वत: ॥24॥

आपले मत रामास राजा करण्या अनुकुल ।
परि संशय मनी माझ्या बोला कृपया त्यावर॥24॥

कथंतु मयि धर्मेण पृथिवीमनुशासति।
भवन्तो द्रष्टुमिच्छन्ति युवराजं महाबलम् ॥25॥

धर्मपूर्वक मी पृथ्वी पालन करतो तरी।
रामा युवराजपदी का पहाण्या इच्छिता तुम्ही॥25॥

ते तमूचुर्महात्मान: पौरजानपदै: सह ।
बहवो नृपकल्याणगुणा: सन्ति सुतस्य ते ॥26॥

त्यावर पौरजनासह महात्मा,नृप बोलती ।
सद्गुण कल्याणकारी पुत्रात बहु आपुल्या ॥26॥

गुणान् गुणवतो देव देवकल्पस्य धीमत:।
प्रियानन्दनान् कृत्स्नान् प्रवक्ष्यामोऽद्य तान्श्रुणु ॥27॥

देवतातुल्य गुणवान् श्रीराम गुण सर्वांप्रिय ।
आन्ददायक त्यांचे ऐका करि अल्पवर्णन ॥27॥

दिव्यैर्गुणै: शक्रसमो राम: सत्यपराक्रम:।
इक्ष्वाकुभ्योऽपि सर्वेभ्यो ह्यतिरिक्तो विशाम्पते ॥28॥

सत्यपराक्रमि राम गुणे सम्पन्न इन्द्रवत ।
इक्ष्वाकुकुलामध्ये तोच सर्वश्रेष्ठ असे ।।28।।

राम: सत्पुरुषो लोके सत्य: सत्यपरायण:।
साक्षाद् रामाद् विनिर्वृत्तो धर्मश्चापि श्रिया सह ।।29।।

सत्पुरुष सत्यवादी श्रीराम सत्यपरायण ।
अर्थासह धर्मास प्रतिष्ठित करीतसे ।।29।।

प्रजासुखत्वे चन्द्रस्य वसुधाया: क्षमागुणै:।
बुध्या बृहस्पतेस्तुल्यो वीर्ये साक्षाच्छचीपते:।।30।।

चंद्रासम सुख देई प्रजेला क्षमाशील वसुधेपरि तो ।
बुद्धिमान प्रतिबृहस्पती तो पराक्रमी जणु इन्द्रच तो ॥30॥

धर्मज्ञ: सत्यसंघश्च शीलवाननसूयक:।
क्षान्त: सान्त्वयिता श्लक्ष्ण: कृतज्ञो विजितेन्द्रिय: ॥31॥
मृदुश्च स्थिरचित्तश्च सदा भव्योऽनसूयक:।
प्रियवादी च भूतानां सत्यवादी च राघव:॥32॥

सत्यप्रतिज्ञ धर्मज्ञ शीलवान् द्वेष ना करी ।
करी सांत्वन दीनांचे मृदुभाषी जितेन्द्रिय ॥31॥

स्थिरचित्त मने कोमल सदा कल्याणकारि तो।
सर्वांप्रति प्रिय बोले सत्यवादी असा असे ॥32॥

बहुश्रुतानां वृद्धानां ब्राह्मणानामुपासिता ।
तैनास्येहातुला कीर्तिर्यशस्तेजश्च वर्धते॥33॥

ब्राह्मणा वृद्ध विद्वाना करी संग उपासक ।
रामाची विस्तरे कीर्ती यश तेज तयामुळे ॥33॥

देवासुरमनुष्याणां सर्वास्त्रेषु विशारदः।
सम्यग विद्याव्रतस्नातो यथावत साङ्गवेदवित ॥34॥

देव मानव असुरांच्या सर्व अस्त्रे विशारद ।
साङ्ग वेदात निष्णात सर्व विद्यापारंगत ॥34॥

गान्धर्वे च भुवि श्रेष्ठो बभूव भरताग्रज ।
कल्याणाभिजन: साधुरदीनात्मा महामति:॥35॥

गान्धर्वश्रेष्ठ भूमीत दीनात्मा हृदयी उदार । गान्धर्व म्हणजे संगीतशास्त्र
बुद्धि विशाल साधु वृत्ति असा तो भरताग्रज ॥35॥

द्विजैरभिविनीतश्च श्रेष्ठधर्मार्थनैपुणै:।
यदा व्रजति संग्रामं ग्रामार्थ नगरस्य वा ॥36॥

गत्वा सौमित्रिसहितो नाविजित्य निवर्तते ।

शिक्षित श्रेष्ठ ब्राह्मणे धर्म अर्थ निपुण तो।
ग्राम नगर रक्षार्थ लक्ष्मणासह जाउनी ॥36॥
येई परत संग्रामी विजयी वीर होउनी ।

संग्रामात् पुनरागत्य कुञ्जरेण रथेन वा ॥37॥
पौरान् स्वजनवन्नित्यं कुशलं परिपृच्छति ।
पुत्रेष्वग्निषु दारेषु प्रेष्यशिष्यगणेषु च ॥38॥

रणातून रथ वा हत्ती घेउन परते जंव ॥37॥

स्वजना पौरजनाना विचारी कुशल त्यांचे।
त्यांच्या प्रियजनांचे शिष्यांचेहि तयासवे ॥38॥

निखिलेनानुपूर्व्या च पिता पुत्रानिवौरसान्।
शुश्रूषन्ते च यः शिष्याः कच्चिद् वर्मसु दंशितः॥39॥
इति वःपुरुषव्याघ्रः सदा रामोऽभिभाषते।

पित्यासम पुरवासींचे विचारी कुशल मङ्गल।
शिष्य सेवा करती ना गुरूंना हे विचारत ॥39॥
सेना सज्जतेविषयी क्षत्रियांना विचारत।

व्यसनेषु मनुष्याणां भृशं भवति दु:खित: ||40||
उत्सवेषु च सर्वेषु पितेव परितुष्यति |

संकटे नागरिकाच्या होई दु;खित तो स्वत: ||40||
आनंदी उत्सवी त्यांच्या पित्यासम होतसे |

सत्यवादी महेष्वासो वृद्धसेवी जितेन्द्रिय:||41||
स्मितपूर्वाभिभाषी च धर्मं सर्वात्मनाश्रित:|
सम्यग्योक्ता श्रेयसां च न विगृह्यकथारुचि:||42||

धनुर्धर सत्यवादी वृद्धसेवी जितेन्द्रिय ||41||

बोले हास्यमुखे धर्म हृदयी ओतप्रोत तो।
सम्यक कल्याण आयोजी निंदेत न रुची तया ॥42॥

उत्तरोत्तरयुक्तौ च वक्ता वाचस्पतिर्यथा ।
सुभ्रूरायतताम्राक्षः साक्षात विष्णुरिव स्वयम् ॥43॥

वार्तालापे युक्तिवादे बृहस्पति जणु तो असे ।
विशालाक्ष जणू विष्णू साक्षात शोभत तो असे ॥43॥

रामो लोकाभिरामोऽयं शौर्यवीर्यपराक्रमैः।
प्रजापालनसंयुक्तो न रागोपहतेन्द्रियः॥44॥

लोकां आनंदित करी जो शौर्य वीर्य पराक्रमे ।
प्रजापालन करतो परि क्रोध न मानसी ॥44॥

शक्तस्त्रैलोक्यमप्येष भोक्तुं किं नु महीमिमाम् ।
नास्य क्रोधप्रसादश्च निरर्थोऽस्ति कदाचन ॥45॥

पृथ्वीच काय त्रैलोक्य रक्षण्यास समर्थ तो ।
क्रोध वा प्रसाद त्याचा कधी ना व्यर्थ होतसे ॥45॥

हन्तेष नियमाद् वध्यानवध्येषु न कुप्यति ।
युनक्त्यर्थे:प्रहृष्टश्च तमसौ यत्र तुष्यति ॥46॥

वधी शास्त्रविधि वध्य कोपे न अवध्यावरी ।
संतुष्ट ज्यावरी त्याला अमाप धन देतसे ॥46॥

दान्तैः सर्वप्रजाकान्तैः प्रीतिसंजननैर्नृणाम् ।
गुणैर्विरोचते रामो दीप्तः सूर्य इवांशुभिः ॥47॥

प्रजेस आवडणाऱ्या गुणांनी युक्त संयमी ।
शोभतो राम आदित्य शोभे किरणांनी जसा ॥47॥

तमेवंगुणसंपन्नं रामं सत्यपराक्रमम् ।
लोकपालोपमं नाथमकामयत मेदिनी ॥48॥

असा सर्वगुणसंपन्न प्रभुत्वे लोकपालची ।
हवा श्रीराम पृथ्वीस नाथ सत्यपराक्रमी ॥48॥

वत्स: श्रेयसि जातस्ते दिष्ट्यासौ तव राघव:।
दिष्ट्या पुत्रगुणैर्युक्तो मारीच इव काश्यप ॥49॥

प्रजाकल्याण करण्या पुत्र समर्थ आपला ।
संपन्न आपल्या भाग्ये गुणांनी कश्यपापरी ॥49॥

बलमारोग्यमायुश्च रामस्य विदितात्मन:।
देवासुरमनुष्येषु सगन्धर्वोरगेषु च ॥50॥

आशंसते जन: सर्वो राष्ट्र पुरवरे तथा ।
आभ्यन्तरश्च बाह्यश्च पौरजानपदो जन: ॥51॥

देव,आसुर,गन्धर्व नाग मानवही तसे ।
येतीजाती पुरी लोक नगरा जनपदातिल ॥50॥
सर्वदा आयुरारोग्य बलाची शुभकामना ।
करिती सर्व श्रीरामा सुविख्यात सुशीलही ॥51॥

स्त्रियोवृद्धास्तरुण्यश्च सायं प्रात: समाहिता:।
सर्वां देवान्नमस्यन्ति रामस्यार्थे मनस्विन:।

तेषां तद् याचितं देव त्वत्प्रसादात्समृध्यताम् ||52||

स्त्रिया वृद्ध युवा तैश्या सायंकाळि सकाळिही ।
प्रार्थिती देवतां सर्व होण्या युवराज रामची ।
प्रसादे आपल्या पूर्ण व्हावी त्यांचि प्रार्थना ||52||

राममिन्दीवरश्याम सर्वशत्रुनिबर्हणम् ।
पश्यामो यौवराजस्य तव राजोत्तमात्मजम् ||53||

नीलकमलासम जो निर्दालन शत्रुचे करी ।
पहाया ज्येष्ठ पुत्रास युवराज आम्ही उत्सुक ||53||

तं देवदेवोपममात्मजं ते सर्वस्य लोकस्य हिते निविष्टम् ।
हिताय नः क्षिप्रमुदारजुष्टं मुदाभिषेक्तुं वरद त्वमर्थसि ॥54॥

तो देवदेवासम पुत्र तुमचा जो सर्वदा लोकहितार्थ सज्ज ।
महापुरुषे सेवित त्या करावा अभिषेक हित त्यात आमुचे ॥54॥

**इत्यर्थेश्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे द्वितीय सर्गः।**

# अयोध्याकान्ड सर्ग 3

तेषामञ्जलिपद्मानि प्रगृहीतानि सर्वशः।
प्रतिगृह्यादब्रवीद् राजा तेभ्यः प्रियहितं वचः ॥1॥

करांजलि जोडुनि त्यांनी सम्मति देऊनी नृपा ।
स्वीकार करुनी राजा हितकर प्रिय बोलती ॥1॥

अहोऽस्मि परमप्रीतः प्रभावश्चातुलो मम ।
यन्मे ज्येष्ठं प्रियं पुत्रं यौवराज्यस्थमिच्छथ ॥2॥

परमप्रिय मत्पुत्रा करण्या यौवराज्याभिषेक हे ।
आपणा मान्य जाणोनी हर्षे प्रभावित होत मी ॥2॥

इति प्रत्यर्चितान् राजा ब्राह्मणानिदमब्रवीत ।
वसिष्ठं वामदेवं च तेषामेवोपशृण्वताम् ॥3॥

ऐकुनी सत्कारुनि त्या पुरवासी सभासदां ।
वसिष्ठ वामदेवादि बोलती ऋषींना असे ॥3॥

चैत्र: श्रीमानयं मास: पुण्य: पुष्पितकानन:।
यौवराज्याय रामस्य सर्वमेवोपकल्प्यताम् ॥4॥

पवित्र हा चैत्रमास वनश्री बहरली असे ।
अभिषेकास रामाच्या सामग्रि जुळवा तुम्ही ॥4॥

राज्ञस्तूपरते वाक्ये जनघोषो महानभूत ।
शनैस्तस्मिन्‌ प्रशान्ते च जनघोषे जनाधिप:॥5॥
वसिष्ठं मुनिशार्दूलं राजा वचनमब्रवीत ।

वच ऐकुनि राजाचे हर्षे उच्चरवे जन ।
घोष करती तो शान्त होण्याची वाट पाहुनी ॥5॥
मुनिश्रेष्ठ वसिष्ठांना भूप वचना बोलती ।

अभिषेकाय रामस्य यत कर्म सपरिच्छदम ॥6॥
तदद्य भगवन सर्वज्ञापयितुमर्हसि ।

अभिषेक करण्या रामा आवश्यक सर्व सांगुनी॥6॥
सज्जता करण्या त्याची आज्ञा द्या आज सत्वर।

तच्छ्रुत्वा भूमिपालस्य वसिष्ठो मुनिसत्तम:॥7॥
आदिदेशाग्रतो राज्ञ: स्थितान युक्तान कृताञ्जलीन ।

वचना ऐकुनिया त्यांच्या सेवक जे हात जोडुनी ॥7॥
आज्ञेस्तव उभे त्यांना वसिष्ठ वदती असे ॥

सुवर्णादीनि रत्नानि बलीन् सर्वौषधीरपि॥8॥
शुक्लमाल्यानि लाजांश्च पृथक् च मधुसर्पिषी ।
अहतानि च वासांसि रथं सर्वायुधान्यपि ॥9॥
चतुरङ्गबलं चैव गजं च शुभलक्षणम् ।
चामरव्यजने चोभे ध्वजं च पाण्डुरम् ॥10॥
शतं च शातकुम्भानां कुम्भानामग्निवर्चसाम् ।
हिरण्यश्रृङ्गमृषभं समग्रं व्याघ्रचर्म च ॥11॥
यच्चान्यत् किंचिदेष्टव्यं तत् सर्वमुपकल्प्यताम् ।

उपस्थापयत प्रातरग्न्यगारे महीपते:॥12॥

सुवर्ण आणखी रत्ने सर्व औषधि त्यासवे ॥8॥
पुष्पमाला शुभ्र तैसे घृत मध पात्री वेगळ्या ।
नवी वस्त्रे रथासंगे शस्त्रास्त्रे सर्व योग्य ती ॥9॥
चतुरङ्ग सेना संगे गज उत्तम लक्षणी ।
छत्र चामर ध्वज श्वेत अग्नीसम दैदिप्यमान ॥10॥
कलश ते सुवर्णाचे व्याघ्रचर्म संपूर्ण जे ।
सुवर्णे मढली शिंगे असा वृषभ त्यासवे ॥11॥

याशिवाय असे जे जे योग्य एकत्र करुनि ते ।
अग्निशाळेत राजांच्या प्रात:काली जमा करा ॥12॥

अन्त:पुरस्य द्वाराणि सर्वस्य नगरस्य च ।
चन्दनस्रग्भिरर्चन्ता धूपैश्च घ्राणहारिभि:॥13॥

अन्तपुरांची सर्व द्वारे तशीच नगराचिही ।
सजवा चन्दन मालांनी सुगंधित धूपे तशी ॥13॥

प्रशास्तमन्नं गुणवद् दधिक्षीरोपसेचनम् ।
द्विजानां शतसाहस्रं यत्प्रकाममलं भवेत ॥14॥

दही दूध घृते युक्त अन्न गुणकारी करा ।
द्विजांच्या भोजना लक्ष जे यथास्थित होइल॥14॥

सत्कृत्य द्विजमुख्यानां श्व: प्रभाते प्रदीयताम्।
घृतं दधि च लाजाश्च दक्षिणाश्चापि पुष्कला:॥15॥

सत्कार द्विजश्रेष्ठांचा करुनी सकाळी उद्या।
दही घृत नि हे अन्न पुरेशी दक्षिणाहि द्या ॥15॥

सूर्येऽभ्युदितमात्रे श्वो भविता स्वस्तिवाचनम्।
ब्राह्मणश्च निमंत्र्यन्तां कल्प्यन्तामासनानि च ॥16॥

सूर्योदयी उदईक करण्या स्वस्तिवाचन ।
निमंत्रा ब्राहमणा त्यांची आसनव्यवस्था करा ॥16॥

आबध्यन्तां पताकाश्च राजमार्गश्च सिच्यताम् ।
सर्वे च तालापचरा गणिकाश्च स्वलंकृता:॥17॥
कक्ष्यां द्वितीयामास तिष्ठन्तु नृपवेश्मन:।

राजमार्गी जल शिंपून पताका वर बांधुनी ।
संगीतनिपुण गायक अलंकृत नर्तकींसह ॥17॥
द्वितीयकक्षेत ठेवा उभे राजमहालि त्यां ।

देवायतनचैत्येषु सान्नभक्ष्या: सदक्षिणा ॥18॥
उपस्थापयितव्या: स्युर्माल्ययोग्या: पृथक पृथक ।

देवता मन्दिरी किंवा चैत्यवृक्षाखालतीहि ज्या ॥18॥
सर्वांना पदार्थ भोज्य दक्षिणा प्रस्तुत करा ।

दीर्घासिबद्धगोधाश्च संनद्धा मुष्टवासस:॥19॥
महाराजाङ्गनं शूरा: प्रविशन्तु महोदयम् ।

गोधाचर्म वस्त्रधारी दीर्घ तलवार घेउनी॥19॥
नराधिप प्रांगणि वीर रहावे ते उपस्थित ।

एवं व्यादिश्य विप्रौ तु क्रियास्तत्र विनिष्ठितौ ॥20॥
चक्रतश्चैव यच्छेयं पार्थिवाय निवेद्य च ।

कार्ये ही सांगुनी विप्रां वामदेव वसिष्ठ ते ॥20॥
उर्वरित राजाज्ञेची पूर्ति ते करिती स्वत:।

तत: सुमन्त्रं द्युतिमान राजा वचनमब्रवीत ॥२१॥
राम: कृतात्मा भवता शीघ्रमानीयतामिति ।

दशरथ राजा तेजस्वी सुमन्त्रा सांगतो असे ॥२१॥
पवित्रात्मा श्रीरामास शीघ्र येथे तुम्ही आणा ।

स तथेति प्रतिज्ञाय सुमन्त्रो राजशासनात ॥2२॥
रामं तत्रानयांचक्रे रथेन रथिनां वरम ।

आज्ञेनुसार राजाच्या सुमन्त्राने जाऊनिया ॥2२॥
श्रेष्ठरथी श्रीरामा रथी बसवुनि आणले ।

अथ तत्र सहासीनास्तदा दशरथं नृपम ॥2३॥
प्राच्योदीच्या प्रतीश्चाश्च दाक्षिणात्याश्च भूमिपा:।
म्लेंच्छाश्चार्याश्च ये चान्ये वनशैलान्तवासिन:॥2४॥
उपासांचक्रिरे सर्वे तं देवा वासवं यथा ।

चारी दिशातुनि आलेले भूपाल वेगवेगळे ॥२३॥
म्लेंच्छ आर्य तसे त्यात वन पर्वतवासिही ।
दशरथा उपासति ते राजभवनी उपस्थित ॥२४॥
उपासति सर्व देव इन्द्रा देवनृपा जसे ।

तेषां मध्ये स राजर्षिर्मरुतामिव वासवः॥26॥
प्रासादस्थो दशरथो ददर्शायान्तमात्मजाम् ।
गन्धर्वराजप्रतिमं लोके विख्यातपौरुषम् ॥27॥

प्रासादी नृप त्यांमध्ये जैसा इन्द्र मरुद्गणांमध्ये ॥26॥

तेथून दशरथ पाही पुत्रा रामास आपुल्या ।
गंधर्वासम तेजस्वी ज्याचे विख्यात पौरुष ॥27॥

दीर्घबाहुं महासत्त्वं मत्तमातंगगामिनम्।
चन्द्रकान्ताननं राममतीव प्रियदर्शनम् ॥28॥
रूपौदार्यगुणैः पुंसां दृष्टिचित्तापहारिणम् ।
घर्माभितप्ताः पर्जन्यं ल्हादयन्तमिव प्रजा ॥29॥

महाबलि आजानुबाहु चाल मस्त गजासम ।
चन्द्राहून कान्तिमान सर्वां अति प्रियदर्शन ॥28॥

रूपौदार्य गुणे जिंकी जनांच्या चित्त दृष्टीस ।
आल्हादवि पर्जन्य उष्मा तप्तांस ज्यापरी ॥29॥

न ततर्प समायान्तं पश्यमानो नराधिपः।
अवतार्य सुमन्त्रस्तु राघवं स्यन्दनोत्तमम् ॥30॥
पितुः समीपं गच्छन्तं प्राञ्जलिः पृष्ठतोऽन्वगात ।

एकटक पाहता त्याला दशरथ तृप्त होत ना
सुमन्त्र उतरवि त्यास रथातुन  उत्तम ॥30॥
पित्याकडे जोडुनी तो हात जाता सुमन्त्रहि जातसे ।

स तं कैलासशृंगाभं प्रासादं रघुनन्दन: ॥31॥
आरुरोह नृपं द्रष्टुं सहसा तेन राघव ।

शिखरासम कैलास असे प्रासाद त्यामध्ये ॥31॥
प्रवेशे पितृदर्शनार्थ सुमन्त्रासह राघव ।

स प्राञ्जलिरभिप्रेत्य प्रणत: पितुरन्तिके ॥32॥
नाम स्वं श्रावयन् रामो ववन्दे चरणौ पितु:।

विनीत भावे अञ्जलि जोडुनी जात पित्याकडे ॥32॥
सांगुनी आपुले नाम चरणां स्पर्श करीतसे ।

तं दृष्ट्वा प्रणतं पार्श्वे कृताञ्जलिपुटं नृपः ॥33॥
गृह्याञ्जलौ समाकृत्य सस्वजे प्रियमात्मजम् ।

करता पाहुनी त्याला प्रणाम जवळी घेउनी ॥33॥
हातात हात घेऊनी स्वपुत्रा घेत मिठीमध्ये ।

तस्मै चाभ्युद्यतं सम्यमणिकाञ्चनभूषितम् ॥34॥
दिदेश राजा रुचिरं रामाय परमासनम् ।

राजा सांगे तया होण्या आरूढ सिंहासनी ॥34॥
मणिकाञ्चनजडित होते आणून ठेवले ।

तथाऽऽसनवरं प्राप्य व्यदीपयत राघव: ॥35॥
स्वयैव प्रभया मेरुमदये विमलो रवि: ।

सूर्य आपल्या उदये उजळी मेरुपर्वता ॥35॥
शोभवी राघव तैसा स्वप्रभेने आसना ।

विभ्राजिता तत्र सा सभापि व्यरोचत ॥36॥
विमलग्रहनक्षत्रा शारदी द्यौरिवेन्दुना ।

सभा प्रकाशित तेव्हां शोभे तेव्हां नभासम ॥36॥
शरदी चंद्र नक्षत्रे उगवली असती जिथे ।

तं पश्यमानो नृपतिस्तुतोष प्रियमात्मजम् ॥37॥
उवाचेदं वचं राजा देवेन्द्रमिव कश्यपः।

सिंहासनि बसलेल्या पुत्रास श्रेष्ठ तो पिता ॥38॥
जसा कश्यप इंद्रास तसे वचन बोलतो ।

ज्येष्ठायामसि मे पत्न्यां सदृश्यां सदृशः सुतः ॥39॥
उत्पन्नस्त्वं गुणज्येष्ठो मम रामात्मजः प्रियः ।
त्वया यतः प्रजाश्चेमाः स्वगुणैरनुरञ्जिताः॥40॥
तस्मात त्वं पुण्ययोगेन यौवराज्यमवाप्नुहि ।

ज्येष्ठ पत्नि कौसल्येचा गुणी पुत्र तिच्यासम ॥३९॥
मजहूनि गुणी पुत्र रामा मज परमप्रिय ।
प्रजेस गुणाने आपुल्या प्रसन्न केलेस तू ॥40॥
युवराजपदा घेशी पुष्यनक्षत्री उद्या ।

कामतस्त्वंप्रकृत्यैव निर्णीतो गुणवानिति ॥41॥
गुणवत्यपि तु स्नेहात् पुत्र वक्ष्यामि ते हितम् ।
भूयो विनयमास्थाय भव नित्यं जितेन्द्रिय:॥42॥

जरी गुणवान् अससी सर्वांनुमते मान्यही ॥41॥

प्रेमाने तरिही काही हिताचे बोल सांगतो ।
अजुनी विनयशील हो जितेन्द्रियही तसा ॥42॥

कामक्रोधसमुत्थानि त्यजस्व व्यसनानि च ।
परोक्षया वर्तमानो वृत्त्या प्रत्यक्षया तया ॥43॥

काम क्रोधे होति उत्पन्न व्यसनांचा कर त्याग तू ।
परोक्ष किंवा प्रत्यक्ष न्यायवृत्ति करि धारण ॥43॥

अमात्यप्रभृती: सर्वा: प्रजाश्चैवानुरञ्जय ।
कोष्ठागारायुधागारै: कृत्वा संनिचयान् बहून् ॥44॥

इष्टानुरक्तप्रकृतिर्यः पालयति मेदिनीम् ।
तस्य नन्दति मित्राणि लब्धामृतमिवामराः ॥45॥

मन्त्री सेनापती सर्वां प्रजेसहि तुष्टवी ।
कोशागार शस्त्रागार योग्य संग्रह ठ्वुनी ॥44॥
प्रसन्न ठेवुनि सर्वांना करावे पृथ्वि पालन ।
मित्र आनन्दित जैसे देव अमृत लाभता ॥45॥

तस्मात पुत्र त्वमात्मानं नियम्यैवं समाचर ।
तच्छ्रुत्वा सुहृदस्तस्य रामस्य प्रियकारिणः ॥46॥

त्वरिता: शीघ्रमागत्य कौसल्यायै न्यवेदयन् ।

करी चित्ता जिंकुनिया तू आचरण उत्तम।
जे बोल ऐकुनि मित्र प्रिय राम असे जया॥46॥
कौसल्या मातेकडे शीघ्र येउनी सांगती तिला ।

सा हिरण्यं च गाश्चैव रत्नानि विविधानि च ॥47॥
व्यादिदेश प्रियाख्येभ्य:कौसल्या प्रमदोत्तमा ।

कौसल्या वनिता श्रेष्ठ संवाद प्रिय ऐकुनी ॥47॥
सुवर्ण रत्ने गायींनी पुरस्कारित त्यां करी ।

अथाभिवाद्य राजानं रथमारुह्य राघवः ।
ययौ द्युतिमद् वेश्म जनोघैः प्रतिपूजितः ॥48॥

पित्यास वन्दुनी तेव्हां श्रीराम बसुनी रथी ।
सन्मानित प्रजेने तो भवनी भव्य जाइ तो ॥48॥

ते चापि पौरा नृपतेर्वचस्तच्छ्रुत्वा तदा लाभमिवेष्टमाशु ।
नरेन्द्रमामन्त्र्य गृहाणि गत्वा देवान् समान,रभिप्रहृष्टाः ॥49॥

ऐकुनी नृपवचना आनंदित पौर अभीष्ट गोष्ट घडणार जाणुनी ।
घेऊनि आज्ञा नृपाची जाती गृही आनन्दे देवांस पूजिती ॥49॥

# इत्यार्थे श्रीमद्रामायणेवाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे तृतीयः सर्गः ॥3॥

# रामायण अयोध्याकाण्ड सर्ग 4

गतेश्वथ नृपो भूय: पौरेषु सह मन्त्रिभि:।
मन्त्रयित्वा ततश्चक्रे निश्चयज्ञ: स निश्चयम् ॥1॥
श्व एव पुष्पो भविता श्वोऽभिषेच्यस्तु मे सुत:।
रामो राजीव पत्राक्षो युवराज इति प्रभु:॥2॥

पौरजन निघुनी जाता देशकालज्ञ जो नृप ।
सल्ला घेउन मन्त्र्यांचा करी निश्चय तेधवा ॥1॥

उद्याच पुष्य नक्षत्र तेव्हां राजीवलोचना ।
युवराजपदी अभिषेक श्रीरामास करायचा ॥2॥

अथान्तर्गृहमाविश्य राजा दशरथस्तदा ।
सूतमामन्त्रयामास रामं पुनरिहानय ॥3॥

तदा अन्तर्गृही जाता राजा सूतास बोलवी ।
सांगे त्यास पुन्हा रामा बोलावुन आण तू ॥3॥

प्रतिगृह्य तु तद्वाक्यं सूत: पुनरुपाययौ ।
रामस्य भवनं शीघ्रं राममानयितुं पुन:॥4॥

आज्ञा ऐकोनिया त्यांची रामा शीघ्र आणावया ।
भवनात श्रीरामाच्या सूत पुन्हा जातसे ॥4॥

द्वा: स्थैरावेदितं तस्य रामायागमनं पुन:।
श्रुत्वैव चापि रामस्तं प्राप्तं शङ्कान्वितोऽभवत ॥5॥

सूचना आगमनाची त्याच्या ऐकुनिया पुन्हा ।
मनात श्रीरामाच्या शङ्का उद्भवली असे ॥5॥

प्रवेश्य चैनं त्वरितो रामो वचनमब्रवीत ।
तदागमनकृत्यं ते भूयस्तद्ब्रूह्यशेषत: ॥6॥

बोलावुनि त्याना राम उत्कंठेने विचारत ।
आगमन पुन्हा कैसे सांगा आपण हे मला ॥6॥

तमुवाच ततः सूतो राजा त्वां द्रष्टुमिच्छति ।
श्रुत्वा प्रमाणं तत्र त्वं गमनायेतराय वा ॥7॥

त्यास सूत म्हणे राजे आपणा पाहु इच्छिती ।
ऐकुनी निर्णय जावे किंवा न जावे घ्या आपण ॥7॥

इति सूतवचः श्रुत्वा रामोऽपि त्वरयान्वितः।
प्रययौ राजभवनं पुनर्द्रष्टुं नरेश्वरम् ॥8॥

सूतवचना ऐकून श्रीराम करुनी त्वरा ।
जाई राजभवनात नरेशा पाहण्या पुन्हा ॥8॥

तं श्रुत्वा समनुप्राप्तं रामं दशरथो नृपः।
प्रवेशयामास गृहं विवक्षुः प्रियमुत्तमम् ॥9॥

ऐकुनी येति श्रीराम बोलावूनि दशरथ ।
बोलण्या प्रिय वचनास सांगे आत प्रवेशण्या ॥9॥

प्रविशन्नेव च श्रीमान् राघवो भवनं पितुः।
ददर्श पितरं दूरम् प्रणिपत्य कृताञ्जलिः॥10॥

प्रवेशी पितृभवनात पाहुनी हात जोडुनी ।
श्रीराम पितृचरणा करती स्पर्श वाकुनी ॥10॥

प्रणमन्तं तमुत्थाप्य सम्परिष्वज्य भूमिपः।
प्रदिश्य चासनं चास्मै रामं च पुनर्ब्रवीत ॥11॥

रामा प्रणाम करणाऱ्या आलिंगी नृप उठवुनी ।
आसन देउनी त्याला आरम्भी बोलणे पुन्हा ॥11॥

राम वृद्धोऽस्मि दीर्घायुर्भुक्ता भोगा यथेप्सिताः।
अन्नवद्भिः क्रतुशतैर्यथेष्टं भूरिदक्षिणैः॥12॥

वृद्ध मी झालो रामा भोग मी सर्व भोगले ।
दक्षिणा अन्नदानासह केले अनेक यज्ञही ॥12॥

जातमिष्टमपत्यं मे त्वमद्यानुपमं भुवि ।
दत्तमिष्ट्मधीतं च मया पुरुषसत्तम ॥13॥

अनुपम भूमीवरी ऐशा संताना तुजसारख्या ।
करुनी प्राप्त तसे केले यज्ञ स्वाध्याय दान ही ॥13॥

अनुभूतानि चेष्टानि मया वीर सुखान्यपि ।
देवर्षिपितृविप्राणामनृणोऽस्मि तथाऽऽत्मन:॥14॥

अभीष्ट सुखे जी सर्व अनुभवली मी तशी ऋणे।
देवता,ब्राह्मण,ऋषि पितरांचीहि फेडिली ॥14॥

न किंचिन्मम कर्तव्यं तवान्यत्राभिषेचनात ।
अतो यत्वामहं ब्रूयां तन्मे त्वं कर्तुमर्हसि ॥15॥

कर्तव्य न आता राहे तुझ्या अभिषेकाविण ।
म्हणुनी मम वचनाचे निश्चये करि पालन ॥15॥

अद्य प्रकृतय: सर्वास्त्वामिच्छन्ति नराधिपम ।
अतस्त्वां युवराजानमभिषेक्ष्यामि पुत्रक ॥16॥

प्रजेची सगळया इच्छा राजा तू व्हावी अशी ।
युवराजपदी म्हणुनी अभिषिक्त तुला मी करी ॥16॥

अपि चाद्याशुभान् राम स्वप्नात पश्यामि राघव ।
सनिर्घाता दिवौल्काश्च पतन्ति हि महास्वना:॥17॥

परि स्वप्ने मला दुष्ट पडती त्याचबरोबर ।
वज्रपातासम शब्द उल्कापात दिसे दिनी ॥17॥

अवश्टब्धं च मे राम नक्षत्रं दारुणग्रहै: ।
आवेदयन्ति दैवज्ञा: सूर्याङ्गारकराहुभि: ॥18॥

ज्योतिषी वदती रामा राहू सूर्य मंगळ।
जन्मनक्षत्रि माझ्या दुष्ट हे ग्रह राहती ॥18॥

प्रायेण च निमित्तानामीदृशानां समुद्भवे ।
राजा हि मृत्युमाप्नोति घोरां चापदमृच्छति ॥19॥

लक्षणे अशुभ ही घोर नृपा आपत्तिकारक ।
कारणीभूत मृत्यूस त्याच्या होऊ शकति ती ॥19॥

तद् यावदेव मे चेतो न विमुह्यति राघव ।
तावदेवाभिषिञ्चस्व चला हि प्राणिमां गतिः ॥20॥

त्यास्तव जोवर माझे चित्त विचलित होत ना।
अभिषेक करुनि घे तू मानवी बुद्धि चंचल ॥20॥

अद्य चन्द्रोऽभ्युपगमत पुष्यात पूर्व पुनर्वसुम।
श्वः पुष्ययोगं नियतं वक्ष्यन्ते दैवचिन्तकाः॥21॥

पुनर्वसु नक्षत्रात चन्द्र असता आजला।
उद्या तो पुष्य नक्षत्री ज्योतिषी वदति निश्चित ॥21॥

तत्र पुष्येऽभिषिञ्चस्व मनस्त्वरयतीव माम।
श्वस्त्वाहमभिषेक्ष्यामि यौवराज्ये परंतप ॥22॥

कर पुष्यात अभिषेक त्वरा मम मन करी ।
परंतपा करणार तुला अभिषेक निश्चित ॥22॥

तस्यात त्वयाद्यप्रभृति निशेयं नियतात्मना ।
सह वध्योपवस्तव्या दर्भप्रस्तरशयिना ॥23॥

उपवास करुनी राही पत्नीसह व्रतस्थ तू ।
दर्भशय्येवरी रात्री झोप तू आज त्यास्तव ॥23॥

सुहृदश्चाप्रमत्तास्त्वां रक्षन्त्वद्य समन्ततः।
भवन्ति बहुविघ्नानि कार्याण्यैवंविधानि हि ॥24॥

रक्षिण्या सुहृद सर्व तुझे दक्ष रहातिल ।
शुभ कार्यी अश्या विघ्न शक्य असते म्हणूनिया ॥24॥

विप्रोषितश्च भरतो यावदेव पुरादित:।
तावदेवाभिषेकस्ते प्राप्तकालो मतो मम ॥25॥

भरत मातुलगृही आहे अभिषेक तोवरि तुझा ।
होऊन जाणे इष्ट असे मजला वाटते ॥25॥

कामं खलु सदा वृत्ते भ्राता ते भरत: स्थित:।
ज्येष्ठानुवर्ती धर्मात्मा सानक्रोशो जितेन्द्रिय:॥26॥

किं नु चित्तं मनुष्याणामनित्यमिति मे मतम् ।
सतां च धर्मनित्यानां कृतशोभि च राघव ॥27॥

सत्पुरुष नि:संशय भरत भ्राता तुझा ।
अनुसारी तुज धर्मात्मा दयालु जितेन्द्रिय ॥26॥
तरी चित्त मनुष्याचे स्थिर नसे मम मत ।
धर्मज्ञ सत्यवादीही रागद्वेषे चळतातही ॥27॥

इत्युक्त; सोऽभ्यनुज्ञात: श्वोमाविन्यभिषेचने ।
व्रजेति राम: पितरम्भिवाद्याभ्ययाद् गृहम् ॥28॥

ऐकुनी वचना तैसे आज्ञेस व्रतपालनाचिया ।
वंदुनि पित्यास राम भुवनी जाइ आपुल्या ॥28॥

प्रविश्य चात्मनो वेश्म राज्ञाऽऽदिष्टेऽभिषेचने ।
तत्क्षणादेव निष्क्रम्य मातुरन्त:पुरं ययौ ॥29॥

प्रवेशून स्वभुवनि पित्राज्ञा सीतेस सांगण्या ।
नसे तेथ म्हणुनी जाई मातेच्या अन्त:पुरी ॥29॥

तत्र तां प्रवणामेव मातरं क्षौमवासिनीम् ।
वाग्यतां देवतागारे ददर्शायाचतीं श्रियम्॥30॥

देवगृहि पाहि मातेस रेशमी वस्त्र नेसुनी ।
करताना पुत्रासाठी याचना राजलक्ष्मिची ॥30॥

प्रागेव चागता तत्र सुमित्रा लक्ष्मणस्तथा ।
सीता चानयिता श्रुत्वा प्रियं रामाभिषेचनम् ॥31॥

उपस्थित तेथ सुमित्रा लक्ष्मणासह ऐकुनी ।
रामाभिषेकवृत्तास सीतेसही बोलावती ॥31॥

तस्मिन् कालेऽपि कौसल्या तस्थावामीलितेक्षणा ।
सुमित्रयान्वास्यमाना सीतया लक्ष्मणेन च ॥32॥

तेव्हां ध्यानस्थ कौसल्या नेत्रां बंद करुनिया ।
सुमित्रा,लक्ष्मण,सीता  पाही राम तिच्यापुढे ॥32॥

श्रुत्वा पुष्ये च पुत्रस्य यौवराज्येऽभिषेचनम्।
प्राणायामेन पुरुषं ध्यायमाना जनार्दनम् ॥33॥

यौवराज्याभिषेकाचे पुत्रास वृत्त ऐकुनी ।
प्राणायामाने ती ध्यान परम पुरुषाचे करी॥33॥

तथा सनियमामेव सोऽभिगम्याभिवाद्य च ।
उवाच वचनं रामो हर्ष्यंस्तामिदं वरम् ॥34॥

अश्या ध्यानस्थ मातेस प्रणाम करुनी वदे।
वृत्त आनंदमय राम तिच्या समीप जाउनी ॥34॥

अम्ब पित्रा नियुक्तोऽस्मि प्रजापालनकर्मणि ।
भविता श्वोऽभिषेको मे यथा मे शासनं पितु:॥35॥
सीतयाप्युपवस्तव्या रजनीयं मया सह ।
एवमुक्तमुपाध्यायै: स हि मामुक्तवान् पिता ॥36॥

नियुक्त मजला माते प्रजापालन कार्यात ।
पिता करि उद्या त्याच्या आदेशे अभिषेकही ॥35॥

सीतेसह उपवास रात्रीस उपाध्याय हे ।
सांगती करण्या ऐसी पित्राज्ञाहि मला असे ॥36॥

यानि यान्यत्र योग्यानि श्वोभाविन्यभिषेचने ।
तानि मे मङ्गलान्यद्य वैदेह्याश्चैव कारय ॥37॥

तेव्हां अभिषेकास्तव मङ्गल कार्ये योग्य जी।
वैदेहीसह मजसाठी करुनी संपन्न घ्यावित ॥37॥

एतच्छ्रुत्वा तु कौसल्या चिरकालाभिकांक्षितम् ।
हर्षबाष्पाकुलं वाक्यमिदं राममभाषत ॥38॥

चिरकाल अपेक्षित गोष्ट घडणार हे ऐकुनी ।
आनंदे अश्रुपूर्ण नेत्रे श्रीरामास वदे असे ॥38॥

वत्स राम चिरंजीव हतास्ते परिपन्थिन:।
ज्ञातीन्‍ मे त्वं श्रिया युक्त: सुमित्रायाश्च नन्दय:॥39॥

चिरंजीव हो श्रीरामा नष्ट शत्रु व्हावे तुझे ।
आपुल्या नि सुमित्रेच्या सुखवी बांधवांस तू ॥39॥

कल्याणे बत नक्षत्रे मया जातोऽसि पुत्रक।
येन त्वया दशरथो गुणैराराधित: पिता ॥40॥

मजपासुन उत्पन्न नक्षत्रे मङ्गलमय ।
गुणांनी प्रसन्न करसी पित्या दशरथास तू ॥40॥

अमोघं बत मे क्षान्तं पुतुषे पुष्करेक्षणे ।
येयमिक्ष्वाकुराजश्री: पुत्र त्वां संश्रयिष्यति ॥41॥

उपवास व्रते केली प्रसन्न करण्या विष्णुना।
इक्ष्वाकुकुल राजश्री तुजला प्राप्त त्यामुळे ॥41॥

इत्येवमुक्तो मात्रा तु रामो भ्रातरमब्रवीत ।
प्राञ्जलिं प्रह्वमासीनमभिवीक्ष्य स्मयन्निव ॥42॥

असे बोलुन मातेस हात जोडून सविनय ।
हास्यवदने लक्ष्मणा राम बंधूस बोलला ॥42॥

लक्ष्मणेमां मया सार्धं प्रशाधि त्वं वसुंधराम् ।
द्वितीयं मेऽन्तरात्मानं त्वामिमं श्रीरूपस्थिता ॥43॥

लक्ष्मणा पृथ्वीचे कर पालन मजबरोबरी ।
माझाच दुसरा प्राण राजलक्ष्मी प्राप्त तुज ॥43॥

सौमित्रे भुक्ष्वं भोगांस्त्वमिष्टान् राज्यफलानि च ।
जीवितं चापि राज्यं च त्वदर्थमभिकामये ॥44॥

सौमित्रा भोग तू श्रेष्ठ योग्य राज्यफले तशी ।
मी राज्याची अभिलाषा तुजसाठीच करीतसे ॥44॥

इत्युक्त्वा लक्ष्मणं रामो मातरावभिद्य च ।
अभ्यनुज्ञाप्य सीतां च ययौ स्वं च निवेशनम् ॥45॥

लक्ष्मणा बोलुनि ऐसे मातांना दोन्हि वंदुनी ।
बरोबर घेउनि सीतेस राम स्वभुवनी जातसे ॥45॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे चतुर्थः सर्गः॥4॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 5

संदिश्य रामं नृपति: श्वोभाविन्यभिषेचने ।
पुरोहितं समाहूय वसिष्ठमिदमब्रवीत ॥1॥

योग्य सूचन रामास देत अभिषेकाप्रती ।
पुरोहित वसिष्ठांस नृप बोलावुनि सांगती ॥1॥

गच्छोपवासं काकुत्स्थं कारयाद्य तपोधन ।
श्रेयसे राज्यलाभाय बध्या सह यतव्रत॥2॥

तपोधन श्रीरामाकडुनी राज्यप्राप्तिस्तव ।
उपवास व्रतपालन पत्नीसह करूनि घ्या ॥2॥

तथेति च स राजानमुक्त्वा वेदविदां वर:।
स्वयं वसिष्ठो भगवान् ययौ रामनिवेशनम् ॥3॥
उपवास्यितुं वीरं मन्त्रविन्मत्रकोदम् ।
ब्राह्मं रथवरं युक्तमास्थाय सुधव्रत:॥4॥

राजास तथास्तु म्हणुनी श्रेष्ठ विद्वानांमध्ये ।
तयां आरूढ होण्यायोग्य वसिष्ठ बसुनी रथी ॥3॥

मन्त्रवेत्या रामा दीक्षा देण्या उपवासव्रताची ।
स्वत: जावया निघती श्रीरामभुवनाकडे ॥4॥

स रामभवनं प्राप्य पाण्डुराभ्रघनप्रभम् ।
तिस्र: कक्ष्या रथेनैव विवेश मुनिसत्तम:॥5॥

ते रामभवनी जाती शुभ्र मेघापरि उज्वल ।
तृतीय कक्षापर्यंत रथातून प्रवेशती ॥5॥

तमागतमृषिं रामस्त्वरन्निव ससंभ्रमम् ।
मानयिष्यन् स मानार्हं निश्चक्राम निवेशनात ॥6॥

पाहुनी ऋषींना राम त्वरेने मनि संभ्रमे ।
सन्मानण्या महर्षींना गृहाबाहेर येतसे ॥6॥

अभेत्य त्वरमाणोऽयं रथाभ्याशं मनीषिण:।
ततोऽवतारयामास परिगृह्य रथात स्वयम ॥7॥

महर्षींच्या रथापाशी त्वरेने जाउनी तयां ।
हात देउनिया खाली श्रीराम उतरवीती ॥7॥

स चैनं प्रश्रितं दृष्ट्वा सम्भाष्याभिप्रसाद्य च ।
प्रियार्हं हर्षयन् राममित्युवाच पुरोहित:॥8॥

विनये पाहुनी येता त्याला प्रिय वच ऐकण्या ।
प्रसन्न करुनी हर्ष देण्या वदति पुरोहित ॥8॥

प्रसन्नस्ते पिता राम यत्त्वं राज्यमवाप्स्यसि।
उपवासं भवानद्य करोतु सह सीतया ॥9॥

तुज राज्य प्राप्ती होते प्रसन्न म्हणुनी पिता ।
म्हणुनी आज उपवास रात्रि सीतेसह करी ॥9॥

प्रातस्त्वामभिषेक्ता हि यौवराज्ये नराधिप:।
पिता दशरथ: प्रीत्या ययातिं नहुषो यथा ॥10॥

प्रात:कालि अभिषेक यौवराज्यपदी पिता ।
करील ययातिस जैसा केला नहुषाने तसा॥10॥

इत्युक्त्वा स तदा राममुपवासं यतव्रत:।
मन्त्रवत् कारयामास वैदेह्या सहितं शुचि: ॥11॥

असे म्हणुनी त्यांनी मन्त्रोचारणपूर्वक ।
सीतेसहित श्रीरामा उपवासव्रत दीक्षा दिली ॥11॥

ततो यथावद् रामेण स राज्ञो गुरुरर्चित:।
अभ्यनुज्ञाप्य काकुत्स्थं ययौ रामनिवेशनात ॥12॥

यथाविधि वसिष्ठांना नंतर रामे पूजिले ।
तयाच्या अनुमतीने भवन त्यांनी सोडिले ॥12॥

सुहृद्भिस्तत्र रामोऽपि सहासीन: प्रियंवदै:।
सभाजितो विवेशाथ्ताननुज्ञाप्य सर्वश: ॥13॥

मित्रांसवे प्रिय काही व्यतीत काल करोनिया।
शुभेच्छा घेउनी त्यांच्या भुवनी जाइ सांगुनी॥13॥

हृष्टनारीनरयुतं रामवेश्म तदा बभौ ।
यथा मत्तद्विजगणं प्रफुल्लनलिनं सर:॥14॥

हर्षोत्फुल्ल नरनारी युक्त भुवन ते जसे।
पक्ष्यांच्या गुंजने शोभे कमलयुक्त सरोवर॥14॥

स राजभवनप्रख्यात तस्माद् रामनिवेशनात ।
निर्गत्य ददृशे मार्गं वसिष्ठो जनसंवृतम् ॥15॥

राजभवनात श्रेष्ठ रामनिवासाच्यापुढे ।
मार्गात जनसमुदाय जमला वसिष्ठ पाहती ॥15॥

वृन्दवृन्दोर्मिसंघर्षहर्षस्वनवृतस्तदा ।
बभूवुरभिसम्बाधा: कुतूहलजनैर्वृता: ॥16॥

राजमार्गी अयोध्येत जनसमुदाय लोटला ।
राज्याभिषेक रामाचा पहाया जन उत्सुक॥16॥

जनवृन्दौर्मिसंघर्षस्वनवृतस्तदा ।
बभूव राजमार्गस्य सागरस्र्येव निस्वन:॥17॥

जनवृन्द जश्या लाटा आदळती परस्परां ।
कोलाहल त्यांचा भासे जणु सागर गर्जना ॥17॥

सिक्तसम्मृष्टरथ्याहि तथा च वनमालिनी ।
आसीदयोध्या तदह: समुच्छ्रितगृहध्वजा ॥18॥

पथ जलाभिषिक्त स्वच्छ वनराइ सुशोभित।
ध्वजा फडकत होत्या उंचउंच घरावरी ॥18॥

तदा ह्ययोध्यानिलय: सस्त्रीबालाकुलो जन:।
रामाभिषेकमाकांक्षन्नाकाक्षन्नुदयं रवे: ॥19॥

स्त्रिया बालकासह जन अभिषेका पाहण्या उत्सुक।
सूर्योदय लवकर व्हावा करिती कामना अशी ॥19॥

प्रजालंकारभुतं च जनस्यानन्दवर्धनम् ।
उत्सुकोऽभूज्जनो द्रष्टुं तमयोध्यामहोत्सवम्॥20॥

अलंकार प्रजेसाठी जनांचा आनंद वाढवी ।
पहाण्या उत्सुक सर्व अयोध्येतिल महोत्सब ॥20॥

एवं सज्जनसम्बाधं राजमार्गपुरोहित:।
व्यूहन्निव जनौघं तं शनै: राजकुलं ययौ ॥21॥

गर्दीत समुदायाच्या राजामार्गी पुरोहित ।
करुनी दूर तयांना जाती राजमहालाप्रति॥21॥

सिताभ्रशिखरंप्रख्यं प्रासादमधिरुह्य च ।
समीयाय नरेन्द्रेण शक्रेणेय बृहस्पति:॥22॥

शुभ्र सुशोभित भवनी वसिष्ठ मिळती नृपा।
जैसे बृहस्पती इन्द्रा देवराजा मिळ्र जणु ॥22॥

तमागतभिप्रेक्ष्य हित्वा राजासनं नृपः।
पप्रच्छ स्वमतं तस्मै कृतमित्यभिवेदयत ॥23॥

पाहुनी येता त्यांना सिंहासना त्यजुनी नृप ।
पुसे वसिष्ठां माझा अभिप्राय सिद्ध लेला का ॥23॥

तेन चैव तदा तुल्यं सहासीनः सभासदः।
आसनेभः समित्तस्थुः पुजयन्तः पुरोहितः॥24॥

सभासद बसलेले अन्य तेही उठोनिया ।
पुरोहितांचा करती समादर तेव्हांहि ते ॥24॥

गुरुणा स्वभ्यनुज्ञातो मनुजौघं विसृज्य तम् ।
विवेशनःपुरं राजा सिंहो गिरिगुहामिव ॥25॥

आज्ञा गुरुंची घेउनि  जनसमुदाया निरोपुनी ।
गुहेत शिरे सिंह तसा प्रवेशी अन्तःपुरी ॥25॥

तदग्र्यवेष्प्रमदाजनाकुलं महेन्द्र वेश्मप्रतिमं निवेशनम्।
व्यदीपयंश्चारु विवेश पार्थिवः शशीव  तारांगणसंकुलं नभः ॥26॥

नारींनी वस्त्राभूषित भरलेले सुन्दर इन्द्रसदन जसे अश्या।
करी प्रवेश राजमहाली दशरथ जसा चन्द्र तारांगणि नभी ॥26॥

**इति श्री रामायणे श्रीवाल्मीकीये आदिकाव्ये अयोध्याकाण्डे पञ्चमः सर्गः॥5॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 6

गते पुरोहिते रामः स्नातो नियतमानसः।
सह पत्न्या विशालाक्ष्या नारायणमुपागतम् ॥1॥

पुरोहित जाता राम संयमी स्नान करूनिया ।
पत्नीसह विशालाक्षा श्रीनारायण उपासती ॥1॥

प्रगृह्य शिरसा पात्री हविषो विधिवत् ततः।
महते दैवतायाज्यं जुहाय ज्वलितानले ॥2॥

शिरी हविषपात्र घेउनी देति विधिवत आहुती ।
प्रज्वलित अग्नीत शेषशायी नारायणा ॥2॥

शेषं च हविषस्तस्य प्राश्यास्तस्यात्मन: प्रियम् ।
ध्यायन्नारायणं दैवं स्वास्तीर्णे कुशसंस्तरे॥3॥
वाग्यत:सह वैदेह्या भूत्वा नियतमानस:।
श्रीमत्यायतने विष्णो: शिश्ये नरवरात्मज: ॥4॥

यज्ञशेष भक्षिती ते मनोरथ सिद्धीस्तव ।
मौन संयम पाळून श्रीराम वैदेहीसह ॥3॥

ध्याति नारायणा देवा रम्य त्या विष्णुमन्दिरी ।
चटईच्या शय्येवर निद्रा करति ते सुखे ॥4॥

एकयामावशिष्टायां रात्र्यां प्रतिविबुध्य स:।
अलंकारविधिं सम्यक कारयामास वेश्मन:॥5॥

उरता एक प्रहर रात्रीचा उठुनी सेवकां ।
आज्ञा सेवकां देती सभामंडप सजविण्या ॥5॥

तत्र श्रुण्वन् सुखा वाच: सूतमागधवन्दिनाम् ।
पूर्वा संध्यामुपासीनो जजाप सुसमाहित:॥6॥

ऐकत मधुर सुतवाणी प्रात:संध्या करूनिया ।
एकाग्र चित्त होऊनी श्रीराम करती जप ॥6॥

तुष्टाव प्रणतश्चैव शिरसा मधुसूदनम् ।
विमलक्षौमसंवीतो वाचयामास स द्विजान् ॥7॥

रेशमी वस्त्रात श्रीराम स्तवुनी मधुसूदना ।
ब्राह्मणांकडुनी स्वस्ति वाचन करुनी घेतसे ॥7॥

तेषां पुण्याहघोषोऽथ गम्भीरमधुरस्तथा ।
अयोध्यां पूरयामास तूर्यघोषानुनादित:॥8॥

तयांचा पुण्याहघोष नाना वाद्यध्वनी तसे।
मधुर नादे गम्भीर अयोध्यापुरी दुमदुमे ॥8॥

कृतोपवासं तु तदा वैदेह्यासह राघवम्।
अयोध्यानिलयं श्रुत्वा सर्वः प्रमुदितो जनः॥9॥

उपवास व्रत श्रीराम आरंभति सीतेसवे।
ऐकुनी होति हे वृत्त प्रसन्न अयोध्याजन ॥9॥

तत्र पौरजनः सर्वः श्रुत्वा रामाभिषेचनम्।
प्रभातां रजनीं दृष्ट्वा चक्रे शोभयितुं पुरीम् ॥10॥

रामाभिषेक वृत्तास ऐकुनी पुरवासी जन ।
सकाळ होता सज्ज सजविण्या अयोध्यापुरी ॥10॥

सिताभ्रशिखराभेषु देवतायतनेषु च ।
चतुष्पथेषु रथ्यासु चैत्येष्वट्टालकेषु च ॥11॥
नानापण्यसमृद्धेषु वणिजामापणेषु च ।
कुटुम्बिनां समृद्धेषु श्रीमत्सु भवनेषु च ॥12॥
सभासु चैव सर्वासु वृक्षेष्वालक्षितेषु च ।
ध्वजा: समुच्छ्रिता: साधु पताकाश्चाभवंस्तथा ॥13॥

शूभ्रमेघस्पर्शी उंच देवालयशिखरावरी ।
चौकात गल्लिबोळात देववृक्षात सभांमधे ॥11॥
दुकानात वस्तुजात भरलेल्या वणिक्गृही ।
समृद्ध कुटुंबांच्या समृद्ध भवनांमधे ॥12॥
सभागृहे तसे उंच वृक्ष या सर्वांवरी ।
ध्वजा फडकती आणि पताकाही तयासवे ॥13॥

नटनर्तकसङ्घानां गायकानां च गायताम् ।
मन:कर्णसुखा वाच: शुश्राव जनता तत: ॥14॥

नट नर्तक त्यासंगे सुश्राव्य गाति गायक ।
सुखविती जनतेच्या मना श्रवणास सर्व ते ॥14॥

रामाभिषेकयुक्ताश्च कथाश्चक्रुर्मिथो जनाः ।
रामाभिषेके सम्प्राप्ते चत्वरेषु गृहेषु च ॥15॥

शुभ राज्याभिषेकाच्या प्राप्त या समयामुळे ।
रामराज्याभिषेकाच्या चर्चा चौकात गृहातही॥15॥

बाला अपि क्रीडमाना गृहद्वारेषु संघशः ।
रामाभिषवसंयुक्ताश्चक्रुरेव कथा मिथः॥16॥

गृहद्वारी खेळणारी बोलतात परस्परे ।
बालके त्यांना विषय रामराज्याभिषेकचि ॥16॥

कृतपुष्पोपहारश्च धूपगन्धाधिवासित:।
राजमार्ग:कृत: श्रीमान् पौरे रामाभिषेचने ॥17॥

पसरुनी राजमार्गी पुष्पे धूपे सुगंधित ।
सुशोभित जन करती राज्याभिषेकास्तव ॥17॥

प्रकाशकरणार्थं च निशागमनशंकया।
दीपवृक्षांस्तथा चक्रुरनुथ्यासु सर्वश: ॥18॥

रात्र होईल आशंका राज्याभिषेकी त्यास्तव ।
वृक्षापरि दीपस्तंभ मार्गी उभविती जन ॥18॥

अलंकारं पुरस्यैव कृत्वा तत पुरवासिन:।
आकांक्षमाणा रामस्य यौवराज्याभिषेचनम् ॥19॥
समेत्य सङ्घश: सर्वे चत्वरेषु सभासु च ।
कथयन्तो मिथस्तत्र प्रशशंसुर्जनाधिपम् ॥20॥

शृंगारुनि नगरास आकांक्षा मनी धरूनिया ।
रामराज्याभिषेकाची जमती पुरवासी जन ॥19॥

समुदायात जमुनी बोलताना परस्पर ।
प्रशंसा करती राजा दशरथाची शब्दात या ॥20॥

अहो महात्मा राजायमिक्ष्वाकुकुलनन्दन:।
ज्ञात्वा वृद्धं स्वमात्मानं रामं राज्येऽभिषेक्ष्यति ॥21॥

महान किति हा राजा इक्ष्वाकुकुलनन्दन ।
जाणुनी वृद्ध स्वतास रामा अभिषेकिती स्वत:॥21॥

सर्वेह्यनुगृहीता: स्म यन्नो रामो महीपति:।
चिराय भविता गोप्ता दृष्टलोकपरावर:॥22॥

आमचे केवढे भाग्य राम राजा मिळे आम्हा ।
जाणतो जो आम्हा सर्वां करेल रक्षण आमुचे ॥22॥

अनुद्धतमना विद्वान धर्मात्मा भ्रातृवत्सल:
यथा च भ्रातृषु स्निग्धस्तथास्मास्वपि राघव:॥23॥

विनयशील धर्मात्मा विद्वान,बन्धुप्रेमि जो ।
बधूंवर जसे प्रेम तैसे आम्हावरी करी ॥23॥

चिरंजीवतु धर्मात्मा राजा दशरथोऽनघ:।
यत्प्रसादेनाभिषिक्तं रामं द्रक्ष्यामहे वयम ॥24॥

ज्याच्या प्रसादे रामास अभिषेक दिसे आम्हा।
नृप दशरथ निष्पाप धर्मात्मा चिरायु हो ॥24॥

एवंविध कथयतां पौराणां शुश्रुवु: परे।
दिग्भ्यो विश्रुतवृतान्ता: प्राप्ता जानपदा: जना:॥25॥

अभिषेकवृत ऐकोनी येती जानपदवासि जे ।
पुरवासी बोलती जे पडे त्यांच्या कानावरी ॥25॥

ते तु दिग्भ्य: पुरीं प्राप्ता द्रष्टुं रामाभिषेचनम्।
रामस्य पूरयामासु: पुरीं जानपदा जना: ॥26॥

दिशांतुनि नाना येती ते सर्व अयोध्यापुरी ।
पहाण्या राज्याभिषेका उधाणे पुरि त्यामुळे ॥26॥

जनौघैस्तैर्विसर्पद्भिः शुश्रुये तत्र निःस्वनः।
पर्वसूदीर्णवेगस्य सागरस्येव निःस्वनः ॥27॥

जनांचा रव जो होई जनसंमर्द दाटता ।
सागरासम भासे तो वेगाने पर्वकालिच्या ॥27॥

ततस्तदिन्द्रक्षयसंनिभं पुरं दिदृक्षुभिर्जानपदैरुपाहितैः।
समन्ततः सस्वनमाकुलं बभौ समुद्रयादोभिरिवार्णवोदकम् ॥28॥

राज्याभिषेक पहाण्या आलेल्या जने कृत कोलाहलपूर्ण होत ती पुरी।
इन्द्रपुरी समान भासे मकर नक्रादि जलचरें परिपूर्ण महासागर जणु ॥28॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे षष्ठः सर्गः।**

# अयोध्याकाण्ड सर्ग 7

ज्ञातिदासी यतो जाता कैकेय्या तु सहोषिता।
प्रासादं चन्द्रसंकाशमारुरोह यदृच्छया ॥1॥

माहेराहुनि आलेली दासी कैकेयीसवे ।
चंद्रासम तिच्या स्थानी प्रवेशी ती यदृच्छया ॥1॥

सिक्तराजपथां कृत्स्ना प्रकीर्णकमलोत्पलाम् ।
अयोध्यां मन्थरा तस्मात् प्रासादादन्ववैक्षत ॥2॥

शिंपलेले सडे पुष्पे सुशोभित राजपथा ।
छतावरुनि दासी ती पाहे नामे मन्थरा ॥2॥

पताकाभिर्वरारंभिर्ध्वजैश्च समलंकृताम् ।
सिक्तां चन्दनतोयैश्च शिर:स्नातजनैर्युताम् ॥3॥

पताका तैसे ध्वजही शोभती फडकता तिथे ।
चंदनाचे सडे तैसे जन स्नात विभूषित ॥3॥

माल्यमोदक हस्तैश्च द्विजेन्द्रैरभिनादिताम् ।
शुक्लदेवगृहद्वारां सर्ववादित्रनादिताम् ॥4॥

सम्प्रहृष्टजनाकीर्णां ब्रह्मघोषनिनादिताम् ।
प्रहृष्टवरहस्त्यश्वां सम्प्रणर्दितगोवृषाम् ॥5॥

द्विज हर्षनाद करिती हाती माल्य मोदक ।
सुशोभित देवद्वारे सुमधुर वाद्यनादही ॥4॥
आनंदित जन सर्वत्र ब्रह्मघोष निनादत ।
आनंदित गज अश्व हंबरति बैल गाइही ॥5॥

हृष्ट प्रमुदितैः पौरैरुच्छ्रितध्वजमालिनीम् ।
अयोध्यां मन्थरा दृष्ट्वा परं विस्मयमागता ॥6॥

प्रमुदित पौर जन, ध्वज उंच फडकती।
अयोध्येत घडते हे मन्थरा पाहि विस्मये ॥6॥

सा हर्षोत्फुल्लनयनां पाण्डुरक्षौमवासिनीम्।
अविदूरे स्थितां दृष्ट्वा धात्री पप्रच्छ मन्थरा ॥7॥

रामधात्रीस पाही ती प्रफुल्लित वदने उभी।
पीत रेशमि वस्त्रा ती पुसे तिजलाच मन्थरा ॥7॥

उत्तमेनाभिसंयुक्ता हर्षेणार्थपरा सती।
राममाता धनं किं नु जनेभ्य: सम्प्रयच्छति ॥8॥

अतिमात्रं प्रहर्ष: किं नु जनस्यास्य च शंस मे ।
कारयिष्यति किं वापि सम्प्रहृष्टो महीपति: ॥9॥

सखे आज श्रीराममाता वस्त्रालंकारभूषित ।
आनंदे धन लोकां वाटते का प्रसन्न जे ॥8॥
महाराज दशरथ आज आनंदे काय करणार।
कारण काय सर्वांचे मजला संग हे सखि ॥9॥

विदीर्यमाणा हर्षेण धात्री तु परया मुद्रा ।
आचचक्ष्येऽथ कुब्जायै भूयसीण राघवे श्रियमऽ ॥10॥

श्वः पुष्पेण जितक्रोधं यौवराज्येन चानाघम् ।
राजा दशरथो राममभिषेक्ता हि राघवम् ॥11॥

हर्षोत्फुल्ल दासी ती वृत्त कुब्जेस बोलली ।
अत्यानंदे "अगे रामा सम्पत्ति बहु लाभली
"उद्या पुष्य नक्षत्री जितक्रोध निष्पाप जो।
"नृप दशरथ करणार यौवराज्याभिषेक त्या" ॥11॥

धात्र्यास्तु वचनं श्रुत्वा कुब्जा क्षिप्रममर्षित:।
कैलासशिखराकारात् प्रासादादवरोहत ॥12॥

दासीवचन ऐकून जळफळे कुब्जा मनी ।
कैलासशिखरासम प्रासादावरुनी येत खालती॥12॥

सा दह्यमाना क्रोधेन मन्थरा पापदर्शिनी ।
शयनामेव कैकेयीमिदं वचनमब्रवीत ॥13॥

रागाने होउनि लाल कैकेयीस अनिष्ट ही ।
गोष्ट वाटुनि ती बोले पहुडलेल्या त्या तिला ॥13॥

उत्तिष्ठ मूढे किं शेषे भयं त्वामभिवर्तते ।
उपप्लुतमघौघेन नात्मानमवबुध्यसे ॥14॥

मूर्खे झोपसी काय आपत्ती ये तुजवरी ।
दुरवस्थेची जाणीव तुजला होत का नसे ॥14॥

अनिष्टे सुभगाकारे सौभाग्येन विकत्थसे ।
चलं हि तव सौभाग्यं नद्या: स्त्रोत इवोष्णगे॥15॥

भासते तुज सौभाग्य प्रत्यक्ष अनिष्ट परी ।
आटले तव सौभाग्य ग्रीष्मातील नदीपरी ॥15॥

एवमुक्ता तु कैकेयी रुष्टया परुषं वच:।
कुब्जया पापदर्शिन्या विषादमगमत परम ॥16॥

भासवी शुभ वृत्तास अनिष्ट वच हे तिचे।
ऐकता अतिशय दु:ख कैकेयीस होतसे ॥16॥

कैकेयी त्वब्रवीत कुब्जां कच्चित क्षेमं न मन्थरे।
विषण्णवदनां हि त्वां लक्षये भृशदु:खिताम्‌ ॥17॥

म्हणे कुब्जेस कैकेयी अमङ्गल काय ते घडे।
दु:खी दिसतेस तुझ्या विषादहि मुखावरी ॥17॥

मन्थरा तु वच: श्रुत्वा कैकेय्या मधुराक्षरम्‌।
उवाच क्रोधसंयुक्ता वाक्यं वाक्यविशारदा ॥18॥

सा विषण्णतरा भूत्वा कुब्जा तस्यां हितैषिणी ।
विषदयन्ती प्रोवाच भेदतन्ती च राघवम् ॥19॥

मृदुबोल कैकेयीचे ऐकोनी मन्थरा म्हणे ।
चतुर भाषण करण्यात रागे रागे म्हणे तिला ॥18॥
कैकेयीच्या जपणारी हिता खिन्न मनातुनी ।
रामास दूषणे देत विषादमय बोलली ॥19॥

अक्षयं सुमहद् देवि प्रवृत्तं त्वद्विनाशनम् ।
रामं दशरथो राजा यौवराज्येऽभिषेक्ष्यति ॥20॥

सौभाग्य संपले देवी यौवराज्याभिषेकासवे ।
उद्याच दशरथराजे रामास अभिषेकिती॥20॥

सासम्यगाधे भये भग्ना दु:खशोकसमन्विता।
दह्यमानानलेनेव त्वद्धितार्थमिहागता ॥21॥

ऐकोनिया समाचार दु:खी मी शोकव्याकुळ।
चिंताग्नीत जळते मी आले तव हित साधण्या ॥21॥

तव दु:खेन कैकेयि मम दु:खं महद् भवेत ।
त्ववृद्धौ मम वृद्धिश्च भवेदिह न संशय: ॥22॥

तुझ्या दु:खाहुन कैकेयी माझे दु:ख असे महान।
उन्नतीत तुझ्या माझी उन्नति संशय यात ना ॥22॥

नराधिपकुले जाता महिषीं त्वं महीपते:।
उग्रत्वं राजधर्माणां कथं देवि न बुध्यसि ॥23॥

राजकुळी जन्मुनीया राजाची पट्टराणि तू।
महत्व राजधर्माचे का न जाणसि देवि तू ॥23॥

धर्मवादी शठो भर्ता श्लक्ष्णवादी च दारुण:।
शुद्धभावेन जानीषे तेनैवमतिसंहिता ॥24॥

धर्माचरणी म्हणवी परी फसवि भ्राता तुज ।
शुद्ध भाव तुला वाटे परी होतसि वंचिता ॥24॥

उपस्थित: प्रयुञ्जानस्त्वयि सान्त्वमनर्थकम् ।
अर्थेनेवाद्य ते भर्ता कौसल्यां योजयिष्यति ॥25॥

सांत्वना तुझ्या करण्या पति व्यर्थचि राहती ।
मात्र करण्या सम्पन्न कौसल्येलाच मानती ॥25॥

अपवाह्य तु दुष्टात्मा भरतं तव बन्धुषु ।
काल्ये स्थापयिता रामं राज्ये निहतकण्टके ॥26॥

दुष्टहृदयी पाठवि भरतास माहेरी तुझ्या ।
उद्या निष्कंटक राज्ये राघवा अभिषेकि तो ॥26॥

शत्रु: पतिप्रवादेन मात्रेव हितकाम्यया ।
आशीविष इवाङ्गेन बाले परिधृतस्त्वया ॥27॥

पति म्हणुनी शत्रूस माता पुत्रा जशी
बाले खेळविले तू अंकावरी सर्पासम ॥27॥

यथा हि कुर्याच्छत्रुर्वा सो वा प्रत्युपेक्षित:।
राज्ञा दशरथेनाद्य सपुत्रा त्वं तथा कृत:॥२८॥

उपेक्षित शत्रु वा सर्प जसे वागति त्यापरी।
राजा दशरथ तैसा पुत्रासह वागवी तुज ॥२८॥

पापेनानृतसान्त्वेन बाले नित्यं सुखोचिता ।
रामं स्थापयता राज्ये सानुबन्धा हता ह्यसि ॥29॥

सुखासीन बाले तुज खोट्या आश्वासने नृपे।
रामा करुनि अभिषेक सम्बन्धींसह मारिले ॥29॥

सा प्राप्तकालं कैकेयि क्षिप्रं कुरु हितं तव ।
त्रायस्व पुत्रमात्मानं मां च विस्मयदर्शने ॥30॥

सोड विस्मय हितकारी कृति त्वरित करूनिया ।
स्वपुत्राचे तसे माझे कैकेयी तू करी रक्षण ॥30॥

मन्थराया वच: श्रुत्वा शयनात सा शुभानना ।
उत्तस्थौ हर्षसम्पूर्णा चन्द्रलेखेव शारदी ॥31॥

ऐकून मन्थराबोल शय्येवर कैकयी उठे ।
हर्षे हृदय भरलेली शरदी चंद्रमा जणु ॥31॥

अतीव सा तु संतुष्टा कैकेयी विस्मयान्विता ।
दिव्यमाभरणं तस्यै कुब्जायै प्रददौ शुभम ॥32॥

आश्चर्यचकित आणि संतुष्ट होत कैकयी ।
दिव्य आभरणे देई कुब्जेस शुभवार्तेमुळे ॥32॥

दत्त्वा त्वाभरणं तस्यै कुब्जायै प्रमदोत्तमा ।
कैकेयी मन्थरां हृष्टा पुनरेवाब्रवीदिदम् ॥33॥
इदं तु मन्थरे मामाख्यातं परम् प्रियम् ।
एतन्मे प्रियमाख्यातं किं वा भूय: करोमि ते ॥34॥

आभूषणे देउन तीस रमणीउत्तम कैकयी ।
मन्थरेस उद्देशून  आनदे वदली पुन्हा ॥33॥

मन्थरे मज वदलीस अतिप्रिय बोल हे तुझे ।
कौतुक करू कैसे तुझे हे तूच सांगसी ॥34॥

रामे वा भरते वाहं विशेषं नोपलक्षये ।
तस्मात् तुष्टामि यद् राजा रामं राज्येऽभिषेक्ष्यति ॥35॥

रामात भरतामध्ये भेद ना मज वाटतो ।
रामाभिषेके संतुष्ट जर राजा तसे करी ॥35॥

न मे परं किंचिदितो वरं पुनः प्रियं सुवचं वचोऽमृतम् ।
तथा ह्यवोचस्त्वमतः प्रियोत्तरंवरं परं ते प्रददामि तं वृणु ॥36॥

मला अन्य न काही प्रियतर तू बोललिस बोल अमृतमय।
योग्य तू वर श्रेष्ठ मागण्यास अवश्य माग देणार तुला मी ॥36॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे सप्तमः सर्गः॥7॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 8

मन्थरा त्वभ्यसूय्यैनामुत्सृज्याभरणं हि तत ।
उवाचेद ततो वाक्यं कोपदु:खसमन्विता ॥1॥

कैकेयीवच ऐकोनी अव्हेरी आभरणा दिल्या ।
मन्थरा दु:ख कोपाने निन्दुनी तिजला म्हणे ॥1॥

हर्ष किमर्थमस्थाने कृतवत्यसि बालिशे ।
शोकसागरमध्यस्थं नात्मानमवबुध्यसे ॥2॥

अस्थानी कसला हर्ष मूर्खे व्यक्त करिसी तू।
समजे न तुला असंसी दु:खाच्या सागरात तू ॥2॥

मनसा प्रसहामि त्वां देवि दुखार्दिता सती ।
यच्छोचितव्ये हृष्टासि प्राप्य त्वं व्यसनं महत ॥3॥

शोक न करता हर्ष करसी संकटात तू ।
अवस्था तव पाहूनी देवी मी दु:खव्याकुळ ॥3॥

शोचामि दुर्मतित्वं ते का हि प्राज्ञा प्रहर्षयेत ।
अरे: सपत्नीपुत्रस्य वृद्धिं मृत्योरिवागताम ॥4॥

सवतीपुत्र असे शत्रु त्याचा उत्कर्ष मृत्यू जणु ।
हर्ष वाटे तुला याचा मजला शोक होतसे ॥4॥

भरतादेव रामस्य राज्यसाधारणाद् भयम् ।
तद् विचिन्त्य विषण्णास्मि भयं भीताद्धि जायते ॥5॥

भरतापासुन रामास भय राज्यप्राप्तिस्तव । कारण भरताचाही अधिकार राज्यावरी ।
विचाराने दु:खित मी मिळता रामास राज्य तो। दूर करिल आपल्याला भय दूर करण्यास्तव ॥5॥

लक्ष्मणो हि महाबाहू रामं सर्वात्मना गत:।
शत्रुघ्नश्चापि भरतं काकुत्स्थं लक्ष्मणो यथा ॥6॥

लक्ष्मण महावीर पूर्ण रामास अंकित ।
शत्रुघ्नहि भरतास जसा रामास लक्ष्मण ॥6॥

प्रत्यासन्नक्रमेणापि भरतस्यैव भामिनि ।
राज्यक्रमो विसृष्टस्तु तयोस्तावद्यवीयसो:॥7॥

रामानंतर भरता हक्क राज्यावरी असे ।
नसे लक्ष्मण शत्रुघ्ना कनिष्ठ असल्यामुळे ॥7॥

विदुष: क्षत्रचारित्रे प्राज्ञस्य प्राप्तकारिण:।
भयात प्रवेपे रामस्य चिन्तयन्ती तवात्मज ॥8॥

श्रीराम राजनीतिज्ञ कर्तव्य जाणकारही ।
कसे वागवि तव पुत्रा भयाने मी या चिन्तित ।।8।।

सुभगा किल कौसल्या यस्या: पुत्रोऽभिषेक्ष्यते ।
यौवराज्येन महता श्व: पुष्येण द्विजोत्तमै:।।9।।

कौसल्या भाग्यशाली ती पुष्यनक्षत्री उद्या ।
पुत्रा तिच्या अभिषेक करतील द्विजोत्तम।।9।।

प्राप्तां वसुमतीं प्रीतिं प्रतीतां हतविद्विषम् ।
उपस्थास्यसि कौसल्यां दासीवत् त्वं कृताञ्जलि: ।।10।।

ती प्रसन्न असे राज्य निष्कंटक मिळे तिला ।
दासीसम हात जोडून राहशील उद्या उभी ॥10॥

एवं च त्वं सहास्माभिस्तस्या: प्रेष्या भविष्यसि ।
पुत्रश्च तव रामस्य प्रेषत्वं हि गमिष्यति ॥11॥

होसी आम्हासवे तूही जणु दासी तिची तसा ।
तुझा पुत्रहि रामाचा होईल सेवक जणु ॥11॥

हृष्टा: खलु भविष्यन्ति रामस्य परमा: स्त्रिय:।
अप्रहृष्टा भविष्यन्ति स्नुषास्ते भरतक्षये ॥12॥

अन्त:पुरि रामाच्या सीतेसह तिच्या सख्या ।
आनंदित होतील शोकमग्न तुझ्या सुना ॥12॥

तां दृष्ट्वा परमप्रीतां ब्रुवन्ती मन्थरां तत:।
रामस्य गुणान् देवी कैकेयी प्रशशंस ह ॥13॥

कटु बोल मन्थरेचे ऐकोनी अप्रसन्न जी ।
कैकेयी मात्र रामाचे गुण वाखाणित म्हणे ॥13॥

धर्मज्ञो गुणवान् दान्त: कृतज्ञ: सत्यवान् शुचि:।
रामो राजसुतो ज्येष्ठो यौवराज्यमतोऽर्हति ॥14॥

धर्मज्ञ गुणवान दाता कृतज्ञ सत्यवान शुभ ।
ज्येष्ठ राजसुत राम योग्य युवराजपदा ॥14॥

भ्रातॄन भृत्यांश्च दीर्घायु: पितृवत पालयिष्यति ।
संतप्यसे कथं कुब्जे श्रुत्वा रामाभिषेचनम ॥15॥

दीर्घायुषि तो बंधू भृत्यां पित्यासम पाहिल ।
रुष्ट का होसि तू कुब्जे रामाभिषेका ऐकुनी ॥15॥

भरतश्चापि रामस्य ध्रुवं वर्षशतात परम ।
पितृपैतामहं राज्यमवाप्स्यति नरर्षभ:॥16॥

मिळेल भरतालाही राज्य रामानंतर ।
शत वर्षांनंतर जे पिता पितामहांनी भोगले॥16॥

सा त्वमभ्युदये प्राप्ते दह्यमानेव मन्थरे ।
भविष्यति च कल्याणं किमिदं परितप्यसे ॥17॥

अश्या अभ्युदयकाली भविष्य कल्याणप्रद ।
दिसता होत संतप्त जळुनी बोलसी का असे ॥17॥

यथा वै भरतो मान्यस्तथा भूयोऽपि राघवः।
कौसल्यातोऽतिरिक्तं च मम शुश्रूयते बहु ॥18॥

भरताइतके काय त्याहूनी रामाप्रती मज ।
प्रेमादर कारण तो कौसल्येहूनि सेवितो मला ॥18॥

राज्यं यदि हि रामस्य भरतस्यापि तत यदा ।
मन्यते हि यथाऽऽत्मानं यथा भ्रातृस्तु राघव:॥19॥

रामा मिळे जरी राज्य भरतासहि ते मिळे ।
राम कारण बन्धूंना  स्वत:च्या जागि मानतो ॥19॥

कैकेय्या वचनं श्रुत्वा मन्थरा भृशदु:खिता ।
दीर्घमुष्णं विनि:श्वस्य कैकेयीमिदमब्रवीत ॥20॥

कैकेयीचे ऐकुनि बोल मन्थरा अति दु:खित ।
दीर्घ उष्ण श्वास घेत कैकेयीस असे म्हणे ॥20॥

अनर्थदर्शिनी मौर्ख्यान्नात्मानमवबुध्यसे ।
शोकव्यसनविस्तीर्णे मज्जन्ती दु:खसागरे ॥21॥

अनर्था योग्य मानूनि मूर्खे स्वत:स फसविशी ।
अनिष्ट दु:ख विस्तीर्ण बुडता महासागरी ॥21॥

भविता राघवो राजा राघवस्य च य: सुत:।
राजवंशातु भरत: कैकेयि परिहास्यते ॥22॥

रामानंतर राजा पुत्र त्याचाच होइल ।
राजपदापासुन दूर भरत कायम होइल॥22॥

नहि राज्ञ: सुता: सर्वे राज्ये तिष्ठन्ति भामिनी ।
स्थाप्यमानेषु सर्वेषु सुमहाननयौ भवेत ॥23॥

राजाचे सगळे पुत्र राजे होति न भामिनी ।
तसे केले तर मोठा अनर्थ उद्भवू शके ॥23॥

तस्माज्ज्येष्ठे हि कैकेयि राजतन्त्राणि पार्थिवा:।
स्थापयन्त्यनवद्याङ्गि गुणवत्स्वितरेष्वपि ॥24॥

त्यामुळे ज्येष्ठ पुत्रास राज्यभार मिळे जगी ।
गुणवान नसे तो तर गुणवान दुसऱ्या मिळे॥24॥

असावत्यन्तनिर्भग्नस्तव पुत्रो भविष्यति ।
अनाथवत् सुखेभ्यश्च राजवंशाच्च वत्सले ॥25॥

वत्सले तुझ्या पुत्रास राज्याधिकारापासुनी ।
दूर करिता अनाथा परि सुखापासुनि वंचित ॥25॥

साहं त्वदर्थे सम्प्राप्ता त्वं तु मां नावबुद्ध्यसे।
सपत्निवृद्धौ या मे त्वं प्रदेयं दातुमर्हसि ॥26॥

हितास्तव तुझ्या आले मज समजून घेसि ना।
सवतिपुत्र कल्याणे आनंदे सत्कारसी मला ॥26॥

ध्रुवं तु भरतं रामः प्राप्य राज्यमकण्टकम्।
देशान्तरा नाययिता लोकान्तरमथापि वा ॥27॥

निष्कंटक राज्य मिळता भरतास वनांतरी।
परलोकीही वा रामा धाडणे शक्य होइल ॥27॥

बाल एव तु मातुल्यं भरतो नायितस्त्वया।
संनिकर्षाच्च सौहार्दं जायते स्थावरेष्विव ॥28॥

बालवयी भरतास धाडता मातुलगृही ।
स्नेह राजास त्याचा नसे अधिकार त्यामुळे ॥28॥

भरतानुवशात सोऽपि शत्रुघ्नस्तत्समं गत:।
लक्ष्मणो हि यथा रामं तथायं भरतं गत: ॥29॥

भरताच्या विनंतीने शत्रुघ्न जाइ बरोबरी ।
लक्ष्मण जसा रामा शत्रुघ्न भरता तसा ॥29॥

श्रूयते हि द्रुम: कश्चिच्छेतव्यो वनजीवनै:।
संनिकर्षादिषीकामिर्मोचित: परमाद् भयम् ॥30॥

ऐकले की वनवासी निघती वृक्ष तोडण्या ।
भोवति कांटेरी झाडीमुळे वाचे तो त्यातुन ।30॥

गोप्ता हि रामं सौमित्रिर्लक्ष्मणं चापि राघव ।
अश्विनोरिव सौभ्रात्रं तयोर्लोकेषु विश्रुतम् ॥31॥

लक्ष्मण सुमित्रापुत्र रक्षी रामा तयांमध्ये ।
त्यांचे प्रेम लोकी ज्ञात अश्विनीकुमार सम ॥31॥

तस्मान्न लक्ष्मणे रामः पापं किंचित करिष्यति ।
रामस्तु भरते पापं कुर्यादेव न संशयः ॥32॥

त्यामुळे अनिष्ट राम लक्ष्मणाचे नच करी ।
परंतु भरता मात्र अपाय करील निश्चित ।।32।।

तस्माद् राजगृहादेव वनं गच्छतु राघवः।
एतद्धि रोचते मह्यं भृषं चापि हितं तव ।।33।।

म्हणुनि राजगृहातून राम जावो वनामध्ये ।
हेच योग्य मला वाटे तुजलाही हितकारक ।।33।।

एवं ते ज्ञातिपक्षस्य श्रेयश्चैव भविष्यति।
यदि चेद् भरतो धर्मात पित्र्यं राज्यमवाप्स्यति ।।34।।

पित्यापासुन भरता राज्य प्राप्त धर्मे जर ।
तव संबंधिही सर्व कल्याणा पावतील ते ॥34॥

स ते सुखोचितो बालो रामस्य सहजो रिपु:।
समृद्धार्थस्य नष्टार्थो जीविष्यति कथं वशे ॥35॥

सावत्र भाऊ म्हणुनी भरत शत्रु रामास ।
राम राजा होता सुखे जीवित कसा राहू शके ॥35॥

अभिद्रुतमिवारण्ये सिंहेन गजयूथपम् ।
प्रच्छाद्यमानं रामेण भर्तं त्रातुमर्हसि ॥36॥

अरण्ये सिंह हत्तीस त्रास देइ तसा तुझ्या ।
पुत्रा त्रासविल राम त्याचे रक्षण तू करी ॥36॥

दन्निराकृता पूर्वं त्वया सौभाग्यवत्तया ।
राममाता सपत्नी ते कथं वैरं न पापयेत ॥37॥

तुजवरिल पतिप्रेमाने अनादर जिचा केलास ।
राज्या प्राप्त होता त्याचा सूड का नच घेइल॥37॥

यदा च रामः पृथिवीमवाप्स्यते प्रभूतरत्नाकरशैलसंयुताम् ।
तदा गमिष्यस्यशुभं पराभवंसहैव दीना भरतेन भामिनि ॥38॥

राम जेव्हां पृथ्वीस मिळविल समुद्र पर्वत सहित भूमंडला ।
तेव्हां अशुभ पराभूत  भामिनी भरतासह दीन राहशील तु ॥38॥

यदा हि यदा हि रामः पृथिवीमवाप्स्यते ध्रुवं प्रणष्टो भरतो भविष्यति ।
अतो हि संचिन्तय राज्यमात्मजे परस्य चैवास्य विवासकारणम् ॥39॥

राम जेव्हां होईल पृथिवीपति भरत नष्टप्राय तदा बने ॥
म्हणुन विचार कर ज्यामुळे भरता राज्य रामा वनवास मिळे ॥39॥

**इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डेऽष्टमः सर्गः॥8॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 9

एवमुक्ता तु कैकेयी क्रोधेन ज्वलितानना ।
दीर्घमुष्णं विनि:श्वस्य मन्थरामिदमब्रवीत ॥1॥

मन्थरा वच ऐकोनी क्रोधाने लाल कैकयी ।
दीर्घ उष्ण घेत श्वास मन्थरेस वदे असे ॥1॥

अथ राममित: क्षिप्रं वनं प्रस्थापयाम्यहम् ।
यौवराज्येन भरतं क्षिप्रमद्याभिषेचये ॥2॥

वनी रामास धाडीन त्वरित आणि त्यासवे ।
युवराजपदी भरता अभिषेक करवीन मी ॥2॥

इदंत्विदानीं संपश्य केनोपायेन साधये।
भरत: प्राप्नुयाद् राज्यं न तु राम: कथंचन ॥3॥

कसे साधेल हे सांग उपायी कोणत्या मम ।
भरता राज्य लाभेल रामास न कधीच ते ॥3॥

एवमुक्त्वा तु सा देव्या मन्थरा पापदर्शिनी ।
रामार्थमुपहिंसन्तीं कैकेयीमिदमब्रवीत ॥4॥

वळवुनी पापमार्गी असे कैकेयि देविस।
रामाचे हित नाशूनी मन्थरा तिजला वदे ॥4॥

हन्तेदानीं प्रपश्य त्वं कैकेयि श्रूयतां वच:।
यथा ते भरतो राज्यं पुत्र: प्राप्स्यति केवलम् ॥5॥

पहा तू कैकयी आता काय मी करते मम ।
वचना ऐकसी तर तू राज्य भरतासी मिळे ॥5॥

किं न स्मरसि कैकेयी स्मरन्ती वा निगृहसे।
यदुच्यमानमात्मार्थं मत्तस्त्वं श्रोतुमिच्छसि ॥6॥

विसरलीस काय तू की स्मरुनी लपवितेस जे।
बोललीस अनेकदा ते मजकडुनि ऐकावया ॥6॥

मयोच्च्यमानं यदि ते श्रोतुं छन्दो विलासिनी ।
श्रुयतामभिधास्यामि श्रुत्वा चैतद् विधियताम् ॥7॥

माझ्याकडुन ऐकावे असे इच्छा विलासिनी ।
सांगते ऐकुनी कार्य त्याप्रमाणे करीसि तू ॥7॥

श्रुत्वेवं वचनं तस्या मन्थरायास्तु कैकयी ।
किंचिदुत्थाय शयनात स्वास्तीर्णादिदमब्रवीत ॥8॥

शय्येत आराम करी जी किंचित उठुनि कैकेयी ।
मन्थरा वच ऐकुनी तिजला म्हणु लागली ॥8॥

कथयस्व ममोपायं केनोपायेन मन्थरे ।
भरत: प्राप्नुयाद् राज्यं न तु राम: कथंचन॥9॥

मन्थरे मजला सांग उपाये कोणत्या मिळे।
भरता राज्य रामाला न मिळे कधीचही ॥9॥

एवमुक्ता तदा देव्या मन्थरा पापदर्शिनी।
रामार्थमुपहिंसन्ती कैकेयीमिदमब्रवीत ॥10॥

कैकेयीवच ऐकोनी मन्थरा पापकारिणि ।
अहितकर श्रीरामा उपाय सांगते तिला ॥10॥

पुरा देवासुरे युद्धे सह राजर्षिभि: पति:।
अगच्छत त्वामुपादाय देवराजस्य साह्यकृत ॥11॥

पूर्वी देवासुर युद्धे राजर्षीसह पती तुला ।
देवराजा सहाय्यार्थ गेले युद्धात घेउनि ॥11॥

दिशमास्थाय कैकेयि दक्षिणां दण्डकान्‍ प्रति ।
वैजयन्तमिति ख्यातं पुरं यत्र तिमिध्वज:॥12॥

स शम्बरं इति ख्यात: शतमायो महासुर:।
ददौ शक्रस्य संग्रामं देवसङ्घरनिर्जित:॥13॥

दक्षिणे दण्डकारण्ये वैजयन्त नगरामध्ये ।
शम्बर नाम प्रसिद्ध राही असुर कैकयी ॥12॥
शतमाया ज्ञात त्याच्या तिमि चिन्ह ध्वजामध्ये ।
अजिंक्य देवांना तो युद्ध इन्द्रासवे करी सुरू ॥13॥

तस्मिन् महति संग्रामे पुरुषान् क्षतविक्षतान् ।
रात्रौ प्रसुप्तान् जन्ति स्म तरसापास्य राक्षसा:॥14॥

क्षत विक्षत युद्धात झालेले वीर झोपता ।
मारती राक्षस रात्री शय्येतुनि ओढूनी तयां ॥14॥

तत्राकरोन्महायुद्धं राजा दशरथस्तदा ।
असुरैश्च महाबाहु: शस्त्रैश्च शकलीकृत:॥15॥

त्यावेळी दशरथ राजा महायुद्ध असुरांसवे ।
करता तनु तयांचे असुरे शस्त्रे जर्जर ॥15॥

अपवाह्य त्वया देवि संग्रामान्नष्टचेतन:।
तत्रापि विक्षत: शस्त्रे पतिस्त्ते रक्षितस्त्वया ॥16॥

बेशुद्ध पतिला दूर रणभूमीवरून नेउनी ।
शस्त्रे घायाळ झालेल्या त्यास वाचवलेस तू ॥16॥

तुष्टेन तेन दत्तौ ते द्वौ वरौ शुभदर्शने ।
स त्वयोक्त: पतिर्देव यदेच्छेयं तदा वरम् ॥17॥
गृह्णीयां तु तदा भर्तेस्तथेत्युक्तं महात्मना।
अनभिज्ञा ह्यहं देवि त्वयैव कथितं पुरा ॥18॥

संतुष्ट पतिने तेव्हां वर दोन तुला दिले ।
मागेन योग्य वेळी म्हटलेस तू शुभदर्शने ॥17॥

मानले ते नरेशाने महात्मा वचनी दृढ ।
मज माहित नव्हते जे तूच सांगितले मला ॥18॥

कथैषा तव तु स्नेहान्मनसा धार्यते मया ।
रामाभिषेकसम्भारान्निगृह्य विनिवर्तय ॥19॥

स्नेहे सांगितलेस ते मनी राखुन ठेवले ।
रामाभिषेक बदलाया वर वापर आज तू ॥19॥

तौ च याचस्व भर्तारं भरतस्याभिषेचनम्।
प्रव्राजनं च रामस्य वर्षाणि चतुर्दश ॥20॥

वरांनी मागुनि घेई भरताभिषेक पाठव ।
चौदा वर्षे वनवासी रामा भर्त्याकडून तू ॥20॥

चतुर्दश हि वर्षाणि रामे प्रव्राजिते वनम् ।
प्रजाभावगत: स्नेह: स्थिर: पुत्रो भविष्यति ॥21॥

वनात राहता चौदा वर्षे राम प्रजा तुझ्या ।
पुत्रावरील स्नेहाने करतील तया स्थिर ॥21॥

क्रोधागारं प्रविश्याद्य क्रुद्धवाश्वपते: सुते।
शेष्वानन्तर्हितायां त्वं भूमौ मलिनवासिनी ॥22॥

कन्ये हे अश्वपतीच्या वस्त्रा मलिन धारुनी ।
क्रोधागारात कोपाने जमिनीवर झोप तू ॥22॥

मा स्मैन प्रत्युदीक्षेथा मा चैनमभिभाषया ।
रुदन्ती पार्थिवं दृष्ट्वा जगत्यां शोकलालसा ॥23॥

नृप येता न पाही त्या न संभाषणही करी ।
रडत पाहुनि त्यांना धरतीवर झोप तू ॥23॥

दयिता त्वं सदा भर्तुरत्र मे नास्ति संशयः।
त्वत्कृते च महाराजो विशेदपि हुताशनम् ॥24॥

लाडकी अससि राजाची यात ना मुळि संशय ।
अग्नीतहि तुझ्यासाठी प्रवेश करतील ते ॥24॥

न त्वां क्रोधयितुं शक्तो न क्रुद्धां प्रतिदीक्षितुम् ।
तव प्रियार्थं राजा प्राणानपि परित्यजेत ॥25॥

तुजवरी होणे कृद्ध वा तुला क्रोधात पाहणे।
तयां शक्य न ते तुजसाठी प्राणही देतील ते ॥25॥

न ह्यतिक्रमितुं शक्तस्तव वाक्यं महीपति:।
मन्दस्वभावे बुध्यस्व सौभाग्यबलमात्मन:॥26॥

टाळणे तव बोलास महाराजांस शक्य ना ।
स्मरसी आपुल्या बाले सौभाग्याच्या बळास तू ॥26॥

मणिमुक्तासुवर्णानि रत्नानि विविधानि वा ।
दद्याद् दशरथो राजा मा स्म तेषु मन: कृथा:॥27॥

मणि मौक्तिक रत्नेही सुवर्णहि तयासवे ।
देतील दशरथ त्याला होणे न वश तू मुली ॥27॥

यौ तौ देवासुरे युद्धे वरौ दशरथो ददौ ।
तौ स्मरथ महाभागे सोऽर्थो न त्वा क्रमेदति ॥28॥

देवासुर युद्धात वर जे तुजला दिले ।
विसरू नको महाभागे हट्ट सोडू नको तुझा ॥28॥

यदा तु ते वरं दद्यात स्वयमुत्थाप्य राघव:।
व्यवस्थाप्य महाराजं त्वमिमं वृणुया वरम् ॥29॥

उठवुनी भूमीवरुनी महाराज स्वत: तुला ।
देण्यास वर उद्युक्त शपथेने माग हेच तू ॥29॥

रामप्रवजनं दूरं नव वर्षाणि पञ्च च।
भरत: क्रियतां राजा पृथिव्यां पार्थिवर्षभ ॥30॥

रामास वनवासात धाडा वर्षे चतुर्दश ।
भरतास करा राजा भूमंडली असे म्हण ॥30॥

चतुर्दश हि वर्षाणि रामे प्रव्राजिते वनम् ।
रूढस्य कृतमूलस्य शेषं स्थास्यति ते सुत:॥31॥

पाठविता चौदा वर्षे वनवासात राघवा ।
राज्य दृढ त्या काळात करील सुत तो तुझा ॥31॥

रामप्रवाजनं चैव देवि याचस्व तं वरम् ।
एवं सेत्स्यन्ति पुत्रस्य सर्वार्थास्तव कामिनि ॥32॥

वरे रामास वनवास मागण्या विसरू नको ।
तेव्हांच तव पुत्राचे मनोरथ सिद्ध होतिल ॥32॥

एवं प्रव्राजितश्चैव रामोऽरामो भविष्यति।
भरतश्च गतामित्रस्तव राजा भविष्यति ॥33॥

वनवासी यापरी राम जाई निष्प्रभ होउनी ।
तुझा भरत होईल राजा शत्रुविना तदा ॥33॥

येन कालेन रामश्च वनात प्रत्यागमिष्यति ।
अन्तर्बहिश्च पुत्रस्ते कृतमूलो भविष्यति ॥34॥

वनवासातून येईल राम परतून जेधवा ।
पुत्र तोवरि होईल दृढ राज्यावरी तव ॥34॥

संगृहीतमनुष्यश्च सुहृद्भिः साकमात्मवान् ।
प्राप्तकालं नु मन्योऽहं राजानं वीतसाध्वसा ॥35॥
रामाभिषेकसंकल्पान्निगृह्य विनिवर्तय ।

वाढेल सैन्यबल त्याचे मित्रांसह जितेन्द्रिय ।
आत्ताच समय योग्य भाग पाडी दशरथा ॥35॥
संकल्पापासुन निवृत्त अभिषेका रामाचिया ॥

अनर्थमर्थरूपेण ग्राहिता सा ततस्तया ॥36॥
हृष्टा प्रतीता कैकेयी मन्थरामिदमब्रवीत ।
सा हि वाक्येन कुब्जाया: किशोरीवोत्पथं गता ॥37॥
कैकेयी विस्मयं प्राप्य पतं परमदर्शना ।

अनर्था देत अर्थास कैकेयी बोलता असे ॥36॥
कैकेयीहि त्यावरती विश्वासून आनंदित ।
सूज्ञ असुनि ती होत किशोरी पथ वंचित ॥37॥
मन्थरा बुद्धिने होत विस्मित आणि बोलली ।

प्रज्ञां ते नावजानामि श्रेष्ठे श्रेष्ठाभिधायिनि ॥38॥
पृथिव्यामसि कुब्जानामुत्तमा बुद्धिनिश्चये ।
त्वमेव तु ममार्थेषु नित्ययुक्ता हितैषिणी ॥39॥

श्रेष्ठ तू असशी कुब्जे सांगसी मज योग्य जे ॥38॥
पृथ्वीवरील कुब्जेत सर्वोत्तम असशी तू ।
सदैव मम हित रक्षी कार्य सिद्धी मनी तुझ्या ॥39॥

नाहं समयबुद्ध्येयं कुब्जे राज्ञश्चिकीर्षितम् ।
सन्ति दु:संस्थिता कुब्जा: वक्रा: परमपापिका ॥40॥

तुझ्यामुळेच समजे षड्यंत्र रचिले नृपे।
कुब्जा इतर बेडौल वाकड्या पापकारिणी ॥40॥

त्वं पद्ममिव वातेन संनता प्रियदर्शना।
उरस्तऽमिनिविष्टं वै यावत् स्कन्धात् समुन्नतम् ॥41॥

वाते अवनत जैशि पद्मिनीच तू सुंदर ।
वक्षस्थळ कुब्जेपरि खांद्यापर्यंत उन्नत ॥41॥
मन्थरेच्या सल्ल्यामुळे कैकेयीस तिच्यात अनेक गुण दिसू लागलेत

अधस्ताच्च्योदरं शान्तं सुनाभमिव लज्जितम् ।
प्रतिपूर्णं च जघनं सुपीनौ च पयोधरौ ॥42॥

त्याखालि सुन्दर नाभीयुक्त उदर लज्जित ।
कारण स्तन स्थूल तैसे जघन विस्तृत ॥42॥

विमलेन्दुसमं वक्त्रमहो राजसि मन्थरे ।
जघनं तव निर्मृष्टं रशनादामभूषितम् ॥43॥

निर्मल चन्द्रासम शोभे तव मुखमंडल ।
अलंकृत कटिभाग स्वच्छ सुन्दर शोभतो॥43॥

जङ्के भृशमुपन्यस्ते पादौ च व्यायतावुभौ ।
त्वमाताभ्यां सक्थिभ्यां मन्थरे क्षौमवासिनी ॥44॥

अग्रती मम गच्छन्ती राजसेऽतीव शोभते ।

पिंढऱ्या असती गोल पायही लांब सुन्दर ।
जांघा विशाल त्यामुळे रेशमी वस्त्र नेसुनी ॥44॥
मजपुढे चालसी तेव्हां शोभसी अतिसुन्दर ।

आसन् याः शम्बरे मायाः सहस्रमसुराधिपे ॥45॥
हृदये ते निविष्टास्ता भूयश्चान्याः सहस्रशः।
तदेव स्थगु यद् दीर्घ रथघोण्मिवायतम् ॥46॥
मतयः क्षत्रविद्याश्च माश्चात्र वसन्ति ते ।

शम्बरासुरास ज्ञात माया सहस्त्र जाणसी ||45||
असती तव हृदयात सहस्त्र माया आणखी ।
मति.स्मृति राजनीती नाना प्रकार ज्यामधे ||46||
भरलेले कुबड मोठे पाठीवरी रथाग्रचि ।

अत्र तेऽहं प्रमोक्ष्यामि मालां कुब्जे हिरण्मयीम ||47||
अभिषिक्ते च भरते राघवे च वनं गते ।
जात्येन च सुवर्णेन सुनिष्टप्तेन सुन्दरि ||48||
लब्धार्था च प्रतीता च लेपयिष्यामि ते स्थगु।

होता राज्याभिषेक भरता राम जाता वनी तुज॥47॥
सफल मनोरथ माझे झाल्यावर कुब्जे तुला ।
उच्चप्रति सुवर्णाची माला या कुबडावरी ॥48॥
घालून चंदनाचा लेप त्यावर देइन ।

मुखे च तिलकं चित्रं जातरूपमयं शुभम् ॥49॥
कारयिष्यामि ते कुब्जे शुभान्याभरणानि च ।
परिधाय शुभे वस्त्रे देवतेव चरिष्यसि ॥50॥

भालावरि सुवर्णाचा सुन्दर तिलक शुभ ।॥49॥

लावेन तुला कुब्जे दिव्य आभूषणांसवे ।
धारुनी सुंदर वस्त्रे देवतेसम विहरशील ॥50॥

चन्द्रमाह्वयमानेन मुखेनाप्रतिमानना ।
गमिष्यसि गतिं मुख्यां गर्वयन्ती द्विषज्जने ॥51॥

चंद्रास लाजविणाऱ्या अप्रतिम सुन्दर मुखे ।
शत्रुमध्ये सर्वश्रेष्ठ गर्वाने चालशील तू ॥51॥

तथापि कुब्जा: कुब्जाया: सर्वाभरणभूषिता:।
पादौ परिचरिष्यन्ति यथैव त्वं सदा मम ॥52॥

करसी जशी तू माझी तशीच कुब्जा अनेक ।
करतील तव सेवा त्याही अलंकारभूषित ॥52॥

इति प्रशस्यमाना सा कैकेयीमिदमब्रवीत ।
शयानां शयने शुभ्रे वेद्यामग्निशिखामिव ॥53॥

येवढी स्तुति ऐकोनी शुभ्र अग्निशिखेपरी ।
शय्येवरील कैकेयी तिजला मन्थरा वदे ॥53॥

गतोदके सेतुबन्धो न कल्याणि विधीयते ।
उत्तिष्ठ कुरु कल्याणं राजानमनुदर्शय ॥54॥

जाता निघुनिया पाणी बांध निष्फळ बांधणे ।
म्हणून त्वरा भेटाया कर कोपगृही नृपा ॥54॥

तथा प्रोत्साहिता देवी गत्वा मन्थरया सह ।
क्रोधागारं विशालाक्षी सौभाग्यमदगर्विता ॥55॥
अनेकशतसाहस्रं मुक्ताहार वराङ्गना ।
अवमुच्य वराहांणि शुभान्याभरणानि च ॥56॥

मन्थरा वचने येत भानावरि देवि कैकयी ।
सौभाग्यमद गर्विष्ठ क्रोधागारात जातसे ॥55॥

शत सहस्र मूल्याचे मोत्यांचे हार काढुनी ।
आभूषणे सुन्दर तैसी लागे काढुनि फेकण्या॥56॥

तदा हेमोपमा तत्र कुब्जावाक्यवशंगता ।
संविश्य भूमौ कैकेयी मन्थरामिदमब्रवीत ॥57॥

प्रभावित कुब्जावाक्ये कैकेयी हेमसुन्दर ।
पडुनी जमिनीवरती मन्थरेला म्हणे असे ॥57॥

इह वा मां मृतां कुब्जे नृपायावेदयिष्यसि ।
वनं तु राघवे प्राप्ते भरत: प्राप्स्यते क्षितिम् ॥58॥

सुवर्णेन न मे ह्यर्थो न रत्नेन च भोजनैः ।
एष मे जीवितस्यान्तो रामो यद्यभिषिच्यते ॥59॥

राज्याभिषेक भरता रामा वनवास तसा ।
न होता मृत मी सांग कुब्जे नृपाला तू असे॥58॥
सुवर्ण अथवा रत्ने भोजने वेगवेगळ्या ।
मी न संतुष्ट होईन रामाभिषेके मृत ॥59॥

ततः पुनस्तां महिषीं महीक्षितो वचोभिरत्यर्थमहापराक्रमैः।
उवाच कुब्जा भरतस्य मातरं हितं वचो राममुपेत्य चाहितम् ॥60॥

पुन्हा कुब्जा वदे अतिक्रूर भरतमातेस बोल जे ।
हितकारक भरतास परि रामा अहितकर ॥60॥

प्रपत्स्यते राज्यमिदं हि राघवो यदि ध्रुवं त्वं ससुता च तप्स्यसे ।
ततो हि कल्याणि यतस्य तत तथा यथा सुतस्ते भरतोऽभिषेक्ष्यते ॥61॥

मिळेल रामास जर राज्य कल्याणि दुःखात तू पडशील स्वसुतासह ।
निःसंशय हे म्हणून प्रयत्न करी राज्याभिषेक भरतासच व्हावया ॥61॥

तथातिविद्धा महिषीति कुब्जया समाहता वागिषुभिर्मुहुर्मुहुः।
विधाय हस्तौ हृदयेऽतिविस्मिता शशंस कुन्जां कुपिता पुनः पुनः॥62।

पुन:पुन्हा वार करुनी शब्दबाणे घायाळ कैकेयीस कुब्जा करीतसे ।
त्यामुळे विस्मित क्रुद्धा ती ठेउनी हृदयावर हात बोलली असे ॥62॥

यमस्य वा मां विषयं गतामितो निशम्य कुब्जे प्रतिवेदयिष्यामि।
वनं गते वा सुचिराय राघवे समृद्धकामो भरतो भविष्यति ॥63॥

जाऊन राम वर्षे अनेक वनात मनोरथ सफल होईल भरताचे ।
नसता यमलोकात मी गेलेली वृत्त हे सांगशील कुब्जे महाराजांस॥63॥

अहं नैवास्तरणानि न स्रजो न चन्दनं नाञ्जनपानभोजनम् ।
न किंचिदिच्छामि न चेहं जीवनं न चेदितो गच्छति राघवो वनम् ॥64॥

जर राम वनात न जातसे तदा न शैय्या,पुष्पहार,चन्दन, अंजन ।
न पान न भोजन न वस्तु काहिही मला होत जीवनहि नको असे ॥64॥

अथैवमुक्त्वा वचनं सुदारुणं निधाय सर्वाभरणानि भामिनी ।
असंस्कृतामास्तरेण मेदिनी तदाधिशिश्ये पतितेव किन्नरी ॥65॥

कठोर ऐश्या वचनास बोलुनी आभूषणा सर्व काढुनि भामिनी।
शैय्येविना जमिनीवरी झोपलेली जणु किन्नरी उतरे स्वर्गातुनी ॥65॥

उदीर्णसौरम्भतमोवृतानना तदावमुक्तोत्तममाल्यभूषणा ।
नरेन्द्रपत्नी विमना बभूव सा तमोवृता द्यौरिव मग्नतारका ॥66॥

मुख तिचे जणु अन्धःकारेआच्छादित अङ्ग आभूषण पुष्पहार विरहित।
उदास ती राजराणी दिसे जणु तारकाविरहित आकाश काळोखभारित ॥66॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे नवमः सर्गः।**

# अयोध्याकांड सर्ग 10

विदर्शिता यदा देवी कुब्जया पापया भृशम् ।
तदा शेते स्म सा भूमौ दिग्धविद्धेव किन्नरी ॥1॥

ऐसे भरविले जाता कुब्जेकडुनी पापिणी ।
पडे भूमिवरी तीरे विषारी विद्ध किन्नरी॥1॥

निश्चित्य मनसा कृत्यं सा सम्यगिति भामिनी।
मन्थरायै शनैः सर्वमाचचक्षे विचक्षणा ॥2॥

योग्य शिकवण वाटूनी निश्चये भामिनी वदे ।
मनातिल आपल्या सांगे मन्थरेस हळूहळू ॥2॥

सा दीना निश्चयं कृत्वा मन्थरावाक्यमोहिता।
नागकन्येव नि:श्वस्य दीर्घमुष्णं च भामिनी ॥3॥
मुहूर्तं चिन्तयामास मार्गमात्मसुखावहम् ।

मोहित मन्थरावचने दीन भामिनि कैकयी ।
नागकन्येसम दीर्घ श्वास घेउन फूत्कारी ॥3॥
सुखदायक मार्गाचा विचार करते मनी ।

सा सुहृच्चार्थकामा च तं निशाम्य विनिश्चयम् ॥4॥
बभूव परमप्रीता सिद्धिं प्राप्तेव मन्थरा ।

हितकारी तिची सिद्ध मनोरथ जी करी सुहृद् ॥4॥
मन्थरा अत्यानंदित जणु तिला सिद्धि प्राप्त हो ॥

अथ सा रुषिता देवी सम्यक कृत्वा विनिश्चयम् ॥5॥
संविवेशाबला भूमौ निवेश्य भृकुटिं मुखे ।

करोनी निश्चय देवी रुष्ट होऊनि झोपली ॥5॥
अबलेसम भूमीवर भुवया वक्र करोनिया ।

ततश्चित्राणि माल्यानि दिव्यान्याभरणानि च ॥6॥
अपविद्धानि कैकेय्या तानि भूमिं प्रपेदरे ।

आभूषणे पुष्पहार तिने फेकुनि जे दिले॥6॥
भूमीवर पडलेले दिसती सर्व इतस्ततः ।

तया तान्यपविद्धानि माल्यान्याभरणामि च ॥7॥
अशोभयन्त वसुधा नक्षत्राणि यथा नभः ।

शोभा आकाशाची तारे विस्कळित ज्यापरी ॥7॥
तशी माळा नि अलंकार भूमिची वाढवीति ते ।

क्रोधागारे च पतिता सा बभौ मलिनाम्बरा ॥8॥
एकवेणीं दृढां बद्ध्वा गतसत्त्वेव किन्नरी।

मलिन वस्त्र नेसून घट्ट एकाच वेणित ॥8॥
क्रोधागारे पडे जणु गलितगात्र किन्नरी ।

आज्ञाप्य तु महाराजो राघवस्याभिषेचनम् ।
उपस्थानमनुज्ञाप्य प्रविवेश निवेशनम् ॥9॥

राज्याभिषेकाचि रामाच्या सिद्धता करण्यास्तव॥9॥
आज्ञापून मंत्रिगणां प्रवेशती नृप गृहे ।

अद्य रामाभिषेको वै प्रसिद्ध इति जज्ञिवान् ॥10॥
प्रियाहां प्रियमाख्यातुं विवेशान्त: पुरं वशी ।

राज्याभिषेक रामाचा सर्वां वृत्त प्रसिद्ध हे ॥10॥
प्रिय पत्नीस सांगाया अन्त:पुरि प्रवेशती ।

स कैकेय्या गृहं श्रेष्ठं प्रविवेश महायशा:॥11॥
पाण्डुराभ्रमिवाकाशं राहयुक्तं निशाकर: ।

कैकेयिभुवनी श्रेष्ठ प्रवेशी नृप दिग्गज ॥11॥
पदार्पण करी जणु चंद्र श्वेतमेघयुक्त नभी ।

शुकबर्हिसमायुक्तं क्रौंचहंसरुतायुतम् ॥12॥
वादित्ररवसंघुष्टं कुब्जावामनिकायुतम् ।
लतागृहैश्चित्रगृहैश्चम्पकाशोकशोभतैः ॥13॥

शुक मोर हंस क्रौच कलरव करिती तिथे ॥12॥
अशोक वेली चम्पक लताभवनी सुशोभित।
मधुरवाद्यसंगीत दासी दिसति चित्रमन्दिरे ॥13॥

दान्तराजतसौवर्णवर्णवेदिकाभिः समायुतम् ।
नित्यपुष्पफलैर्वृक्षैर्वापीभिरूपशोभितम् ॥14॥

हस्तिदन्त रुपे सोने मंडित भवनास त्या ।
नित्य फळे पुष्पे वृक्ष बहरलेले वापि सुन्दर ॥14॥

दान्तराजतसौवर्णै:संवृत्तं परमासनै:।
विविधैरत्नपानैश्च भक्षैश्च विविधैरपि ॥15॥
उपपन्नं महाहैश्च भूषणैस्त्रिदिवोपमम् ।

आसने सोने चांदी हस्तिदंते आच्छादित ।
भक्ष्य भोज्य पदार्थानी भरलेले भवन ते ॥15॥
आभूषणे बहूमूल्य शोभे गृह स्वर्गापरी ।

स प्रविश्य महाराजः स्वमन्तःपुरमृद्धिमत ॥16॥
न ददर्श स्त्रियं राजा कैकेयीं शयनोत्तमे ।

समृद्ध भवनी राजा दशरथ प्रवेशता ॥16॥
शयनी उत्तम कैकेयी न दिसे त्यास तेधवा ।

स कामबलसंयुक्तो रत्यर्थो मनुजाधिपः॥17॥
अपश्यन्दयितां भार्यां पप्रच्छ विषसाद च ।

तो कामबलसंयुक्त करण्या भार्येस मोदित ॥17॥
तिज न पाहुनी पृच्छा विषादे करु लागला ।

नहि तस्य पुरा देवीं तां वेलामत्यवर्तत ||18||
न च राजा गृहं शून्यं प्रविवेश कदाचन |
ततो गृहगतो राजा कैकेयीं पर्यपृच्छत ||19||
यथापुरमविज्ञाय स्वार्थलिप्सुमपण्डिताम् |

भूपागमने पूर्वी ना जाई अन्यत्र कैकयी ||18||
भवनी शून्य अश्या राजा पूर्वी कधी न प्रवेशला |
त्यामुळे विचारू लागे कैकेयीविषयी न जाणुनी ||19||
की मूर्ख स्त्री आपला स्वार्थ सिद्ध करण्या पाहते |

प्रतिहारी त्वथोवाच संत्रस्ता तु कृताञ्जलिः॥20॥
देव देवीं भृशं क्रुद्धा क्रोधागारमभिद्रुता।

दासी घाबरलेली जोडुनी हात बोलली ॥20॥
देवी वेगे अतिक्रुद्ध क्रोधागारी प्रवेशिल्या।

प्रतिहार्या वचः श्रुत्वा राजा परमदुर्मनः ॥21॥
विषसाद पुनर्भूयो लुलितव्याकुलेन्द्रियः।

दासीवचन ऐकूनी राजा अतिदुःखित ॥21॥
गात्रे बधिर झालेला विषाद करु लागला।

तत्र तां पतितां भूमौ शयनामतथोचितम् ॥22॥
प्रतप्त इव दु:खेन सोऽपश्यज्जगतीपति:।

दु:खसंतप्त राजाने क्रोधागारे भूमीवरी ॥22॥
पाहिले अस्ताव्यस्त पडलेल्या अश्या तिला ।

स वृद्धस्तरुणीं भार्यां प्राणेभ्योऽपि गरीयसम् ।
अपाप: पापसंकल्पां ददर्श धरणीतले ।
लतामिव विनिष्कृतां पतितां देवतामिव ॥24॥

वृद्ध राजाची तरुण भार्या प्राणाहुनी प्रिय ॥23॥

निष्पाप नृपा दिसली जिच्या पाप मनी असे ।
वेली जणु तुटलेली पडलेली देवता जणु ॥24॥

किन्नरीमिव निर्धूतां च्युतामप्सरसं यथा ।
मायामिव परिभ्रष्टां हरिणीमिव संयताम् ॥25॥

दिसे जणु स्वर्गभ्रष्ट किन्नरी अप्सरा च्युत ।
हरिणी जणु जाळयात लक्ष्यभ्रष्ट माया जणु ॥25॥

करेणुमिव दिग्धेन विद्धां मृगयुना वने।
महागज इवारण्ये स्नेहात परमदु:खिताम् ॥26॥

परिमृज्य च पाणिभ्यामभिसंत्रस्त्चेतन:।
कामी कमलपत्राक्षीमुवाच वनितामिदम् ॥27॥

संत्रस्त व्याधे वनी विषबाणे विद्ध हस्तिनिला जसा ।
गजराज स्नेहवशे करी स्पर्श तसा नृप ॥26॥
स्पर्श प्रेमे करी भार्या कैकेयी कमलाक्षिस ।
मनी संत्रस्त तो होत कुरवाळित तिला म्हणे ॥27॥

न तेऽहमभिजानामि क्रोधमात्मनि संचितम् ।
देवि केनाभियुक्तासि केन वासि विमानिता ॥28॥

कोपसी मजवरि ऐसे न वाटे मग कोणती ।
व्यक्ती तिरस्कार करी वा निन्दा करतसे तुझी ॥28॥

यदिदं मम दु:खाय शेषे कल्याणि पांसुषु ।
भूमौ शेषे किमर्थं त्वं मयि कल्याणचेतसि ॥29॥
भूतोपहृतचित्तेव मम चित्तप्रमाथिनि ।

मला जर दु:ख देण्यास भूमीवरि पडलीस तू ।
तया कारण कोणते जर चिन्तितो सदैव मी ॥29॥
कल्याण तव मी वाटे पिशाच्चे घेरले तुला ।

सन्ति मे कुशला वैद्यास्त्वभितुष्टाश्च सर्वश: ॥30॥
सुखितां त्वां करिष्यन्ति व्याधिमाचक्ष्व भामिनि ।

सांग रोग तुला होई कोणता वैद्य आपले ।
कुशल आयुर्विद्येत करतील सुखी तुला ॥30॥

कस्य वापि प्रियं कार्यं केन्वा विप्रियं कृतम् ॥31॥
क:प्रियं लभतामद्य को वा सुमहदप्रियम् ।

करणे प्रिय कुणाचे वा केले अप्रिय कुणी ॥31॥
कुणा करणे आनंदी वा करणे शासन कुणा।

मा रौत्सीर्मा च कार्षीस्त्वं देवि सम्परिशोषणम् ||32||
अवध्यो वध्यतां को या वध्य: को वा विमुच्यताम् |
दरिद्र: को भवेदाढ्यो द्रव्यवान् वाप्यकिंचन: ||33||

देवी रडू नको देहा नको कष्टवु सांग की ||32||
अवध्या मारणे कोणा किंवा वध्यास सोडणे |
दरिद्र्या धनवान किंवा धनाढ्या खंक करायचे ||33||

अहं च हि मदीयाश्च सर्वे तव वशानुगा:|
न ते कंचिदभिप्रायं व्याहन्तुमहमुत्सहे ||34||

आत्मनो जीवितेनापि ब्रूहि यन्मनसि स्थितम् ।

तुझ्या आज्ञेत आम्ही माझ्यासह सगळे मम ।
इच्छा कुठलीहि तुझी अपुरी नच राहिल ॥34॥
प्राणही तुझ्यासाठी काहीही स्पष्ट सांग तू ।

बलमात्मनि जानन्ती न मां शङ्कितुमर्हसि ॥35॥
करिष्यामि तव प्रीतिं सुकृतेनापि ते शपे ।

बळ माझे तुला ज्ञात शंका का धरिसी मनी ॥35॥
पुण्याचि शपथ घेतो तुला प्रिय करेन ते ।

यावदावर्तते चक्रं तावती मे वसुंधरा ॥36॥
द्राविडाः सिन्धुसौवीराः सौराष्ट्रा दक्षिणापथाः।
वङ्गाङ्गमगधा मत्स्याः समृद्धाः काशिकौशलाः ॥37॥

जोवरी सूर्य भ्रमण करी पृथ्वि ममाधिन ॥36॥
सिन्धु, द्रविड,सौवीर, सौराष्ट्र, दक्षिणापथ ।
अङ्ग,वङ्ग, काशी, मत्स्य मगध,कोशल यांसह ॥37॥

तत्र जातं बहु द्रव्यं धनधान्यमजाविकम् ।
ततो वृणीष्व कैकेयि यतस्ते भयमागतम् ।

त्यात उत्पन्न होणारे धन धान्य प्राणिही ।
माग काहिहि कैकेयी मनी तव जे येतसे ॥38॥

किमायासेन ते भीरु उत्तिष्ठोत्तिष्ठ शोभने ।
तत्त्वं मे ब्रूहि कैकेयि यतस्ते भयमागतम् ।
तत ते व्यपनयिष्यामि नीहारमिव रश्मिवान् ॥39॥

येवढे क्लेश का घेसी शोभने ऊठ सांग तू ।
भय कुणापासुन वाटे करीन दूर ते झणी ।
जसे दूर धुके होते उगवता सूर्य नभी ॥39॥

तथोक्ता सा समाश्वस्ता वक्तुकामा तदप्रियम् ।
परिपीडयितुं भूयो भर्तारमुपचक्रमे ॥40॥

ऐकुनी वचना त्याच्या कैकेयी शान्त होउनी ।
पीडा अधिक त्या देण्या उद्युक्त ती जाहली ॥40॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे दशम: सर्ग:॥10॥**

# रामायण अयोध्याकाण्ड सर्ग 11

तं मन्मथशरैर्विद्धं कामवेगवशानुगम ।
उवाच पृथिवीपालं कैकेयी दारुणं वच: ॥1॥

पीडित कामबाणाने कामवेग वशीभुत ।
पृथ्विपतीस कैकेयी कठोर वच बोलली॥1॥

नास्मि विप्रकृता देव केनचिन्नवमानिता ।
अभिप्रायस्तु मे कश्चित तमिच्छामि त्वया कृतम ॥2॥

कोणी न मज दे त्रास अपमान न कोणिही ।
मनी इच्छा असे एक करावी पूर्ण आपण ॥2॥

प्रतिज्ञा प्रतिजानीष्व यदि त्वं कर्तुमर्हसि ।
अथ ते व्याहरिष्यामि यथाभिप्रार्थितं मया ॥3॥

प्रतिज्ञा करावी तैशी करणार असला जर ।
तेव्हांच मागणि माझी काय ती सांगते तुम्हा ॥3॥

तामुवाच महाराज कैकेयीमीषदुत्स्मय:।
कामी हस्तेन संगृह्य मूर्धजेषु भुवि स्थिताम् ॥4॥

वदती किंचित हसुनी महाराज कामाधिन।
भूमीवरील तिजला वदती अंकी घेउनी ॥4॥

अवलिप्ते न जानासि त्वत्त: प्रियतरो मम।
मनुजो मनुजव्याघ्राद् रामादन्यो न विद्यते ॥5॥

जाणसी सुभगे नरश्रेष्ठ श्रीरामाविण अन्य ना ।
कोणी मानव जो मला तुजहूनि अधिक प्रिय ॥5॥

तेनाजय्येन मुख्येन राघवेण महात्मना ।
शपे ते जीवनाण ब्रूहि यन्मनसेप्सितम ॥6॥

त्या अजेय रामाच्या जीवाची शपथ घेउनी ।
सांगतो मजला सांग इच्छा मनातील तुझी ॥6॥

यं मुहूर्तमपश्यंस्तु न जीवे तमहं ध्रुवम् ।
तेन रामेण कैकेयि शपे ते वचनक्रियाम् ॥7॥

दो घडी जो ना दिसता जीवित राही नच मी ।
त्या रामाची शपथ घेत कैकेयी सांगतो तुला॥7॥

आत्मना चात्मजैश्चान्यैर्वृणे यं मन्जर्षभम् ।
तेन रामेण कैकेयि शपे ते वचनक्रियाम् ॥8॥

माझ्या इतर सर्व पुत्रांच्या किमतीत मी ।
ज्या नरश्रेष्ठास वांछितो त्याची शपथ घेउनी ॥8॥

भद्रे हृदयमप्येतदनुमृश्योद्धरस्व मे ।
एतत समीक्ष्य कैकेयि ब्रूहि यत साधु मन्यसे ॥9॥

प्रिये हृदय जाणूनी कर उद्धार सांगुनी ।
विचार ऐकुनि माझा वाटते योग्य जे तुज ॥9॥

बलमात्मनि पश्यन्ती न विशङ्कितुमर्हसि।
करिष्यामि तव प्रीतिं सुकृतेनापि ते शपे ॥10॥

सामर्थ्य मम जाणूनी शङ्का न धरि हे प्रिये ।
शपथेवर सुकृतांच्या करेन प्रिय जे तुज ॥10॥

सा तदर्थमना देवी तमभिप्रायमागतमऽ।
निर्माध्यस्थ्याच्च हर्षाच्च बभाषे दुर्व्चं वच:॥11॥

क्षण सिद्धीचा आपुल्या आला समजून ती ।
राजा वश हो म्हणुनी तया दुर्वचन बोलली ॥11॥

तेन वाक्येन संहृष्टा तमभिप्रायमात्मन:।
व्याजहार महाघोरमभ्यागतमिवान्तकम् ॥12॥

संतुष्ट नृपवाक्ये ती अभिप्राय भयंकर ।
यमराजसम नृपा या शब्दे ती बोलली ॥12॥

यथा क्रमेण शपसे वरं मम ददासि च ।
तच्छृण्वन्तु त्रयस्त्रिंशद् देवा: सेन्द्रपुरोगमा: ॥13॥

राजन मज शपथेवर क्रमश: वर आपण ।
देण्या उद्युक्त ऐकावे देवांनि इंद्रासह तेहतिस ॥13॥

चंद्रादित्यो नभश्चैव ग्रहा रात्र्यहनी दिश:।
जगच्च पृथिवी चेय सगन्धर्वा: सराक्षसा:॥14॥

निशाचराणि भूतानि गयुहेषु गृहदेवताः।
यानि चान्यानि भूतानि जानीयुर्भाषितं तव ॥15॥

चंद्रमा सूर्य आकाश ग्रह रात्र दिशा दिन।
जग सर्व पृथिवी गन्धर्व राक्षासहि त्यांसवे ॥14॥
निशाचर भूते सर्व गृहात गृहदेवता ।
सर्व भूते तशी अन्य साक्षी ते आपुल्या वचा ॥15॥

सत्यसंधो महातेजा धर्मज्ञः सत्यवाक्शुचिः।
वरं मम ददात्येव सर्वे श्रुण्वन्तु दैवताः ॥16॥

शुद्धाचरणी देती हे महाराज मजला वर
धर्मज्ञ सत्यवादी जे ऐकाहो सर्व देवता ॥16॥

इति देवीं महेश्वासं परिगृह्याभिशस्य च ।
ततः परमुवाचेदं वरदं काममोहितम् ॥17॥

काममोहित होऊनी उद्युक्त देण्या हो वर ।
स्तुतिने कह्यात घेत कैकेयी वदली तया ॥17॥

स्मर राजन् पुरा वृत्तं तस्मिन् देवासुरे रणे ।
तत्र त्वां च्यावयच्छत्रुस्तव जीवितमन्तरा ॥18॥

महाराज आठवा पूर्वी देवासुर युद्ध चालता ।
घायाळ शत्रुने केले प्राण केवळ वाचले ॥18॥

तत्र चापि मया देव निक्षेपौ मृगयाम्यहम् ।
जाग्रत्या यतमानायास्ततो मे प्रददौ वरौ ॥19॥

त्या रात्रि युद्धस्थानी मी जागुनि यत्ने आपणा ।
वाचविले म्हणुनी दिधले वर दोन आपण मला॥19॥

तौ दत्तौ च वरौ देव निक्षेपौ मृगयाम्यहम् ।
तवैव पृथिवीपाल सकारो रघुनन्दन ॥20॥

रघुनन्दन पृथ्वीपाल वर ते राखून ठेवले ।
आज या समयी द्यावे मागणी करितेच मी॥20॥

तत प्रतिश्रुत्य धर्मेण न चेद् दास्यसि मे वरम्।
अद्यैव हि प्रहास्यामि जीवितं त्वद्विमानिता ॥21॥

धर्मानुसार ऐकूनी वर द्याल न आपण ।
अपमानित मी प्राणां त्यजीन मम आजला॥21॥

वाङ्मात्रेण तदा राजा कैकेय्या स्ववशे कृत:।
प्रचस्कंद विनाशाय पाशं मृग इवात्मन:॥22॥

सापडे मृग पाशात स्वनाशास्तव ज्यापरी ।
नृप कैकेयीवचनी प्रतिज्ञा करुनि सापडे ॥22॥

ततः परमुवाचेदं वरदं काममोहितं ।
वरौ देवौ त्वया देव तदा दत्तौ महीपते ॥23॥
तौ तावदमद्यैव वक्ष्यामि शृणु मे वचः ।
अभिषेकसमारम्भो राघवस्योपकल्पितः॥24॥
अनेनैवाभिषेकेण भरतो मेऽभिषिच्यताम् ।

काममोहित राजास त्यानंतर कैकयी वदे।

वर तेव्हां जे दिधले मज आपण महीपते ॥23॥
आज मी मागुन घेते ऐका मी काय बोलते।
अभिषेक समारंभ योजिला रामासाठि जो ॥24॥
सामग्रित करा त्याच राज्याभिषेक भरतास ।

यो द्वितीयो वरो देव दत्तः प्रीतेन मे त्वया ॥25॥
तदा देवाऽसुरे युद्धे तस्य कालोऽयमागतः।

जो देवासुर युद्धात दुसरा वर प्रीतिने ॥25॥
दिधला आपण तोही मागण्या वेळ हीच ती ।

नव पञ्च च वर्षाणि दण्डकारण्यमाश्रित:।।26।।
चीराजिनधरो धीरो रामो भवतु तापस:।
भरतो भतामद्य यौवराज्यमकण्टकम् ।।27।।

तपस्वी बनुनी रामे वल्कले नेसुनी वनी ।।26।।
करावे दण्डकारण्ये वास्तव्य वर्षे चतुर्दश।
निष्कंटक भरतास युवराजपद प्राप्त हो ।।26।।

एष मे परम: कामो दत्तमेव वरं वृणे ।
अद्य चैव हि पश्येयं प्रयन्तं राघवं वने ।।28।।

इच्छा अशि असे माझी वर द्यावेत हे असे ।
पहावे वनि रामास जाताना आजच्या दिनी ॥28॥

स राजराजो भव सत्यसंगर: कुलं च शीलं च हि जन्मरक्ष च ।
परत्र वासे हि वदन्त्यनुत्तमं तपोधना: सत्यवचो हितं नृणाम् ॥29॥

तुम्हीच राजेश्वर सत्यवादी बनून कुल शील रक्षण कराल ।
तपस्वि सांगति श्रेष्ठ सत्य कल्याणकारी परलोकि तेही ॥29॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकादश: सर्ग: ॥11॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 12

ततः श्रुत्वा महाराजः कैकेय्या दारुणं वचः।
चिन्तामभिसमापेदे मुहूर्तं प्रतताप च ॥1॥

कठोर ऐकुनी बोल महाराज कैकेयिचे ।
दु:खात बुडुनी जाती करती संताप मनी ॥1॥

किं नु मेऽयं दिवास्वप्नश्चित्तमोहोऽपि वा मम ।
अनुभूतोपसर्गो वा मनसो वाप्युपद्रव ॥2॥

हे दिवास्वप्न असे की भ्रम माझ्या मनातला ।
उपसर्ग भूताचा की मन व्याधिग्रस्त मम ॥2॥

इति संचिन्त्य तद् राजा नाध्यगच्छन् तदासुखम् ।
प्रतिलभ्य तत: संज्ञां कैकेयीवाक्यतापित:॥3॥

विचार ऐसा करुनी बुडे दु:खी महान तो ।
भानावर पुन्हा येता संतापे स्मरता वच ॥3॥

व्यथितो विक्लवश्चैव व्याघ्रीं दृष्ट्वा यथा मृग:।
असंवृतायामासीनो जगत्यां दीर्घमुच्छ्वसन् ॥4॥

मण्डले पन्नगो रुद्धो मन्त्रैरिव महाविषः।

होई व्यथित पाहूनी वाघिणीस जसा मृग ।
तसे पीडित नृप होती कैकेयीस पाहुनी ॥4॥
दीर्घ श्वास जसा सर्प मन्त्र अवरुद्ध घेति ते ।

अहो धिगिति सामर्षो वाचमुत्वा नराधिपः॥5॥
मोहमापेदिवान्भूयः शोकोपहतचेतनः।

“असो धिक्कार “बोलून नृप पुन्हा मूर्च्छित ॥5॥
चेतना हो जणू लुप्त शोकवश झाल्यामुळे ।

चिरेण तु नृप: संज्ञां प्रतिलभ्य सुदु:खित:॥6॥
कैकेयीमब्रवीत् क्रुद्धो निर्दहन्निव तेजसा ।

बऱ्याच वेळाने शुद्ध येउनी अतिदु:खित ॥6॥
तेजे दग्ध करी ऐश्या क्रोधे भार्येस बोलती ।

नृशंसे दुष्टचारित्रे कुलस्यास्य विनाशिनी ॥7॥
किं कृतं तव रामेण पापे पापं मयापि वा ।

दयाहीन दुराचारी कुलनाशक हे स्त्रिये ॥7॥
रामाने अथवा मीही काय त्रास तुला दिला ।

सदा ते जननीतुल्यां वृत्तिं वहति राघव:॥8॥
तस्यैव त्वमनर्थाय किंन्मित्त्मिहोद्यता।

जननीसम रामाने सदा वागविले तुज ॥8॥
अनर्थासाठि त्याच्याच होसी तू निमित्त का ।

त्वं मयाऽऽत्मविनाशाय भवनं स्वं निवेशिता ॥9॥
अविज्ञानान्नृपसुता व्याला तीक्ष्णविषा यथा ।

जणु स्वनाशास्तव मी आणिले तुजला गृही ॥9॥
न ज्ञात राजकन्येच्या रूपात जहरी नागिण ।

जीवलोको यदा सर्वो रामस्याह गुणस्तवम् ॥10॥
अपराधं कमुद्दिश्य त्यक्ष्यामीष्टमहं सुतम् ।

रामाचे गुण गातात जीवलोकात सर्वही ॥10॥
अपराधे कोणत्या सांग त्यागू प्रिय पुत्रा मम ।

कौसल्यां च सुमित्रां च त्यजेयमपि वा श्रियम् ॥11॥
जीवितं चात्मनो रामं न त्येव पितृवत्सलम् ।

कौसल्या सुमित्रा किंवा राजलक्ष्मीहि सोडिन ॥11॥
प्राणप्रिय पितृभक्ता रामा शक्य न सोडणे ।

परा भवति मम प्रीतिर्दृष्ट्वा तनयमग्रजम् ॥12॥
अपश्यतस्तु मे रामं नष्टं भवति चेतनम् ।

ज्येष्ठ पुत्रास पाहून परम प्रेम दाटे मनी ॥12॥
न दिसे मज तो जेव्हां अचेतन जणु होत मी ।

तिष्ठेल्लोको विना सूर्य सस्यं वा सलिलं विना ॥13॥
न तु रामं विना देहे तिष्ठेतु मम जीवितम् ।

सूर्याविण संसार जलाविण धान्य येइल ॥13॥
परि रामाविना प्राण राही न देही मम ।

तदलं त्यजतामेष निश्चय: पापनिश्चये ॥14॥
अपि ते चरणौ मूर्ध्ना स्पृशाम्येष प्रसीद मे ।
किमर्थं चिन्तितं पापे त्वया परमदारुणम् ।15॥

नको वर मागू सोडी हट्ट हा पापनिश्चये ॥14॥
ठेवतो मस्तक पायी माझ्यावरि कृपा करी ।
कशास्तव असा क्रूर विचार धरिसी मनी ॥15॥

अथ जिज्ञाससे मां त्वं भरतस्य प्रियाप्रिये ।
अस्तु यत्तत्वया पूर्वं व्याहतं राघवं प्रति ॥16॥

जाणण्या इच्छिसी भरत प्रिय आहे किती मज ।
राज्याभिषेक करतो त्या वराने पहिल्या तुझ्या ॥16॥

स मे ज्येष्ठसुत: श्रीमान धर्मज्येष्ठ इतीव मे।
तत त्वया प्रियवादिन्या सेवार्थं कथितं भवेत ॥17॥

राम ज्येष्ठ मम पुत्र धर्माचरणीहि ज्येष्ठ तो ।
ऐसे तू म्हणसी सेवा त्याने करावी यास्तव ॥17॥

तच्छ्रुत्वा शोकसंतप्ता संतापयसि मां भृशम ।
आविष्टासि गृहे शून्ये सा त्वं परवशं गता ॥18॥

वार्तेने करिसी शोक मज संताप देसि तू ।
भवनी शून्य या भूत बाधे परवश होसि का ॥18॥

इक्ष्वाकूणां कुले देवि सम्प्राप्त: सुमहानयम् ।
अनयो नयसंपन्ने यत्र ते विकृता मति:॥19॥

इक्ष्वाकु वंशे अन्याय घोर आहे उपस्थित ।
अशी बुद्धि तुझी झाली देवी विकृत यापरी ॥19॥

नहि किंचिदयुक्तं वा विप्रियं वा पुरा मम ।
अकरोस्त्वं विशालाक्षि तेन न श्रद्दधामि ते ॥20॥

विपरित अप्रिय वा विशालाक्षि यापूर्वी तू ।
कधी नच केले काही अविश्वसनीय आज हे ॥20॥

ननु ते राघवस्तुल्यो भरतेन महात्मना ।
बहुशो हि स्म बाले त्वं कथा: कथयसे मम ॥21॥

भरतासम तुज राम वाटतो हे अनेकदा ।
तूच सांगितले पूर्वी मजला संभाषणामध्ये ॥21॥

तस्य धर्मात्मनो देविं वने वासं यशस्विन:।
कथं रोचयसे भीरु नव वर्षाणि पञ्च च ॥22॥

यशस्वी धर्मात्म्यास चौदा वर्षे वनामध्ये ।
पाठवाया प्रेमळ देवी कसे आवडते तुला ॥22॥

अत्यन्तसुकुमारस्य तस्य धर्मे कृतात्मन:।
कथं रोचयसे वासमरण्ये भृशदारुणे ॥23॥

अतिसुकुमार जो धर्म मनापासुनि पाळतो ।
वनवास तया योग्य वाटे पाषाण हृदयि तुज॥23॥

रोचयस्यभिरामस्य रामस्य शुभलोचने ।
तव शुशृषमाणस्य किमर्थं विप्रवासनम् ॥24॥

सेवाशुश्रूषा तव जो सदा करि शुभलोचने ।
धाडण्या इच्छिसी रामा कशास्तव देशान्तरी॥24॥

रामो हि भरताद् भूयस्तव शुश्रूषते सदा ।
विशेषं त्वयि तस्मात तु भरतस्य न लक्षये ॥25॥

भरताहुनि श्रीराम सेवा अधिक तुझी करी ।
अधिक त्याहुनी भरते केलेली मी न पाहिली ॥25॥

शुश्रूषां गौरवं चैव प्रमाणं वचनक्रियाम ।
कस्तु भूयस्तरं कुर्यादन्यत्र पुरुषर्षभात ॥26॥

आज्ञापालन करणे तसे गुरुजनां सेवणे।
गौरव करणे यात त्याच्याहुन कोण तत्पर ॥26॥

बहूनां स्त्रीसहस्त्राणां बहूनां चोपजीवनाम् ।
परिवादोऽपवादो वा राघवे नोपपद्यते ॥27॥

असंख्य स्त्रिया तैसे भृत्यजन कोणासही ।
रामाविषयी अपवाद नसे कसलाहि संशय ॥27॥

सान्वयन् सर्वभूतानि रामः शुद्धेन चेतसा ।
गृह्णाति मनुजव्याघ्रः प्रियैर्विषयवासिनः॥28॥

पुरुषसिंह श्रीराम शुद्ध हृदये सान्त्वना।
प्रजाजना देउनिया आनंदित सर्वा करी ॥28॥

सत्येन लोकाञ्जयति द्विजान्‌ दानेन राघवः।
गुरूञ्छुश्रूषया वीरो धनुषा युधि शात्रवान्‌ ॥29॥

सत्य वागुनि लोकांना दाने ब्राह्मणां तसे।
गुरूंना करुनी सेवा बाणे युद्धात जिंकि तो ॥29॥

सत्यं दानं तपस्त्यागो मित्रता शौचमार्जवम्‌।
विद्या च गुरुशुश्रूषा धृवाण्यैतानि राघवैः॥30॥

सत्य,दान,तप,त्याग, पावित्र्य,मैत्री,आर्जव ।
विद्या गुरुशुश्रूषा हे सर्व रामामध्ये गुण ॥30॥

तस्मिन्नार्जवसंपन्ने देवि देवोपमे कथम् ।
पापमाशंससे रामे महर्षिसमतेजसि ॥31॥

महर्षिसमान तेजस्वी देवतातुल्य श्रीरामा।
अनिष्ट करण्या देवी इच्छा का मनि येतसे ॥31॥

न स्मराम्यप्रियं वाक्यं लोकस्य प्रियवादिन:।
“स कथं त्वत्कृते रामं वक्ष्यामि प्रियमप्रियम् ॥32॥

न स्मरे अप्रिय वाक्य श्रीराम बोलला कुणा ।
तुजसंबंधि अप्रिय कैसे बोलेन मी तयासवे ॥32॥

क्षमा यस्मिंस्तपस्त्याग: सत्य धर्म कृतज्ञता ।
अप्यहिंसा च भूतानां तमृते का गतिर्मम ॥33॥

तप त्याग क्षमा, सत्य कृतज्ञता तैसी दया ।
सर्वांप्रति मनी ज्याच्या गति न मज त्याविण॥33॥

मम युद्धस्य कैकेयि गतान्तस्य तपस्विन:।
दीनं लालप्यमानस्य कारुण्यं कर्तुमर्हसि ॥34॥

वृद्ध मी मरणासन्न शोचनीय अवस्था मम।
करी दया मजवरी कैकेयी याचितो तुला ॥34॥

पृथिव्यां सागरान्तायां यत किंचिदधिगम्यते ।
तत सर्वं तव दास्यामि मा च त्वं मन्युमाविश ॥35॥

असे जे समुद्रपर्यन्त धरेवर देत मी तुला ।
दुराग्रह परी सोडी मृत्युदंड जणू मला ॥35॥

अञ्जलिं कुर्मि कैकेयि पादौ चापि स्पृशामि ते ।
शरणं भव रामस्य माधर्मो मामिहं स्पृशेत ॥36॥

जोडतो हात कैकेयी पायही धरतो तुझे ।
देई शरण श्रीरामा पाप लागो न हे मला ॥36॥

इति दु:खाभिसंतप्तं विलपन्तमचेतनम् ।
घूर्णमानं महाराजं शोकेन समभिप्लुतम् ॥37॥
पारं शोकार्णवस्याशु प्रार्थयन्तं पुन:पुन: ।
प्रत्युवाचाय कैकेयी रौद्रा रौद्रतरं वच:॥38॥

दु:खभारे महाराज अचेतन विलापित ।
शोकमग्न होती ते नष्टप्रज्ञ पुन्हापुन्हा ॥37॥

शोकसागरी बुडुनी प्रार्थती ते अनेकदा ।
कैकेयी हृदय न द्रवे वदे कठोर आणखी ॥38॥

यदि दत्त्वा वरौ राजन् पुन: प्रत्यनुतप्यसे।
धार्मिकत्वं कथं वीरं पृथिव्यां कथयिष्यसि ॥39॥

राजन् वर देऊनि पश्चाताप करता जर ।
डिंडिम पिटता कैसा धार्मिक म्हणुनि भूवरी ॥39॥

यदा समेता बहवस्त्वया राजर्षय: सह।
कथयिष्यन्ति धर्मज्ञ तत्र किं प्रतिवक्ष्यसि ॥40॥

वराविषयि राजर्षी बहु धर्मज्ञ येउनी ।
विचारता तयां काय उत्तर द्याल आपण ॥40॥

यस्या: प्रसादे जीवामि या च मामभ्यपालयत ।
तस्या: कृता मया मिथ्या कैकेय्या इति यक्षसि ॥41॥

म्हणाल ना असे की मी प्रसादे जीवित जिच्या ।
वर देता तिज केलेली प्रतिज्ञा असत्य मी ॥41॥

किल्विषं त्वं नरेन्द्राणां करिष्यसि नराधिप।
यो दत्वा वरमद्यैव पुनरन्यापि भाषसे ॥42॥

वर देउन जर त्याच्या विरुद्ध बोलाल तुम्ही।
कलंक सर्व कुलाच्या नृपांना लावतील ते ॥42॥

शैब्य: श्येनकपोतीये स्वमांसं पक्षिणे ददौ ।
अलर्कश्चक्षुषी दत्त्वा जगाम गतिमुत्तमम् ॥42॥

कबुतरा वाचवण्या ससाण्या मांस दे शिबी ।
नेत्र दोन्ही करी दान अलर्क अंध ब्राहमणा ॥42॥

सागर: समयं कृत्वा न वेलामतिवर्तते ।
समयं मानृतं कार्षी: पूर्ववृत्तमनुस्मरन्॥43॥

प्रतिज्ञा स्मरुनी सीमा सागर न ओलांडतो ।
पूर्वजा स्मरुनी तैसे प्रतिज्ञा भंग ना करा॥43॥

स त्वं धर्मं परित्यज्य रामं राज्येऽभिषिच्य च ।
सह कौसल्यया नित्यं रन्तुमिच्छसि दर्मते ॥45॥

परि आपणा अधर्माने रामा अभिषेक करूनिया ।
कौसल्येसह आनन्दी रत होणे इष्ट वाटते ॥45॥

भवत्वधर्मो धर्मो वा सत्यं वा यदि वानृतम् ।
यत्त्वया संश्रुतं मह्यं तस्य नास्ति व्यतिक्रम:॥46॥

अधर्म अथवा धर्म सत्य किंवा असत्यही ।
प्रतिज्ञा आपण केली परिवर्तन होइ त्यात ना ॥46॥

अहं हि विषमद्यैव पीत्वा बहु तवाग्रत:।
पश्यतस्ते मरिष्यामि रामो यद्यभिषिच्यते ॥47॥

बरेच विष प्राशून आपणापुढतीच मी ।
मरेन जर रामास राज्याभिषेक जाहला ॥47॥

एकाहमपि पश्येयं यद्यहं राममातरम् ।
अञ्जलिं प्रतिगृह्णन्ती श्रेयो ननु भृतिर्मम ॥48॥

दिन एक राममातेस राजमाता म्हणूनिया।
पाहणे जोडता हात मरणे योग्य त्याहुनी ॥48॥

भरतेनात्मना चाहं शपे ते मनुजाधिप।
यथा नान्येन तुष्येयमृते रामविवासनात ॥49॥

शपथेने भरताच्या सांगते रामा पाठवा ।
कुठल्याही वरे अन्य न संतुष्ट नराधिपा ॥49॥

एतावदुक्त्वा वचनं कैकेयी विरराम ह ।
विलम्पतं च राजानं न प्रतिव्याजहार सा ॥50॥

एवढे बोलुनि कैकेयी थांबे राजाकडे तिने ।
केले दुर्लक्ष करुनी जो आक्रंदन याचना करी ॥50॥

श्रुत्वा तु राजा कैकेय्या वाक्यं परमशोभनम्।
रामस्य च वने वासमैश्वर्यं भरतस्य च ॥51॥
नाभ्यभाषत कैकेयीं मुहूर्तं व्याकुलेन्द्रियः।
प्रेक्षतानिमिषो देवीं प्रियामप्रियवादिनीम् ॥52॥

रामा वनवास भरतास राज्याभिषेक वाक्य हे ।
अमंगल कैकेयीचे ऐकुनी राजा व्याकुल ॥51॥

बोले ना मुहूर्त एक एकटक पहातसे ।
प्रिय राणीकडे ऐसे बोले जी अप्रिय वच ॥52॥

तां हि वज्रसमां वाचमाकर्ण्य हृदयाप्रियाम् ।
दु:खशोकामयीं श्रुत्वा राजा न सुखितोऽभवत ॥53॥

दु:खशोकामयी बोल वज्रासम कठोर जे ।
नष्ट हो शान्ति राजाची कैकेयीकडुनि ऐकुनि॥53॥

स देव्या व्यवसायं च घोरं च शपथं कृतम् ।
ध्यात्वा रामेति नि:श्वस्य च्छिन्नस्तरुरियापतत ॥54॥

घोर निश्चय देवीचा स्मरुनी शपथही तिची ।
कोसळे तरुपरी छिन्न “हे राम” म्हणोनिया ॥54॥

नष्टचित्तो यथोन्मत्तो विपरीतो यथातुरः।
हततेजा यथा सर्पो बभूव जगतीपतिः॥55॥

चेतना लुप्त उन्मादी रोगी विपरीत प्रकृती ।
मन्त्रे निस्तेज जसा सर्प तसा निश्चेष्ट होतसे ॥55॥

दीनयाऽऽतुरया वाचा इति होवाच कैकयीम् ।
अनर्थमिममर्थाभं केन त्वमुपदेशिता ॥56॥

बोलती आतुर दीन वाणिने कैकेयिस ।
वाटे अनर्थ तुज योग्य कुणाचा उपदेश हा ॥56॥

भूतोपहतचित्तेव ब्रुवन्ती मां न लज्जसे ।
शीलव्यसनमेतत्ते नाभिजानाम्यहं पुरा ॥57॥

भूते दूषित तव चित्त बोलण्या हो न लज्जित ।
विचार तव हे क्षुद्र न पूर्वी कधि जाणिले ॥57॥

बालायास्तत्त्विदानीं ते लक्षये विपरीतवत् ।
कुतो वा ते भयं जातं या त्वमेवंविधं वरम् ॥58॥

राष्ट्रं भरतमासीनं वृणीवे राघवं वने ।
विरमैतेन भावेन त्वमेतेनानृतेन च ॥59॥

विपरीत वर्तन ऐसे बाल्यावस्थेत ना तव।
कसले भय तुज वाटे मागतेस असे वर ॥58॥
भरतास राज्य वनवास रामास तव मागणे ।
विचार तुच्छ नि दुष्ट तया दे तू सोडुनी ॥59॥

यदि भर्तुः प्रियं कार्यं लोकस्य भरतस्य च ।
नृशंसे पापसंकल्पे क्षुद्रे दुष्कृतकारिणिं ॥60॥

लोक, भर्ता, तसा पुत्र यांचे प्रिय करण्यास्तव ।
क्षुद्रे पापसंकल्पे सोडी क्रूर विचार हा ॥60॥

किं नु दु:खमलीकं वा मयि रामे च पश्यसि।
“न कथंचिदृते रामाद् भरतो राज्यमावसेत ॥61॥

तुज रामात वा माझ्यात काय दु:खद वाटते ।
भरत न स्वीकारील रामाविण राज्य हे ॥61॥

रामादपि हि तं मन्ये धर्मतो बलवत्तरम् ।
कथं द्रक्ष्यामि रामस्य वने गच्छेति भाषिते ॥62॥

मुखवर्णं विवर्णं तु यथैवेन्दमुपप्लुतम् ।

धर्मपालन त्यालाही समजे रामाहूनही ।
रामास वनि जाण्यास सांगता विवर्ण मुख॥62॥
भरताचे कसे पाहू राहुग्रस्त चंद्रासम ।

तां तु मे सुकृतां बुद्धिं सुहृद्भि: सह निश्चिताम् ॥63॥
कथं द्रक्ष्याम्यपावृत्तां परेरिव हतां चमूम् ।

शुभ कर्म बुद्धीने जे सुहृदांसह निश्चित ॥63॥
पराजित सेनेपरि पाहू परतता कसे ।

किं मां वक्ष्यन्ति राजानो नानादिग्भ्य: समागता:॥64॥
बालो बतायमैक्ष्वाकश्चिरं राज्यमकारयत ।

काय म्हणतील मला खेदे नृप नानादिशातले ॥64॥
मूढ इक्ष्वाकुनृपे केले राज्य आजवरी कसे ।

यदा हि बहवो वृद्धा गुणवन्तो बहुश्रुता:॥65॥
परिप्रक्ष्यन्ति काकुत्स्थं वक्ष्यामीहं कथा तदा ।
कैकेय्या क्लिश्यमानेन पुत्र: प्रव्राजितो मया ॥66॥

बहुश्रुत गुणवान वृद्ध मला जर विचारती ॥65॥

श्रीराम कुठे आहे त्याना हे सांगु मी कसे ।
की कैकेयीच्या हट्टाने धाडिले त्यास मी वनी ॥66॥

यदि सत्यं ब्रवीम्येतत तदसत्यं भविष्यति ।
किं मां वक्ष्यति कौसल्या  राघवे वनमास्थिते ॥67॥
“किं चैनां प्रतिवक्ष्यामि कृत्वा विप्रियमीदृशम् ।

असत्य मम पूर्वीचे वच हो सत्य सांगता ।
कौसल्या काय म्हणेल रामा वनि मी धाडता॥67॥
तिज अप्रिय का केले  काय उत्तर देउ मी ।

यदा यदा च कौसल्या दासीव च सखीव च ॥68॥
भार्यावद् भगिनीवच्च मात्रुवच्चोपतिष्ठति ।
सततं प्रियकामा मे प्रियपुत्रां प्रियंवदा ॥69॥
न मया सत्कृता देवी सत्कारार्ह कृते तव ।

हाय कौसल्या जेव्हां दासी,सखि,भार्या,तशी॥68॥
भगिनी मातृवत माझे प्रिय करण्या धावली ।
वचना प्रिय बोलूनी परि सत्कारणे तिज ॥69॥
झाले न मज हातून देवि केवळ तुझ्यामुळे ।

इदानीं तत्तपति मां यन्मया सुकृतं त्वयि॥70॥
अपथ्यव्यञ्जनोपेतं भुक्तमन्नमिवातुरम् ।

प्रिय वर्तन मी केले तुजसी चुकलोच मी ॥70॥
जसे अपथ्य रोग्याने खाउनी रोग वाढतो ।

विप्रकारं च रामस्य सम्प्रमाणं वनस्य च ॥71॥
सुमित्रा प्रेक्ष्य वै भीता कथं मे विश्वसिष्यति ।

त्यजुनी अभिषेकास वनी रामास धाडणे ॥71॥
सुमित्रा पाहुनि भीता कशी विश्वसेल मज ।

कृपणं बत वैदेही श्रोष्यति द्वयमप्रियम् ॥72॥
मां च पञ्चत्वमापन्नं रामं च वनमाश्रितम् ।

सीतेस लागतिल वृत्ते ऐकाया दोन अप्रिय॥72॥
वनवास रामा आणी मम मृत्यू तयासवे ।

वैदेही बत मे प्राणान् शोचन्ती क्षपयिष्यति॥73॥
हीना हिमवतः पार्श्वे किन्नरेणेव किन्नरी ।

किन्नरीसम हिमपार्श्वे दुरावलेली किन्नरा ॥73॥
शोका तिच्या पाहूनी प्राण मम राहतील ना ।

नहि राममहं दृष्ट्वा प्रवसन्तं महावने ॥74॥
चिरं जीवितमाशंसे रुदन्ती चापि मैथिली ।
सा नूनं विधवा राज्यं सपुत्रा कारयिष्यसि ॥75॥

वनवासी श्रीरामास रडणाऱ्या मैथिलीशी ॥74॥
पाहणे जीवित राहून अशक्य मज ज्यामुळे
विधवा होउनी राज्य पुत्रासह निश्चित कर ॥75॥

सतीं त्वामहमत्यन्तं व्यवस्याम्यसतीं सतीम् ।
रूपिणीं विषसंयुक्तां पीत्येव मदिरां नरः॥76॥

वाटले तू सतीसाध्वी विषयुक्त दुष्ट परी ।
घेता मद्य मधुर जे निघावे विष मिश्रित ॥76॥

अनृतेर्बत मां सान्त्यैः सान्त्वयन्ती स्म भाषसे ।
गीतशब्देन संरुध्य लुब्धो मृगमिवावधीः ॥77॥

मधु बोल सान्वनायुक्त तव सर्व असत्य ते।
भुलवुनी व्याध संगीते रम्य मारी मृगा जसे ॥77॥

अनार्य इति मामार्याः पुत्रविक्रायकं ध्रुवम् ।
विकरिष्यति रथ्यासु सुरापं ब्राह्मणं यथा ॥78॥

नारीमोहे विके पुत्रा नर श्रेष्ठ मज मानुनी।
निंदा करतील मम मद्यासक्त ब्राह्मणापरी ॥78॥

अहो दु:खमहो कृच्छे यत्र वाच: क्षमे तव ।
दु:खमेवंविधं प्राप्तं पुरा कृतमिवाशुभम् ॥79॥

किति दु:ख मला ऐसे साहणे तव बोल हे ।
केले पूर्वजन्मी जे पाप अशुभ हे त्याचे फळ ॥79॥

चिरं खलु मया पापे त्वं पापेनाभिरक्षिता ।
अज्ञानादुसंपन्ना रज्जुरुबन्धनी यथा ॥80॥

अज्ञाने पापिणी प्रेमे गळा लावियले तुला ।
परि गळयात पडलेला फाशिचा दोर तू जणु ॥80॥

रममाणस्त्वया सार्धं मृत्युं त्वां नाभिलक्षये।
बालो रहसि हस्तेन कृष्णसर्पमिवास्पृषम् ॥81॥

खेळात बालक जैसा कृष्णनागा धरे तशी ।
रमता तुजशी न कळे हे मज मृत्युकारण ॥81॥

तं तु मां जीवलोकोऽयं नूनमाक्रोष्टमर्हति।
मया ह्यपितृक: पुत्र: स महात्मा दुरात्मना ॥82॥

दुरात्मा जीवित मी पुत्रा पितृहीन करीतसे ।
जीवलोक धिक्कारील मज योग्यचि ते असे ।।82।।

बालिशो बत कामात्मा राजा दशरथो भृशम्।
स्त्रीकृते प्रियं पुत्रं वनं प्रस्थापयिष्यति ।।83।।

म्हणतील मूर्ख पापी राजा दशरथ प्रिय ।
स्त्रीस संतोष देण्यास पुत्रास वनि पाठवी ।।83।।

वेदैश्च ब्रह्मचर्यैश्च गुरुभिश्चोपकर्शितः।
भोगकाले महत्कृच्छ्ं पुनरेव प्रपत्स्यते ।।84।।

वेदाभ्यास,गुरुसेवा,ब्रह्मचर्यात कष्टला।
आता उपभोग काली पुन्हा कष्टास लाविले ॥84॥

नालं द्वितीयं वचनं पुत्रो मां प्रतिभाषितुम्।
स वनं प्रव्रजेत्युक्तो बाढमित्येव वक्ष्यति ॥85॥

वनी जा म्हणता राम आज्ञाधारक जाइल ।
प्रतिकूल उत्तर देणे शक्य कधिही त्यास ना ॥85॥

यदि मे राघव: कुर्यात वनं गच्छेति चोदित:।
प्रतिकूलं प्रियं मे स्यान्न तु वत्स: करिष्यति॥86॥

वनात जा ही आज्ञा जर रामे न पाळली ।
मज आनंद होईल पण तो न करील ते ॥86॥

राघवे हि वनं प्राप्ते सर्वलोकस्य धिक्कृतम् ।
मृत्युरक्षमणीयं मां नयिष्यति यमक्षयम्॥87॥

वनात राघव जाता सर्वलोके धिक्कारता ।
यमलोकि नेइ मृत्यु अक्षम्य अपराध्या मला॥87॥

मृते मयि गते रामे वनं मनुजपुङ्गवे ।
इष्टे मम जने शेषे किं पापं प्रतिप्त्स्यते ॥88॥

जर मृत्यु मला आला राम गेल्यावर वनी।
उरल्या प्रियजनांना  छळसी काय करूनिया॥88॥

कौसल्या मां च रामं च पुत्रौ च यदि हास्यति।
दु:खान्यसहती देवी मामेवानुगमिष्यति ॥89॥

रामा शत्रुघ्ना लक्ष्मणा मज कौसल्या सोडता ।
दु:ख असह्य होऊनी तीही अनुसरील मज ॥89॥

कौसल्यां च सुमित्रां च मां च पुत्रैस्त्रिभि: सह ।
प्रक्षिप्य नरके सा त्वं कैकेयि सुखिता भव ॥90॥

कौसल्या,सुमित्रा पुत्र सर्वां तिन्हीं मजसवे ।
शोकी नरकतुल्य टाकुनी स्वत: तू हो सुखी ॥90॥

मया रामेण त्यक्तं शाश्वतं सत्कृतं गुणै:।
इक्ष्वाकुकुलमक्षोभ्यमाकुलं पालयिष्यति ॥91॥

शाश्वत क्षोभरहित सत्कृत्ये करणारे इक्ष्वाकुकुल मी ।
त्यजुनी जाता रामासह शोकाकुल त्या पालन करसी ॥91॥

हे वाक्य उपरोधिक आहे.इक्ष्वाकुकुल परंपरा तोडणारी कैकेयी परंपरांचे पालन काय करणार असा अर्थ

प्रियं चेद् भरतस्यैतद् रामप्रव्राजनं भवेत ।
मा स्म मे भरत: कार्षीत प्रेतकृत्यं गतायुष:॥92॥

भरतास वनी जाणे रामाचे प्रिय वाटले ।
तर मृत्यूनंतर माझे न करो दहन तो ॥92॥

मृते मयि गते रामे वनं पुरुषपुङ्गवे ।
सेदानीं विधवा राज्यं सपुत्रा कारयिष्यसि॥93॥

मरता मी आणि जाता राम पुरुषर्षभ वनी।
विधवा तू पुत्रासह राज्य अयोध्येत करी ॥93॥

त्वं राजपत्रि दैवेन न्यवसो मम वेश्मनि।
अकीर्तिश्तुला लोके ध्रुव: परिभवश्च मे।
सर्वभूतेषु चावज्ञा यथा पापकृतस्तया ॥94॥

राजकुमारी दुर्भाग्ये गृही आलीस तू मम ।
अपकीर्ति,तिरस्कार प्राप्त अवहेलना मज ।
तुझ्यामुळे पापाचारी जगी या बनल्यामुळे ॥94॥

कथं रथैर्विभुर्यात्वा गजाश्वैश्च महुर्मुहु:।
पद्भ्यां रामो महारण्ये वत्सो मे विचरिष्यति॥95॥

गज,अश्व रथी बैसे सदा जाण्यास दूर जो ।
पायी कसा महारण्ये चालेल मम पुत्र तो॥95॥

यस्य चाहारसमये सूदा: कुण्डलधारिण:।
अहंपूर्वा: पचन्ति स्म प्रसन्ना: पानभोजनम् ॥96॥
स कथं नु कषायाणि तिक्तानि कटुकानि च ।
भक्षयन् वन्यमाहारं सुतो मे वर्तयिष्यति॥97॥

ज्याच्या भोजनसमयी कुण्डलधारि बल्लव ।
स्पर्धा करति स्वादिष्ट करण्या पाकसिद्धीस ॥96॥

तोच तुरट खारट खाउनीया वनी फळे ।
कसा करिल निर्वाह श्रीराम प्रिय जो मज ॥97॥

महार्हवस्त्रसम्बद्धो भूत्वा चिरसुखोचित:।
काषायपरिधानस्तु कथं रामो भविष्यति ॥98॥

बहुमूल्य नेसुनी वस्त्रे सुखे राही सदैव जो ।
वल्कले नेसुनी कैसा वनी श्रीराम राहिल ॥98॥

कस्येदं दारुणं वाक्यमेवंविधमपीरितम् ।
रामस्यारण्यगमनं भरतस्याभिषेचनम् ॥99॥

वनगमन रामास भरता राज्याभिषेक हे।
कठोर बोल वदसी कुणाच्या प्रेरणेमुळे ॥99॥

धिगस्तु योषितो नाम शठा: स्वार्थपरायणा:।
न ब्रवीमि स्त्रिय: सर्वा भरतस्यैव मातरम् ॥100॥

धिक्कार असो स्त्रियांचा शठ स्वार्थपरायण।
परि न सर्व स्त्रियांचा केवळ कैकेयीचा असो॥100॥

अनर्थभावेऽर्थपरे नृशंसे ममानुतापाय निवेशितासि ।
किमप्रियं पश्यसि मन्निमित्तमं हितानुकारिण्यथवापि रामे॥101॥

अनर्थकारी कठोर कैकये देण्या ताप मज आलीस गृही।
निमित्ते मम अप्रिय पाहसी हितैषि सर्वा रामात काय दोष ॥101॥

परित्यजेयु: पितरोऽपि पुत्रान् भार्या: पतींश्चापि कृतानुरागा:।
कृत्स्नं हि सर्वं कुपितं जगत स्याद् दृष्ट्वैव रामं व्यसने निमग्नम्

पाहुनी हे सोडतील पुत्रां सर्व पिते तसेच पत्न्या पतीस आपुल्या।
अश्याप्रकारे विकृत होईल जग पाहूनि रामास संकटी सापडे त्या ॥102॥

अहं पुनर्देवकुमाररूपपमलंकृतं तं सुतमाव्रजन्तम् ।
नन्दामि पश्यन्निव दर्शनेन भवामि दृष्ट्वेव पुनर्युवेव॥103॥

देवकुमारासम रूपधारी रामा पाहूनि आभूषित अलंकारे ।
होतो आनंदित इतुका मी की वाटे मीच तरुण जाहलो ॥103॥

विनाहि सूर्येण भवेत प्रवृत्तिरवर्षता वज्रधरेण वापि।
रामं तु गच्छन्तमित:समीक्ष्य जीवेन्न कश्चित्विति चेतना मे॥104॥

सूर्याविना चालेल पृथ्वी इन्द्रवज्रे न वर्षता जगतील प्राणि।
परि रामा जाता पाहुनी जिवंत न राही कुणी मज असे वाटे ॥104॥

विनाशकामामहितामित्रामावासयं मृत्युमिवात्मनस्त्वाम् ।
चिरं बताङ्केन धृतासि सी महाविषा तेन हतोऽस्मि मोहात ॥105॥

विनाश माझा करण्यास पाहसी शत्रुरूप मृत्यूस घरी मी आणिले ।
नागीण विषारी बसवुनी अङ्की मोहे स्वत:स मारिले मी ॥105॥

मया च रामेण सलक्ष्मणेन प्रशास्तु हीनो भरतस्त्वया सह ।
पुरं च राष्ट्रं च निहत्य बान्धवान् ममाहितानां च भवाभिहर्षिणी ॥106॥

श्रीरामा,लक्ष्मणा माझ्यासवे हीन करूनि तुझ्यासह राज्य करील भरत ।
करुनि नाश बान्धवांचा राष्ट्राचा शत्रूंचा हर्ष वाढवणारी होशील तू ॥106॥

नृशंसवृत्ते व्यसनप्रहारिणि प्रसह्य वाक्यं यदिहाद्य भाषसे ।
न नाम ते तेन मुखात पतन्त्यधो विशीर्णमाणा दशना: सहस्रधा ॥107॥

निर्दय स्त्रिये संकटि करिसी प्रहार कठोर बोल ऐसे निघती मुखातुनि ।
बोलता ते दात तुझ्या मुखातुनि विदीर्ण होऊनि का न पडतात खाली ॥107॥

न किंचिदाहाहितमप्रियं वचो न वेत्ति राम: परुषाणि भाषितुम् ।
कथं तु रामे ह्यभिरामवादिनि ब्रवीषि दोषान् गुणनित्यसम्मते ॥108॥

श्रीराम अप्रिय वचन कधी न बोले कटुवचना बोलणे न जाणतो तो ।
अश्या रामात कसे दोष काढिसी वनात धाडाया दोष हवेत काही ॥108॥

प्रताम्य वा प्रज्वल वा प्रणश्य वा सहस्रशो वा स्फुटितां महीं व्रज ।
न ते करिष्यामि वच: सुदारुणं ममाहितं केकयराजपांसने ॥109॥

केकयराज कुल कलंकिनी तुज ग्लानि येवो अथवा जळुनी भस्म होसि ।
वा शतधा विदीर्ण होसी परि न मान्य करि मी अहितकारक बोल तुझे ॥109॥

क्षुरोपमां नित्यमसत्प्रियंवदां प्रदुष्टभावां स्वकुलोपघातिनीम् ।
न जीवितुं त्वां विषहेऽमनोरमां दिधक्षमाणां हृदयं सबन्धनम् ॥110॥

मधुर बोलसी सदैव परि तीक्ष्ण शस्त्रापरी दुष्ट घातक कुलास होतसि तू ।
प्राणासह भस्म हृदयास माझ्या करीसि तव जीवित पाहण्या मी न वांछितो ॥110॥

न जीवितं मेऽस्ति कुतः पुनः सुखं विनात्मजेनात्मवतां कुतो रतिः।
ममाहितं देवि न कर्तुमर्हसि स्पृशामि पादावपि ते प्रसीद मे ॥111॥

श्रीरामाविण न जीवित राहु मी शके कोठूनि लाभेल सुख तेव्हां मला ।
धरुनी पाया विनवतो मी हित माझे वांछिसि तर प्रसन्न देवि हो ॥111॥

स भूमिपालो विलप्ननाथवत स्त्रिया गृहीतो हृदयेऽतिमात्रया।
पपात देव्याश्चरणौ प्रसारितावुभावसम्प्राप्य यथाऽऽतुरस्तथा ॥112॥

महाराज अनाथापरि विलापत निर्दय स्त्रीच्या पदा स्पर्शाया जाती परी ।
मध्येच मूर्च्छित रोग्यापरी पडती वांछित वस्तु स्पर्शण्या असमर्थ जो ॥112॥

**इति श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकांडे द्वादशः सर्गः॥12॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 13

अतदर्ह महाराजं शयानमतथोचितम् ।
ययातिमिव पुण्यान्ते देवलोकात परिच्युतम् ॥1॥
अनर्थरूपासिद्धार्था ह्यभीता भयदर्शिनी।
पुनराकारयामास तमेव वरमङ्गना॥2॥

अवस्थेत महाराज अनुचित अयोग्य त्या ।
ययाति संपता पुण्य पडे स्वर्गातुनी जसा ॥1॥

अनर्थरूप कैकेयी लोकापवादा न भीत जी ।
परि भिउनि श्रीरामा वरास्तव पुन्हा वदे ॥2॥

त्वं कत्थसे महाराज सत्यवादी दृढव्रत: ।
मम चेदं वरं कस्माद् विधारयितुमिच्छसि ॥3॥

महाराज म्हणवुनी घेता सत्यवादी दृढव्रत ।
टाळता का मग माझे वर देण्यास आपण ॥3॥

एवमुक्तस्तु कैकेय्या राजा दशरथस्तदा ।
प्रत्युवाच तत: कृद्धो मुहूर्तं विव्हलन्निव ॥4॥

कैकेयी म्हणता ऐसे राजा व्याकुळ दो घडी ।
त्यानंतर क्रुद्ध होऊनी देण्या उत्तर लागती ॥4॥

मृते मयि गते रामे वनं मनुजपुङ्गवे।
हन्तानार्ये ममामित्रे सकामा सुखिनो भव ॥5॥

जाता राम नरश्रेष्ठ वनी होता मी मृत ।
राही सुखी स्त्रिये नीच मनोरथ पूर्ण होतिल ॥5॥

स्वर्गेऽपि खलु रामस्य कुशलं दैवतैरहम् ।
प्रत्यादेशादभिहितं धारयिष्ये कथं बत ॥6॥

स्वर्गी जाता विचारीता श्रीरामकुशल देवतां ।
उत्तर देऊ काय वनी पाठविले असे ?॥6॥

कैकेय्या प्रियकामेन रामः प्रव्राजितो वनम् ।
यदि सत्यं ब्रवीम्येतत तदसत्यं भविष्यति ॥7॥

आग्रहे कैकेयीच्या वनी पाठवले तया ।
सांगता रामा अभिषेक वच असत्य ठरेल ते ॥7॥

अपुत्रेण मया पुत्रः श्रमेण महता महान् ।
रामो लब्धो महातेजाः स कथं त्यज्यते मया ॥8॥

निपुत्रिक असता पुत्र जो कष्टे बहु लाभला ।
महातेजस्वि त्या रामा आता त्यजु मी कसा ॥8॥

शूरश्च कृतविद्यश्च जितक्रोध: क्षमापर:।
कथं कमलपत्राक्षो मया रामो विवास्यते ॥8॥

शूर विद्वान क्षमाशील क्रोध जिंके अशा तया ।
कमलनयन रामास कसा देशांतरि पाठवू ?॥9॥

कथमिन्दीवरश्यामं दीर्घबाहुं महाबलम्।
अभिराममहं रामं स्थापयिष्यामि दण्डकान् ॥10॥

नीलकमलासम श्याम दीर्घ बाहु बलवान जो।
रामा नयनाभिरामा कसे पाठवु दण्डकी ॥10॥

सुखानामुचितस्यैव दु:खैरनुचितस्य च ।
दु:खं नामामुपश्येयं कथं रामस्य भीमत:॥11॥

सुख भोगण्यास योग्य दु:खायोग्य नसे तया ।
भोगतो बुद्धिमान राम दु:ख पाहू शकतो न मी ॥11॥

यदि दु:खमकृत्वा तु मम संक्रमणं भवेत ।
अदु:खार्हस्य रामस्य तत: सुखमवाप्नुयाम ॥12॥

वनवास दु:ख त्या देण्यापूर्वीच मी मृत जाहलो ।
सुखी होईन न दिल्याने दु:ख देण्या अयोग्य जो ॥12॥

नृशंसे पापसंकल्पे रामं सत्यपराक्रमम् ।
किं विप्रियेण कैकेयि प्रियं योजयसे मम ॥13॥
अकीर्त्रिरतुलालोके ध्रुवं परिभविष्यति ।

कैकेयी पापिणि क्रूर रामा सत्यपराक्रमी ।
तोडिसी मजपासुनी मजला जो अतिप्रिय ॥13॥
अपकीर्ति तव होईल तुलना ज्या नसे जगी ।

तथा विलपतस्तस्य परिभ्रमितचेतसा ॥14॥
अस्तमभ्यागमत सूर्यो रजनी चाभ्यवर्तत ।

विलाप करता ऐसा चित्त व्याकुळ हो उनी॥14॥
सूर्य अस्तास जाऊनी रात्र पसरू लागली ।

सा त्रियामा तदार्तस्य चन्द्रमण्डलमण्डिता ॥15॥
राज्ञो विलापमानस्य न व्यभासत शर्वरी ।

जरि चन्द्रप्रकाशाने रात्र उजळुन टाकली ॥15॥
राजास न दे उल्हास जो विलाप करीतसे ।

सदैवोष्णं विनि:श्वस्य वृद्धो दशरथो नृप:॥16॥
विललापार्तवद् दु:खं गगनासक्तलोचन:।

वृद्ध दशरथ राजा उष्ण उछवास घेउनी ॥16॥
आकाशी दृष्टि लावून दु:खाने विलाप करी ।

न प्रभातं त्वयेच्छामि निशे नक्षत्रभूषिते॥1७॥
क्रियतां मे दया भद्रे मयायं रचितोऽञ्जलि:।

इच्छितो न उषा यावी निशे नक्षत्रभूषिते ॥1७॥
तुजला हात जोडून विनवितो दया करी ।

अथवा गम्यतां शीघ्रं नाहमिच्छामि निघृणाम् ॥18॥
नृशंसां कैकयीं दष्टुं यत्कृते व्यसनं मम ।

किंवा टळुनि जा शीघ्र ज्यामुळे न दिसे मुख ॥18॥
निर्दयी क्रूर भार्येचे लोटि जी संकटी मज ।

एवमुक्त्वा ततो राजा कैकेयी संयताञ्जलिः॥19॥
प्रसादयामास पुनः कैकेयी राजधर्मवित ।

एवढे म्हणुनी राजा जाणता राजधर्म जो ॥19॥
कृताञ्जलि कैकेयीस लागे विनवण्या पुन्हा ।

साधुवृत्तस्य दीनस्य त्वद्गतस्य गतायुष:॥20॥
प्रसाद: क्रियतां भद्रे देवी राज्ञो विशेषत:।

सदाचारी मरणासन्न दीन राजा विशेषत:॥20॥
शरण आलो त्यावरी कल्याणी हे कृपा करी ।

शून्ये न खलु सुश्रोणि मयेदं समुदाहृतम् ॥21॥
कुरु साधुप्रसादं मे बाले सहृदया ह्यसि ।

घोषणा सभेत केली म्हणुनी सहृदयि सखे ॥21॥
सुश्रोणि प्रसन्न होऊनी मजवरी कृपा करी ।

प्रसीद देवि रामो मे त्वद्दत्तं राज्यमव्ययम् ॥22॥
लभतामसितापाते यश: परम वाप्स्यसि ।

प्रसन्न हो तू देवी देसि रामास राज्य तू ॥22॥
देसि अक्षय सुनेत्रे त्या होई यशप्राप्ती तुला ।

मम रामस्य लोकस्य गुरूणां भरतस्य च
प्रियमेतद् गुरुश्रोणि कुरु चारुमुखेक्षणे ॥23॥

मला,रामास भरतास प्रजाजन गुरुना तसा।
प्रिय वाटे गुरुश्रोणि सुमुखी प्रिय हे करी ॥23॥

विशुद्धभावस्य हि दुष्टभावा दीनस्य ताम्राश्रुकलस्य राज्ञ:।
श्रुत्वा विचित्रं करुणं विलापं भर्तनूशंसा न चकार वाक्यम् ॥24॥

विशुद्ध भावे विनवीत राजा अश्रूनि नेत्र रक्तवर्ण तयाचे ।
करी विलाप विचित्र करुण काढी न निष्ठुर चकार शब्द ॥24॥

तत: स राजा पुनरेव मूर्च्छित: प्रियामतुष्टां प्रतिकूलभाषिणीम् ।
समीक्ष्य पुत्रस्य विवासनं प्रति क्षितौ विसंज्ञो निपपात दु:खित: ॥25॥

प्रिया न संतुष्ट प्रतिकूलहि वदे पडे राजा त्यामुळे मूर्च्छित पुन्हा ।
पुत्रास वनवास करुनी विचार बेशुद्ध होऊनि पुन्हा पडे तो ॥25॥

इतीव राज्ञो व्यथितस्य सा निशा जगाम घोरं श्वसतो मनस्विन:।
विबोध्यमान: प्रतिबोधनं तदा निवारयामास स राजसत्तम ॥26॥


राजा असा दु:खित राहि रात्र उच्छवास वेगे घेत रात्र घालवी ।
जागवण्या होत मंगलवाद्यध्वनि आज्ञा करी थांबविण्यास तो ॥26॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे त्रयोदश: सर्ग:॥23॥**


श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची इतर नऊ पुस्तकं.
यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.








श्याम कुलकर्णी
तुझी माझी



हास्यरंगी रंगले
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी
हसरी वारी
INSURANCE
STAMPING
VISA
IMMIGRATION

वाल्मिकीरामायण- ५





मराठी




श्याम कुलकर्णी




मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमद्‌भगवद्‌गीता ॥

लवकरच येत आहे.

श्री श्याम कुलकर्णी अनुवादित

मूळ वाल्मिकी रामायण मराठी श्लोकमय सहावा भाग

www.esahity.com